

# संघर्षयोद्धा

श्रीरंग आप्पा बारणे

दिल्लीचे तख्त हलविणारी,
मावळची मुलुखमैदानी तोफ,
सह्याद्री, स्वराज्याचा छावा,
ज्ञानोबा–तुकोबाचे पाईक,
मोरया गोसावी आणि चापेकर बंधूंचे शिलेदार
दमदार आणि दिलदार व्यक्तिमत्त्व,
महासंसदरत्न खासदार अर्थात्

# संघर्षयोद्धा

श्रीरंग आप्पा बारणे

प्रकाशक
सौ. सरिता श्रीरंग बारणे

* पुस्तकाचे नाव
**संघर्षयोध्दा : श्रीरंग आप्पा बारणे**

* लेखक
**श्रीरंग आप्पा चंदु बारणे**

* © सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

* प्रथम आवृत्ती
१६ फेब्रुवारी २०२५

* प्रकाशक
**सौ.सरिता श्रीरंग बारणे**

* मुद्रक
**मधुबन प्रिंटर्स, मंचर**

* मुद्रित शोधन
**मनोज मोरे**

* पुस्तक मांडणी व सजावट
**मनोज पंत**

* मूल्य : २७० रूपये

* ISBN No. : 978-93-342-2371-2

---

या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुन:प्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखकाची लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. या पुस्तकात मांडलेले विचार आणि मते ही मूळ लेखकाची आहेत. या बाबींना प्रकाशक जबाबदार राहणार नाही.

## अर्पण पत्रिका

पिंपरी–चिंचवड महापालिका ते संसद अशी राजकीय, सामाजिक वाटचाल समृद्ध करण्यासाठी प्रेरणा देणारे माझे कुटुंब, आई– वडील, बंधुराज हिरामणशेठ बारणे यांचे आशिर्वाद आणि सर्व मित्र, पिंपरी–चिंचवड शहरातील मतदार, मावळ लोकसभा मतदारसंघातील मतदार यांना हा ग्रंथ समर्पित...

सत्यमेव जयते

प्रधान मंत्री

Prime Minister

नई दिल्ली
7 फेब्रु. 2025

**श्री. श्रीरंग अप्पा बारणे जी,**

महाराष्ट्र के मावल निर्वाचन क्षेत्र का प्रतिनिधित्व करते हुए, अपने राजनितिक स्व अनुभावोपर आधारित आपकी पुस्तिका 'संघर्षयोध्दा' के प्रकशन के बारे में जानकर प्रसन्नता हुई !

आपके राजनितिक जीवन और कार्योपर आधारित पुस्तक निश्चित ही पाठकों के लिए संग्रहनिय होगी. इसी शुभकामना के साथ !

आपका,

(नरेंद्र मोदी)

सत्यमेव जयते

# अध्यक्ष, लोक सभा
# SPEAKER, LOK SABHA
# INDIA

## संदेश

मुझे यह जानकर अत्यंत हर्ष हुआ कि मावल, महाराष्ट्र संसदीय क्षेत्र से लोक सभा सदस्य, श्रीरंग अप्पा बारणे जी के प्रेरणादायक राजनीतिक सफर पर आधारित पुस्तक "संघर्ष योद्धा" का प्रकाशन हो रहा है।

किसी भी जनप्रतिनिधि का जीवन उसके क्षेत्र की जनता के कल्याण और विकास के प्रति समर्पित होता है। जब वह देश की लोकतांत्रिक व्यवस्था में महत्वपूर्ण भूमिका निभाते हुए संसद का सदस्य बनता है, तो उसकी जिम्मेदारी और भी बढ़ जाती है। यह गर्व की बात है कि श्रीरंग अप्पा बारणे जी ने अपने दायित्वों को पूरी निष्ठा, समर्पण और ईमानदारी के साथ निभाया है। कॉर्पोरेटर से सांसद तक की उनकी यात्रा निश्चित रूप से संघर्षों से भरी रही होगी, लेकिन लोक सेवा के प्रति उनकी अटूट प्रतिबद्धता और जनता की समस्याओं के प्रति संवेदनशीलता ने उन्हें एक सशक्त एवं लोकप्रिय जनप्रतिनिधि के रूप में स्थापित किया है। उनका योगदान न केवल उनके क्षेत्र के विकास में, बल्कि महाराष्ट्र और राष्ट्र हित में भी अत्यंत सराहनीय है।

इस महत्वपूर्ण उपलब्धि पर मैं श्रीरंग अप्पा बारणे जी को हार्दिक बधाई देता हूँ और आशा करता हूँ कि "संघर्ष योद्धा" पुस्तक राजनीति में रुचि रखने वाले युवाओं एवं समाजसेवा के प्रति समर्पित लोगों के लिए मार्गदर्शक सिद्ध होगी।

पुस्तक के सफल प्रकाशन के लिए मेरी शुभकामनाएं।

ओम बिरला

(ओम बिरला)

नितिन गडकरी
**NITIN GADKARI**

मंत्री
सड़क परिवहन एवं राजमार्ग
भारत सरकार
Minister
Road Transport and Highways
Government of India


सत्यमेव जयते

आज़ादी का अमृत महोत्सव

## शुभेच्छा संदेश

माझे स्नेही खासदार श्री. श्रीरंग अप्पा बारणे जी यांनी लिहिलेले 'संघर्ष योद्धा' हे पुस्तक दि. १६ फेब्रुवारी २०२५ रोजी म्हणजे त्यांच्या जन्मदिनी, श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष श्री स्वामी गोविंदगिरी महाराज यांच्या हस्ते प्रकाशित होत असल्याचे कळल्यावरून अतिशय आनंद झाला. या विशेष प्रसंगी मी श्री. बारणे जी यांचे अभिनंदन करतो आणि त्यांना हार्दिक शुभेच्छा देतो.

या पुस्तकाच्या माध्यमातून श्री. श्रीरंग अप्पा बारणे जी यांनी त्यांच्या तीन दशकांच्या राजकीय जीवनाचा पट मांडलेला असून, तो अतिशय मनोज्ञ व प्रभावी आहे. श्री. बारणे जी यांना मी १९९० च्या दशकाच्या सुरुवातीपासून ओळखतो. ते १६ व्या, १७ व्या लोकसभेचे सदस्य म्हणून निवडून आले आणि १८ व्या लोकसभेवर मावळ मतदारसंघातून पुन्हा निवडून आले. त्यांनी १९९७ मध्ये नगरसेवक म्हणून आपली राजकीय कारकीर्द सुरू केली. आजवरच्या सार्वजनिक जीवनात त्यांनी बराच मोठा पल्ला गाठला असून, ते संसदेत उत्तम काम करीत आहेत. ऊर्जा स्थायी समितीचे अध्यक्ष, संसदीय राजभाषा समितीचे संयोजक आणि रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या सल्लागार समितीचे सदस्य म्हणून त्यांचे काम कौतुकास्पद आहे. त्यांचे कार्य नेहमीच सार्वजनिक कल्याणासाठी समर्पित राहिले आहे.

त्यांच्या 'संघर्ष योद्धा' या पुस्तकाच्या यशस्वी प्रकाशन सोहळ्यासाठी शुभेच्छा देतानाच लोकसेवा करण्यासाठी ईश्वराने श्री श्रीरंग अप्पा बारणे जी यांना दीर्घायुरारोग्य द्यावे, अशी प्रार्थना करतो.

नितीन गडकरी

(नितिन गडकरी)

**दिनांक:** १२ फेब्रुवारी, २०२५
**स्थान:** नवी दिल्ली


Room No. 501, Transport Bhawan, 1, Sansad Marg, New Delhi – 110 001, Tel.: 011-23710121, 23711252 (O), 23719023 (F)
E-mail: nitin.gadkari@nic.in; website-www.morth.nic.in

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

दि. ११ फेब्रुवारी, २०२५

# शुभेच्छा

मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या 'संघर्ष योद्धा' पुस्तकाचे प्रकाशन होत असल्याचे समजून आनंद झाला. त्यांचा गेल्या ३० वर्षांतील विविध निवडणुकांतील अनुभव आणि राजकीय प्रवासाचा साक्षीदार असलेले हे पुस्तक राजकारणात येऊ इच्छिणाऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल, अशी खात्री आहे.

राजकारण आणि समाजकारण या क्षेत्रांत प्रवेश करणे आणि तिथे दीर्घकाळ प्रभावीपणे कार्य करणे, अत्यंत आव्हानात्मक असते. समाजासाठी कार्य करताना विविध अडथळे, संघर्ष, टीका आणि संकटांचा सामना करावा लागतो. परंतु ज्यांच्याकडे समाजसेवेची तळमळ, प्रबळ इच्छाशक्ती आणि कार्यक्षम नेतृत्वगुण असतो, ते हे आव्हान पेलण्यात यशस्वी ठरतात. संसदरत्न श्री. बारणे यांनी राजकीय, सामाजिक आणि विकासाच्या कार्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्यशैलीत लोकसंग्रह, स्पष्टवक्तेपणा आणि विकासाची दूरदृष्टी यांचा सुरेख समन्वय दिसून येतो. राजकारण हा केवळ सत्ता मिळवण्याचा मार्ग नसून ते लोकांच्या समस्या सोडवण्याचे एक प्रभावी साधन आहे यावर दृढविश्वास असलेले श्री बारणे यांना नगरसेवक ते लोकसभा खासदार पदापर्यंत करावा लागलेला संघर्ष या पुस्तकात वाचायला मिळणार आहे. श्री बारणे यांचे नेतृत्व राजकारणातील निष्ठा आणि समाजसेवेच्या तळमळीचा उत्तम नमुना आहे. त्यांचे कार्य आणि विचार नव्या पिढीला प्रेरणा देणारे आहेत. त्यांच्या 'संघर्ष योद्धा' पुस्तकासाठी तसेच त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, ई-मेल : cm@maharashtra.gov.in,
वेब साईट : www.maharashtra.gov.in

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | प्रस्तावना : कार्यकर्ता ते नेता प्रवास जिद्दीचा, चिकाटीचा, यशाचा! : एकनाथ शिंदे | ..०१ |
| २) | मनोगत : अशी झाली वाटचाल : श्रीरंग बारणे | ..०३ |
| ३) | सन १९९७ महापालिकेची पहिली निवडणूक पहिल्याच निवडणुकीत विरोधक झाले शांत | ..०७ |
| ४) | सन १९९९ महापालिका स्थायी समिती अध्यक्षपदासाठी दिली ४२ दिवसांची लढाई! | ..१३ |
| ५) | सन २००२ महापालिकेची निवडणूक दुसऱ्यांदा विजय आणि विरोधी पक्षनेतेपद | ..२१ |
| ६) | सन २००७ महापालिका तिसरी निवडणूक आमच्या बंडाला इथूनच सुरूवात झाली! | ..२५ |
| ७) | सन २००९ चिंचवड विधानसभा निवडणूक काँग्रेसची सोडली साथ; धरली शिवसेनेची वाट! | ..२७ |
| ९) | सन २००९ महापालिका पोट निवडणूक विधानसभा हरली अन् पुन्हा महापालिका लढली | ..३३ |
| १०) | सन २०१२ महापालिका निवडणूक कार्यकर्ते पाठीशी असतील तर...! | ..३५ |
| ११) | सन २०१४ मावळ लोकसभा निवडणूक देशातील सर्वोच्च संसदेत पहिले पाऊल! | ..३७ |
| १२) | सन २०१९ मावळ लोकसभा निवडणूक स्थानिक पातळीवर विरोधाला विरोध | ..४३ |
| १३) | आणि संसदीय कामाजातही अव्वल संसदरत्न, महासंसदरत्न असा अथक प्रवास | ..४९ |
| १४) | सन २०२० मध्ये काय घडलं! आणि पक्षांतर्गत आग धुमसत होती... | ..५३ |

१५) सन २०२४ आणि बदल घडत होता
आरोप-प्रत्यारोपांची राळ उठली आणि...! ..५९
१६) सन २०२४ लोकसभा निवडणूक
अशी केली तयारी अन् मिळविला विजय! ..६५
१७) राजकीय कारकीर्द घडताना...
मार्गदर्शक व आदर्श नेते, मित्रांमुळे घडलो ..६९
१८) मी असा घडलो
वाचनातून समाजकारण राजकारणाचे मिळाले धडे ..८१
१९) निवडणुकीचे विविध रंग ..८९
२०) आशिर्वाद ..९६
२१) प्रेरणा आणि सहवास ..९८
२२) मैत्र जिवांचे ..१०७
२३) विविध आंदोलने ..१११
२४) लोकसभेतही अव्वल
दहा वर्षांमध्ये कोणते प्रश्न मांडले अन् सोडविले ..११७
२५ मतदारराजाच्या साथीने मावळमध्ये
दहा वर्षांमध्ये हे करता आलं ..११९
२६) राजकीय आलेख.. भूषविलेली पदे ..१२२
२७) कृतज्ञता ..१२४

# प्रस्तावना



## कार्यकर्ता ते नेता प्रवास जिद्दीचा, चिकाटीचा, यशाचा! : एकनाथ शिंदे

महापालिकेचे सभागृह ते संसदेचे सभागृह आपल्या वाक्चातुर्याने गाजवणारे संसदरत्न खासदार म्हणजेच श्रीरंग आप्पा बारणे होत. कार्यकर्ता ते नेता हा आप्पांचा प्रवास संघर्षाचा, जिद्दीचा, चिकाटीचा, यशाचा आणि कर्तृत्वाचा आहे. त्यांच्या राजकीय कारकिर्दीवर, वाटचालीवर आधारित पुस्तक प्रकाशित होत आहे, त्या निमित्ताने सर्वप्रथम मी त्यांना शुभेच्छा देऊ इच्छितो.

पुणे जिल्हा, मावळ ही संतांची. विचारवंतांची भूमी आहे. स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या शौर्याने आणि संत ज्ञानेश्वर, संत तुकाराममहाराज आणि मोरया गोसावी, क्रांतीवीर चापेकर बंधू, मावळ लोकसभा मतदार संघातील वासुदेव बळवंत फडके, भाई कोतवाल, हिराजी पाटील यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीला भक्ती आणि शक्तीचा वारसा आहे. पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड शहरातील हे नेतृत्व. थेरगावसारख्या शेतकरी कुटुंबात, खेडेगावात जन्मलेल्या आप्पांनी केलेली वाटचाल ही तरुणांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे.

आप्पांचा आणि माझा गेल्या वीस वर्षांपासूनचा स्नेह आहे. लोकाभिमुख नेतृत्व कसे असावे, हे आप्पांकडे पाहिल्यानंतर दिसून येते. कोणताही बडेजाव नाही किंवा मोठेपणा नाही. अत्यंत साधेपणाने राहून त्यांनी आपल्या मतदारसंघामध्ये आपले स्थान निर्माण केले आहे. पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात पाऊल ठेवून नगरसेवक ते खासदार अशी प्रचंड मोठी भरारी घेतली आहे. त्यांनी आजवर महापालिका ते खासदार अशा नऊ निवडणूका लढवल्या आहेत. एकदा नव्हे, तर तीनदा मावळचे खासदार म्हणून निवडून आले आहेत यावरून त्यांची लोकाभिमुखता दिसून येते. गेल्या

१० वर्षांमध्ये, पिंपरी-चिंचवडच्याच राजकारणात नव्हे, तर महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांनी ओळख निर्माण केली आहे. गेल्या १० वर्षांत त्यांच्याशी अगदी जवळून संबंध आला. कारण ते माझे चिरंजीव श्रीकांत याचे अत्यंत जवळचे मित्र आहेत. २०१४ ला श्रीकांत जेव्हा लोकसभेत खासदार म्हणून निवडून गेला तेव्हापासून आप्पांचा आणि श्रीकांतचा अत्यंत जवळचा स्नेह निर्माण झाला. केंद्राच्या राजकारणामध्ये श्रीकांतला वडीलकीच्या नात्याने मार्गदर्शन करण्याची भूमिका आप्पांनी घेतली. त्यामुळे आमचे एकदम घरगुती आणि स्नेहाचे नाते राहिले. शिवसेना खासदारांना एकत्रित करण्यात आप्पांची महत्त्वाची भूमिका आहे, हे नाकारता येणार नाही.

आप्पांच्या राजकीय वाटचालीचे आणि निवडणुकीतील संघर्षाचे दर्शन घडवणारे पुस्तक लवकरच प्रकाशित होत आहे. 'संघर्ष योद्धाः श्रीरंग आप्पा बारणे' या पुस्तकामध्ये महापालिकेची पहिली निवडणूक, स्थायी समिती अध्यक्ष म्हणून तत्कालीन सत्ताधाऱ्यांना दिलेली चपराक. विरोधी पक्षनेता, गटनेता, काँग्रेसचे शहराध्यक्ष, शिवसेनेचे संपर्कप्रमुख, शिवसेना उपनेता आणि खासदार अशा सर्वच पातळ्यांवर आप्पांनी दाखवून दिलेले आपले कार्यकर्तृत्व याचा प्रवास मांडला आहे.

आपल्या मतदारसंघासाठी, मतदारांसाठी भांडणारा हा नेता आणि कार्यकर्ता आहे. राज्य आणि केंद्राच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर विकासात्मक कामे आप्पांनी केली आहेत. पुस्तकामध्ये १९९७ ची पहिली निवडणूक ते लोकसभेची २०२४ ची निवडणूक यात घडलेल्या घडामोडी, झालेली गटबाजी, विरोध याचे राजकारण विविध किश्यांच्या माध्यमातून उलगडले आहे. त्यातून त्यांचा मैत्री करण्याचा गुण, नेतृत्व गुण अधिक ठळकपणे दिसून येतो. तसेच त्यांची अभ्यासू वृत्तीही दिसून येते. संसदेत सलगपणे पाच वर्षे संसदरत्न, महासंसदरत्न असा सन्मान मिळवून त्यांनी आपण उत्तम संसदपटू आहोत, हे पटवून दिले आहे. संसदरत्न खासदार श्रीरंग आप्पांच्या या पुस्तकास माझ्या शुभेच्छा !

**– एकनाथ संभाजी शिंदे**

उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

माजी मुख्यमंत्री

# मनोगत



## अशी झाली वाटचाल

**जय शिवराय!**

मी श्रीरंग अप्पा चंदू बारणे. मावळचा खासदार नव्हे, तर तुमचा लोकप्रतिनिधी मित्र, सहकारी. आज तुमच्याशी हितगुज करणार आहे. संवाद साधणार आहे.

स्वराज्यनिर्माते छत्रपती शिवाजीमहाराज, 'माझ्या मराठीची बोलू कौतुके परि अमृताते ही पैजा जिंके, असे सांगणारे भागवत धर्मातील वारकरी संप्रदायाच्या मंदिराचा पाया रचणारे कैवल्यसाम्राज्य चक्रवर्ती संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरमहाराज, वारकरी संप्रदायाच्या मंदिराचा कळस असणारे जगद्गुरू संत तुकाराम महाराज, पवना नदीतीरावरून संपूर्ण जगताला 'मंगलमूर्ती मोरया' हा मंत्र देणारे महासाधू मोरया गोसावी, भारतीय स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणारे क्रांतिवीर चापेकर बंधू, वासुदेव बळवंत फडके, भाई कोतवाल, हिराजी पाटील, छत्रपती राजर्षी शाहूमहाराज, समतेचा मंत्र देणारे महात्मा जोतिबा फुले, राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्यासह सकल संतांना, विचारवंतांना विनम्र अभिवादन!

पिंपरी-चिंचवड म्हणजेच भक्ती आणि शक्तीचा वसा आणि वारसा असलेलं शहर. इंद्रायणी, मुळा आणि पवना नदीच्या तीरावर वसलेल्या या शहरामध्ये देशातील आणि राज्यातील कानाकोपऱ्यातून नागरिक वास्तव्यास आले आहेत. गाव ते महानगर, महानगर ते मेट्रो सिटी आणि स्मार्ट सिटी अशी या शहराची ओळख झाली आहे. हा बदल आणि परिवर्तन मी अनुभवले आहे.

या शहरातील थेरगावात, शेतकरी कुटुंबात माझा जन्म झाला.

लहानपणापासूनच सामाजिक कार्याची आवड होती. बंधू हिरामणशेठ बारणे हे राजकारणात होते. त्यामुळे मलाही सामाजिक कार्याची ओढ निर्माण झाली. तसे पाहिले, तर बंधुराजांपूर्वी आमच्या कुटुंबास कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नव्हती. मात्र, माझे वडील गावकीच्या कारभारात सक्रिय होते. थेरगाव परिसराच्या विकासामध्ये किंवा गावातील विविध उपक्रमांमध्ये आमचं कुटुंब नेहमी सहभागी होत असे. त्यामुळे सामाजिक कार्याची आवड निर्माण झाली. त्यातून सम्राट मित्र मंडळ, दत्त नागरी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून, पिंपरी-चिंचवड सोशल फाउंडेशन, वीट उत्पादकांची संघटना. गांधी पेठ तालिम, मित्र मंडळाच्या माध्यमातून सामाजिक कार्यास सुरूवात केली. तसेच लक्ष्मीबाई बारणे शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातही योगदान देण्यास सुरूवात केली.

सुरूवातीच्या कालखंडामध्ये काँग्रेसच्या माध्यमातून पक्ष संघटना वाढीसाठीही प्रयत्न केले. गेल्या ३० वर्षांच्या कालखंडामध्ये महापालिका, विधानसभा आणि लोकसभा अशा एकूण नऊ निवडणुका लढवल्या. सन १९९७ ची महापालिका निवडणूक, सन १९९९ ची स्थायी समिती निवडणूक त्यानंतर सन २००२ची महापालिका निवडणूक, सन २००७ ची महापालिका निवडणूक, सन २००९ ची विधानसभा निवडणूक आणि पुन्हा सन २००९ ची पोटनिवडणूक, सन २०१२ ची महापालिका निवडणूक, सन २०१४ ची लोकसभा निवडणूक, सन २०१९ ची लोकसभा निवडणूक आणि सन २०२४ ची लोकसभा निवडणूक अशा वेगवेगळ्या नऊ निवडणुका लढवल्या. त्या निवडणुकांमधून खूप काही शिकायला मिळाले. खूप काही अनुभव आले.

या निवडणूका कशा लढल्या, लढविल्या. तत्कालीन राजकारण काय होतं, तत्कालीन प्रश्न, तत्कालीन आव्हाने, मतदार व कार्यकर्त्यांचा सहवास, अनुभव या जोरावर विजय कसा मिळवला या विषयीचे आलेले अनुभव आपल्याला सांगावेत, या उद्देशाने या पुस्तकाचा हा प्रपंच. शब्दवेध, लढवय्या, माझा वैभवशाली मावळ लोकसभा मतदारसंघ, मी अनुभवलेली संसद अशी पुस्तके यापूर्वी लिहिलीत.

पुस्तकामध्ये सर्वच, संदर्भ देणे, सर्वांचा उल्लेख करणे शक्य नाही. त्यामुळे नजरचुकीने कुणाचे नाव राहिले असेल, संदर्भ राहिला असेल, तर मोठ्या मनाने आपण मला माफ करावे.

मला वाटते, जीवनामध्ये आपल्याला मिळणारे यश हे वरकरणी आपले दिसत असले, तरी त्याच्यामध्ये अनेकांचा वाटा असतो. त्यांचे योगदान असतं, याची जाणीव ठेवणे एवढे महत्त्वाचे असते.

माझ्या यशाच्या वाटचालीमध्ये माझे सर्व मित्र, कार्यकर्ते, कुटुंबातील सर्व सदस्य, नातेवाईक यांचे जे बहुमोल असे योगदान मिळाले, त्यामुळेच मी यशस्वी होऊ शकलो. या पुस्तकासाठी पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी, लोकसभा अध्यक्ष मा. ओम बिर्लाजी, केंद्रिय रस्ते व वाहतुक मंत्री मा. नितीन गडकरीजी व राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी या पुस्तकासाठी शुभेच्छा संदेश दिले आहेत. तसेच महाराष्ट्राचे लोकप्रिय, लोकमनातील मुख्यमंत्री एकनाथजी शिंदेसाहेब यांनी प्रस्तावना दिली, त्याबद्दल मी या सर्वांचा आभारी आहे.

पुस्तक निर्मितीच्या वाटचालीमध्ये पत्नी सरिता, चिरंजीव प्रताप, सून स्नेहा आणि विश्वजित बारणे, त्याचबरोबर बंधू धनाजी, पुतणे महेश, निलेश, माझ्या सर्व भगिनी व भाचे या सर्वांचे प्रोत्साहन मिळाले.

माझ्या राजकीय वाटचालीत अनेक नेत्यांचा सहवास व त्यांचे मार्गदर्शन मला मिळाले ते अनुभव मी या पुस्तकात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच राजकारणात वाटचाल कशी घडली, त्या वेळेस कसं राजकारण झालं. त्यातूनही मी माझा मार्ग कसा शोधला आणि या क्षेत्रात येणाऱ्या तरुणांनी काय करायला हवं, असा तिहेरी उद्देश या पुस्तकामागे आहे, तो सर्वांनी वाचावा, अशी माझी अपेक्षा आहे.

**– श्रीरंग आप्पा चंदू बारणे,**

खासदार, मावळ





## सन१९९७ महापालिकेची पहिली निवडणूक

# पहिल्याच निवडणुकीत विरोधक झाले शांत

**आयुष्यातील पहिलीच निवडणूक लढलो आणि दणक्यात जिंकलो. संघटनकौशल्य, जनसंपर्क, कामातील सातत्य, प्रामाणिकपणा, तसेच जिद्द, चिकाटी असेल, तर राजकारणात यश निश्चित मिळते. याचा अनुभव मला पहिल्या निवडणुकीने दिला.**

वीट कारखानदारांचे संघटन, पतसंस्थेच्या माध्यमातून केलेले सामाजिक कार्य, थोरले बंधू हिरामणशेठ यांच्यामुळे राजकारणाची बाराखडी शिकलो. परिणामी महापालिकेच्या १९९७ च्या पहिल्याच निवडणुकीत परीक्षा झाली आणि समोरच्या सगळ्या उमेदवारांचे डिपॉझिट गुल केले. तिथेच खऱ्या अर्थाने माझ्या राजकारणाची सुरूवात झाली.

महापालिकेची पहिली निवडणूक १९९७ ला मी लढलो. थेरगाव गणेशनगर हा प्रभाग होता. त्यात जवळपास माझ्या विरोधात ११ उमेदवार होते. मी सुरूवातीच्या राजकीय जीवनात काँग्रेसमध्ये काम करत होतो. त्या अगोदर मी पतसंस्था स्थापन

केली होती. वीट कारखानदार असल्याने त्या व्यावसायिकांची जिल्हा पातळीवर संघटना स्थापन केली होती. त्या माध्यमातून सामाजिक-राजकीय काम पाहिले. माझे थोरले बंधू हिरामणशेठ बारणे हे १९८६ ते १९९२ या कालावधीत थेरगावचे नगरसेवक होते. थोडीशी ती राजकीय पार्श्वभूमी होती. पहिल्या निवडणुकीत काँग्रेसने उमेदवारी दिली. माझ्या विरोधात ११ जण होते. निवडणुकीमध्ये ११ पैकी मी सोडलो तर ते १० जण सांगायचे, की अप्पांना सोडून कोणालाही संधी द्या. याचाच अर्थ मी त्या सगळ्यांमध्ये पॉवरफुल होतो. मी चांगल्या मतांनी विजयी झालो. जवळपास सगळ्यांचे डिपॉझिट जप्त झाले होते. मतदान साधारणतः साडेचार-पाच हजार होते आणि मी ७५० मतांनी विजयी झालो होतो. त्या काळात काँग्रेस विरुद्ध सर्व अपक्ष उमेदवार होते. शिवसेनेचा कोणी उमेदवार होता त्याला फक्त ९० मते मिळाली होती. पूर्ण थेरगावचे तीन वार्ड झाले होते, त्यांपैकी एक गणेशनगर प्रभागातून मी लढलो आणि विजयी झालो.

महापालिकेची निर्मिती झाल्यावर १९८६ ला पहिली निवडणूक झाली. थेरगाव परिसराचा त्या वेळी एकच वार्ड होता. मतदार होते ३,८००. माझे थोरले बंधू हिरामणशेठ बारणे त्या वेळी निवडून आले. नंतर १९९७ ला मी प्रथम निवडणूक लढवली. १९८६ ते ९२ मधली निवडणूक ही गावकी-भावकीवरच होती. निवडणुकीचे जे तंत्र होते त्यात परिचयपत्र, भिंती रंगवणे होते, कागदी पोस्टर लावणे होते. त्या वेळी हे बॅनर वगैरे काही नव्हते. मी ती निवडणूक पाहिली. परिचय पत्रक झेंडे होते. निवडणूक खर्चाला बंधन नव्हते आणि विशेष खर्चही येत नव्हता. ना प्रचाराच्या वेळी लोक किती बरोबर आहेत त्याचे. साधारणतः त्या निवडणुकीत दोन-तीन ग्रुप असायचे. निवडणूक यंत्रणा त्या वेळी राबवायचो. खर्च असा काही नव्हता. निवडणूक प्रचार केला, की कार्यकर्ता आपापल्या घरी जेवायला जायचा. त्या वेळी नेतेसुद्धा कार्यकर्त्यांना जपायचे. कार्यकर्त्याला उभारी देण्याचे काम करायचे. नेता आणि कार्यकर्ता यांच्यात एकमेकांबद्दल प्रेमाची भावना होती, आपुलकी असायची. त्या काळी महापालिकेत नोकरीसाठी जाहिरात दिली जात नव्हती. साध्या एका चिठ्ठीवर शिफारस केली जायची. त्यावर नोकरी मिळत असे. माझे थोरले बंधू हिरामणशेठ यांनी त्यांच्या नगरसेवकपदाच्या काळात शेकडो कार्यकर्त्यांना महापालिकेत नोकरी लावली. तो कार्यकर्त्यांचा मोठा संच माझ्या बरोबर कायम होता. खरे तर, त्या कार्यकर्त्यांच्या बळावर मी पहिल्या निवडणुकीत

भरघोस मतांनी विजयी झालो.

स्थानिक पातळीवर त्या वेळी थेरगाव परिसरात सुरूवातीपासून प्रत्येकांशी आमचे संबंध होते, एक राजकीय वलयसुद्धा होते. माझे बंधू राजकारणात होते, मी सामाजिक जीवनात एक चांगली पतसंस्था चालवत होतो. मुळात माझा व्यवसाय होता तो वीट कारखानदारीचा. शहर परिसरातील वीट कारखानदारांचे संघटन मी बांधले होते. पुणे जिल्हा वीट कारखानदारांना एकत्र केले. साधारणतः मावळ, थेरगाव, पाषाण, खेड शिवापूर, पुणे, कोंढवा असे कारखाने होते. त्या संघटनेचा मला अध्यक्ष केल्यावर मला एक चांगला प्लॅटफॉर्म मिळाला. संघटना सभासदांवर जिथे कुठे अन्याय होईल तिथे तत्काळ जायचे आणि त्यांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करायचा, हा माझा खाक्या बनला. शिवापूरला काही वीट कारखानदारांवर अन्याय झाला म्हणून त्या वेळी माझ्या नेतृत्वाखाली पुण्याच्या जिल्हाधिकारी कचेरीवर मोर्चा काढला होता. १९९५ ला थेट मुंबईतील काळा घोडा येथून वीट कारखानदारांचा एक जबरदस्त मोर्चा मंत्रालयावर नेला होता. अशा प्रकारे व्यावसायिक पातळीवरही संघटन वाढत गेले आणि त्याचा मोठा फायदा मला राजकारणातही झाला. वीट कारखानदारांचा अध्यक्ष म्हणून मी नेतृत्व करत असताना माउली शिरवळकर, दिलीप गावडे, काळूशेठ डांगे, भाऊसाहेब पारगे, पंढरीनाथ गोडांबे, ज्ञानेश्वर पारखे, पाषाणच्या निम्हण कंपनीपैकी तानाजी निम्हण असे अनेक मान्यवर बरोबर होते.



## १९९७ महापालिका निवडणूक

थेरगाव गणेशनगर, प्रभाग क्रमांक ४६ – या निवडणुकीत १५ उमेदवार रिंगणात होते. यामध्ये पिंपरी–चिंचवड विकास आघाडीकडून नारायण बारणे, काँग्रेसकडून श्रीरंग आप्पा बारणे, शिवसेनेकडून शशिकांत जाधव, अपक्ष तुकाराम गुजर अशी लढत झाली. त्यामध्ये श्रीरंग बारणे हे ११५२ मते घेऊन विजयी झाले. तुकाराम गुजर यांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली होती. १० उमेदवार अपक्ष होते. आप्पा बारणे विजयी झाले आणि सगळ्या उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले.

## मिळालेली एकूण मते

| | |
|---|---|
| १. श्री. कुऱ्हाडे राम यल्लाप्या | १५२ अपक्ष |
| २. श्री. गुजर तुकाराम लक्ष्मण | ४७२ अपक्ष |
| ३. श्री. गुजर रोहिदास नरहरी | २७२ अपक्ष |
| ४. श्री. जाधव शशिकांत हिंदूराव | १२७ शिवसेना |
| ५. श्री. डांगे बाळासाहेब तुकाराम | ०२ अपक्ष |
| ६. श्री. नाणेकर आनंदा केशव | ४३ चिंचवड जनसेवा अभियान |
| ७. श्री. बारणे नंदू गोविंद | १९८ अपक्ष |
| ८. श्री. बारणे नारायण नागू | २६८ पिंपरी चिंचवड विकास आघाडी |
| ९. श्री. बारणे श्रीरंग चंदू | ११५२ काँग्रेस |
| १०. श्री. मांढरे भारती अरविंद | ७० अपक्ष |
| ११. श्री. मोरे राजेश सजनराव | ०४ अपक्ष |
| १२. श्री. मोरे हरीष भिकोबा | १० अपक्ष |
| १३. श्रीमती वाघेरे पुष्पा महादू | १०३ अपक्ष |
| १४. श्री. शेंडे बाळासाहेब सखाराम | १३० अपक्ष |
| १५. श्री. सरोदे अनिल दगडू | २७१ रिपाइं |

वयाच्या अवघ्या २८-२९ च्या दरम्यान मी हे धाडस केले. मुळात पहिल्यापासून संघर्ष करतच राजकारण करत आलो. त्यामुळे कधी कुठलीही समस्या आली, तरी डगमगलो नाही. सार्वजनिक जीवनातील माझ्या यश्यामागचे खरे रहस्य म्हणजे संघटन, संघर्ष आणि सहवास हेच आहे. मी पहिली निवडणूक लढवत असताना याचा फायदा मला राजकारणात झाला.

आम्हाला राजकारणाची विशेष अशी पार्श्वभूमी नव्हती. आमचे वडील तसे सर्वसामान्य शेतकरी. त्यांना छक्केपंजे बिलकूल चालत नसायचे. थोरले भाऊ हिरामणशेठ बारणे हे मात्र राजकारणात होते. शरद पवार यांनी समाजवादी पक्ष काढला होता, त्या वेळी आमचे बंधू हिरामणशेठ मुळशी तालुका अध्यक्ष होते. पहिल्यापासून ते तसे राजकारणात सक्रिय होते. गावच्या उत्सवात पुढे असत. सुरूवातीच्या काळात त्यांनी थेरगावचे उपसरपंच पद भुषविले. सन १९८२ साली पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची स्थापना झाली व सन १९८६ साली महानगरपालिकेची पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली या निवडणुकीत संपूर्ण थेरगावचा एकच वॉर्ड होता. थेरगावचे पहिले नगरसेवक म्हणून माझे बंधू हिरामणशेठ बारणे यांनी संधी मिळाली. सन १९८९ साली ते स्थायी समितीचे अध्यक्ष झाले. या सर्वच गोष्टी मला खूप अनुकूल ठरल्या. पुढे १९९४ साली माझ्या आईचे निधन झाले. त्यावेळी तिच्या स्मरणार्थ मराठी थेरगाव येथे माध्यमाची शाळा सुरू केली.

***

अजित पवार आणि रामकृष्ण मोरे यांनी शिफारस केली आणि १९९७ ला मला काँग्रेसचे तिकीट मिळाले. भाऊसाहेब भोईरच्या बरोबर युवक काँग्रेसचे काम करत होतो. त्याचाही मला उमेदवारीसाठी फायदा झाला. मित्र म्हणून आम्ही संघटनेत एकत्र काम करत असायचो. राजाभाऊ गोलांडे, भाऊसाहेब भोईर, गजानन चिंचवडे होते. पक्ष आणि राजकारणात पुढे गेलो. मी ट्रान्सपोर्ट व्यवसायाकडे लक्ष कायम ठेवले. पक्ष आणि राजकारण करताना माझा वीटभट्टीचा व्यवसाय सांभाळला. माझी पतसंस्था होती. वीटभट्टी, खाण, क्रशर, ट्रक व्यवसाय सांभाळायचो. सुरूवातीला माझा व्यवसाय, मग राजकारण अशी माझी दिनचर्या होती. व्यवसायाच्या माध्यमातून मी अनेकांना रोजगार दिला होता. ३०० ते ४००



लोक त्या वेळी माझ्याकडे काम करायचे. हे सगळे करताना राजकीय प्रवास सुरू झाला.

पहिली निवडणूक मी १९९७ ला लढवली. त्या निवडणुकीत घरोघरी जाऊन प्रचार केला. कार्यकर्त्यांचा ताफा बरोबर घेऊन झेंडे, फलक हातात घेऊन प्रचार केलाय. त्यावेळी व आताच्या निवडणुकीमध्ये मोठा फरक आहे. त्या वेळी निवडणुकीत जास्त खर्च नव्हता, सोशल मीडिया नव्हता. प्रामाणिक, होतकरू युवक कार्यकर्ता म्हणून मला त्या वेळी मतदारांचे मोठे प्रेम मिळाले आणि महापालिकेत निवडून आलो. तो माझ्या परिवारासाठी खास करून माझ्या वडिलांसाठी आनंदाचा क्षण होता. महापालिका सभागृहातला तो माझा पहिला प्रवेश. विकासकामांचा अजेंडा डोक्यात ठेवूनच एका ध्येयाने महापालिकेत प्रवेश केला. महापौरपदाची निवडणूक झाली. आर.एस.कुमार पीठासिन अधिकारी होते. हनुमंत भोसले महापौर झाले होते. त्या सभेत महापौरांच्या अभिनंदनाचे पहिलेच भाषण मी केले. त्या वेळी प्रा. रामकृष्ण मोरे, अजित पवार होते. माझे भाषण ऐकूण मोरे सरांनी पहिल्यांदा पाठीवर थाप दिली. चांगले बोलतोस, भाषण छान झाले, असा सरांचा अभिप्राय होता. मुळात वीट कारखानदारांच्या संघटनेत अध्यक्ष म्हणून जाहीर भाषणाचा अनुभव माझा पाठिशी होता. तिथूनच माझी सुरूवात झाली. सभागृहात बोलत असताना अभ्यास करून बोलणे, विषयाला धरून मुद्दे मांडणे. बजेटवर बोलताना आकडेवारीसह जमा-खर्चावर बोलणे, अशा पद्धतीने भाषणात तरबेज होत गेलो आणि एक वेगळा ठसा महापालिकेच्या सभागृहात मिळविला.

***





### सन१९९९ महापालिका स्थायी समिती

# अध्यक्षपदासाठी दिली ४२ दिवसांची लढाई!

**१९९७ ला महापालिकेत काम करू लागलो. मला दुसऱ्याच वर्षी स्थायी समिती सदस्यपद मिळाले. नानासाहेब शितोळे गटनेते होते. राजकारणाची सुरूवात होत असताना रामकृष्ण मोरे आणि अजित पवार एकत्र नेतृत्व करत होते.**

स्थायी समितीत दोन वर्षे काम करायला मिळाल्यावर अजित पवार म्हणाले, 'मी तुला स्थायी समिती अध्यक्ष करणार आहे. प्रत्यक्षात मी नवीनच निवडूण आल्याने स्थायी समिती अध्यक्ष व्हावे, असे काही वाटतही नव्हते. मात्र, स्वतः अजितदादांनी सांगितल्याने माझ्याही अपेक्षा वाढल्या. दुसऱ्या वर्षीही मला अध्यक्ष करण्यात आले नाही. कारण स्थानिक आमदार, खासदारांनी विरोध केला होता. त्यामुळे मला ते पद मिळाले नाही. माझी दोन वर्षे स्थायी समितीची कारकीर्द संपली. पुन्हा समिती सदस्यपद मिळावे म्हणून मी अजित पवार यांना भेटून विनंती केली. मात्र, ते म्हटले पाहू. प्रत्यक्षात त्यांनी ते एवढे मनावर घेतले

नाही. मग मी स्थायी समिती सदस्यपदासाठी अर्ज दाखल केला आणि अपक्ष उभा राहण्याचा निर्णय घेतला. तोपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस वेगळा नव्हता. स्थायी समितीला मी सर्वाधिक मतांनी जिंकलो. समिती सदस्य पदाच्या निवडणुकीत आठ अधिकृत उमेदवारांशिवाय माझा नववा अर्ज होता. त्यामध्ये सर्वाधिक मते मला मिळाली होती.

१९९९ मध्ये काँग्रेस फुटली आणि राष्ट्रवादी काँग्रेस स्वतंत्र झाली होती. काही नगरसेवक शरद पवार, अजित पवार यांच्या बरोबर राष्ट्रवादीत गेले होते, पण नगरसेवकांपैकी कोण कोणत्या पक्षात ते काहीच समजत नव्हते. काँग्रेस पक्ष फुटल्याने तसे दोन पक्ष झाले होते. मला त्यातच अध्यक्षपदाची संधी दिसली आणि मी उमेदवारी अर्ज भरला. स्थायी समिती अध्यक्षपदासाठी अर्ज भरला आणि बिनधास्तपणे तयारीला लागलो. राज्यात त्या वेळी विलासराव देशमुख मुख्यमंत्री होते आणि त्याच मंत्रिमंडळात प्रा. रामकृष्ण मोरे हे शिक्षण मंत्री होते.

स्थायी समितीत १६ सदस्यांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसचे आठ सदस्य, काँग्रेसचे ५ सदस्य, भाजपचे एक, शिवसेनेचे दोन असे एकूण पक्षीय बलाबल होते. राष्ट्रवादी काँग्रेसने त्या वेळी स्थायी समिती अध्यक्षपदासाठी श्याम वाल्हेकर यांना उमेदवारी दिली होती. परिस्थिती पाहून मी धाडस केले आणि काँग्रेसकडून उमेदवारीअर्ज दाखल केला. काँग्रेस, भाजप आणि शिवसेना अशा तीन पक्षांचा मिळून मी उमेदवार होतो आणि आठ सदस्यांचे मला भक्कम पाठबळ होते.

खरे सांगायचे, तर त्या वेळी महापालिकेतील शरद पवार, अजित पवार यांच्या साम्राज्यालाच मी थेट आव्हान दिले होते. श्याम वाल्हेकर यांच्या विरोधात दंड थोपटल्याने मोठी खळबळ उडाली होती. काँग्रेसमधून फुटून राष्ट्रवादी काँग्रेसने वेगळी चूल मांडली आणि राजकारण सुरू केल्याने सामना आणखी रंगतदार झाला होता. नारायण बहिरवाडे, शशिकिरण गवळी, राजाभाऊ गोलांडे, विश्वास गजरमल समितीमधील काँग्रेसचे पाच सदस्य माझ्याबरोबर होतेच. भाजपच्या उमा खापरे आणि शिवसेनेचे प्रतीक झुंबरे आणि सुरेखा बोरुडे असे आठ सदस्य विरोधात गेल्याने पवारांची धाकधूक वाढली होती.

या सर्व घडामोडींत प्रा. रामकृष्ण मोरे सर यांनी माझी थेट गोपीनाथ मुंडे यांच्याशी भेट घालून दिली होती. माझे धाडस, चिकाटी पाहून मुंडे यांच्या सांगण्यानुसार भाजपने मला पाठिंबा दिला होता. 'भाजप तुमच्या बरोबर राहील',

असा शब्द खुद्द गोपीनाथ मुंडे यांनी दिला. दिवंगत नगरसेवक अंकुशराव लांडगे हे तेव्हा महापालिकेतील भाजपचे सभागृह गटनेते होते. लांडगे यांनी मला प्रामाणिकपणे मदत केली.

भाजपचा पाठिंबा मिळाल्यावर शिवसेनेचा पाठिंबा मिळविणे क्रमप्राप्त होते. उद्धव ठाकरे साहेब पुणे शहरात आले होते. रामभाऊ उबाळे आणि (कै.) अगस्ती कानिटकर हे मला थेट उद्धव ठाकरे यांच्याकडे घेऊन गेले. आम्ही तिथे गेलो. त्यांच्या बरोबर नाष्टासुद्धा केला. त्यांना सर्व काय ती परिस्थिती सांगितली आणि पाठिंबा मागितला. ते बोलल्यावर कानिटकर यांना ते म्हणाले, 'हे पोरगं जरा सज्जन दिसते आपण मदत करूया.' राष्ट्रवादीच्या विरोधात मी लढतोय हे पाहून मला त्यांनी मनापासून मदत करायचे ठरवले.

अशा प्रकारे भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि काँग्रेसचे आठ सदस्य, तर विरोधात राष्ट्रवादीचे आठ सदस्य असे संख्याबळ असताना आम्ही निवडणुकिला सामोरे गेलो.

## अजितदादांनी शब्द दिला; स्थायी समिती अध्यक्षपद

स्थायी समिती अध्यक्षपद हा आयुष्यातील सर्वांत मोठा अनुभव होता. माझ्या राजकीय जीवनाला कलाटणी देणारा क्षण होता. १९९७ ला निवडणूक झाली. पहिल्याच टर्ममध्ये मला स्थायी समिती सदस्य पदावर संधी मिळाली होती. १९९८-१९९९ ला माझी सदस्यत्वाची मुदत संपत असताना अजितदादांनी मला शब्द दिला होता, की स्थायी समिती अध्यक्षपद देतो. समितीच्या १६ पैकी माझ्यासह आठ सदस्य निवृत्त झाले होते. या आठ जागांसाठी निवडणूक होती. मला अजितदादा बोलले होते म्हणून अपेक्षा होती, की उमेदवारी मिळेल. प्रत्यक्षात त्यांनी मला डावलले. अखेर मी धाडस केले आणि सदस्यपदासाठी आठ सदस्यांच्या बरोबरीने माझा नववा अर्ज भरला. आणि भरपूर दबाव येऊनही उमेदवारी अर्ज कायम ठेवला. खरे तर, विजय लांडे, जगदीश शेट्टी हे चांगले मित्र होते. त्यांनी मला उमेदवारी मिळावी म्हणून अजितदादांकडे माझी शिफारसही केली होती. संधी दिली नाही, मात्र आठही सदस्यांत मी सर्वाधिक मतांनी विजयी झालो. नंतर जिद्द ठेवली आणि थेट स्थायी समिती अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला.

मी स्थायी समिती अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज भरला त्या वेळी राष्ट्रवादी

काँग्रेसकडे बहुमत होते. १६ पैकी आठ सदस्य हे राष्ट्रवादीचे होते. काँग्रेसकडे मी, राजाभाऊ गोलांडे, नारायण बहिरवाडे, शशिकिरण गवळी, विश्वास गजरमल असे पाच, भाजपकडे एक आणि शिवसेनेकडे दोन असे मिळून आठ सदस्यांचे बलाबल होते. उमा खापरे भाजपच्या आणि सुरेखा बोऱ्हाडे, प्रतीक झुंबरे शिवसेना पक्षाचे होते. पुढे काय झाले की, राष्ट्रवादीला वाटले आपले संख्याबळ जास्त आणि भाजप-शिवसेना किंवा विरोधात कोणी जाणार नाही. मुळात त्यांनी सुरूवातीला ती निवडणूक गांभीर्याने घेतली नव्हती. परंतु, परिस्थिती ओळखून मी व्यूहरचना केली आणि या निवडणुकीत चमत्कार घडवायचाच अशी खूणगाठ मनाशी बांधली. मला खात्री वाटल्याने मी थेट रामकृष्ण मोरे सरांशी त्याबाबत बोललो. मोरे सरांनी मला घेऊन गोपीनाथ मुंडेंना भेटून चर्चा केली. मी स्वतः शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांना भेटलो आणि शब्द मिळवला. भाजप आणि शिवसेना मदतीला आल्यानंतर त्या अध्यक्षपदाच्या पहिल्याच निवडणुकीत बरोबरीत मते पडली. समिती अध्यक्षपदासाठी माझ्या विरोधात श्याम वाल्हेकर वाल्हेकर यांना आठ आणि मलापण आठ मते मिळाली होती. तीन वेळा बरोबरीत म्हणजे टाय झाल्यानंतर जनरल बॉडीत सर्व नगरसेवक गुप्त मतदान करणार, असा नियम होता.

असे तीन वेळा बरोबरीत मते मिळाली व शेवटी मला माहीत होते, की बरोबरी होईल. त्या वेळी गुप्त मतदान होते. मला पूर्ण कल्पना होती म्हणून आम्ही तयारी केली. पुढची निवडणूक होण्यापूर्वी गडबड नको, कोणी त्या सदस्यांना उचलून नेऊ नये म्हणून माझ्या बरोबरच्या आठही सदस्यांना मी स्वतः शहराबाहेर घेऊन गेलो होते. प्रशासनातील बहुतेक अधिकारी वर्गाशी माझे चांगले संबंध असल्याने त्यांचीसुद्धा मला चांगली मदत झाली.

## दुसऱ्या वेळी आठ-आठ मते पडल्यावर राष्ट्रवादीचे नेते खडबडून जागे

तुम्हाला आश्चर्य वाटेल ही निवडणूक तब्बल ४२ दिवस चालली. कशी? तर, पहिल्या वेळी बरोबरीत मते पडली. सर्व सदस्यांना बाहेर नेले. कोणाशीही संपर्क येऊ दिला नाही आणि दुसऱ्या मतदानासाठी पुन्हा शहरात आणले. दुसऱ्या वेळी सुद्धा पुन्हा बरोबरीतच मते पडल्यावर राष्ट्रवादीचे नेते खडबडून जागे झाले. नंतर अजितदादांना ही निवडणूक थोडी अवघड वाटायला लागली.



तिसऱ्यांदा पुन्हा मतदान होणार होते. तिसऱ्यांदा ही निवडणूक जिंकण्यासाठी राष्ट्रवादीने बराच आटापिटा केला. त्यातलाच एक भाग म्हणजे उमा खापरे यांचा इतर मागासवर्गीय दाखला रद्द करायचा आदेश काढला. राष्ट्रवादीच्या त्या कुरघोड्यांना पुरून उरायचे असे ठरवले आणि सगळ्या पातळ्यांवर आम्ही तयारी केली. महापालिकेत त्या वेळी भा. ई. नगराळे आयुक्त होते. माझे आणि त्यांचे  अत्यंत संबंध चांगले होते. निवडणुकीच्या दरम्यान त्यांना समाजकल्याण विभागातून उमा खापरे यांचा ओबीसी दाखला रद्द करत असल्याचे पत्र आले होते. पत्रात स्पष्ट म्हटले होते, की यांचे ओबीसी प्रमाणपत्र रद्द का करू नये आणि जोपर्यंत त्याचा निकाल होत नाही तोपर्यंत स्थायी समितीच्या निवडणुकीत खापरे यांना भाग घेता येणार नाही.

थोडक्यात, उमा खापरे यांचा मताचा अधिकार रद्द झाला तर राष्ट्रवादीला ही निवडणूक सोपी होणार होती. भा.ई. नगराळे यांनी मला खासगीत बोलावून घेतले आणि ते पत्र दाखवले. मग आम्ही थोडे सावध झालो. त्या वेळी आमचे सहकारी नारायण बहिरवाडे, शशिकिरण गवळी, राजाभाऊ गोलांडे हे सगळे बरोबर होते. राष्ट्रवादीचा कुरघोडीचा हा प्रकार पाहिल्यावर मी मोरे सरांशी बोललो आणि सर्व प्रकार सांगितला. सरांनी थेट मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना याबाबतीत सर्व माहिती दिली. मला तत्काळ जिल्हा जातपडताळणी



विभागात जाऊन फोन करायला सांगितले. मी तिथे गेलो तर संबंधित अधिकारी सुटीवर गेले होते. सगळे कसे अगदी ठरवून चालले होते. मी मोरे सरांना फोन केला की 'या विभागाचे संबंधित अधिकारी सुटी टाकून गेलेत.' सरांनीही माहिती घेतली. या पदाचा चार्ज जिल्हाधिकाऱ्यांकडे असल्याचे मी सरांना सांगितले. पुढे मोरे सरांनी थेट मुख्यमंत्री देशमुख यांच्या कानावर प्रकार घातला. ते जात प्रमाणपत्र रद्द केल्याची छाननी करून ताबडतोब पाच वाजेपर्यंत तसे पत्र द्यायचे आदेश स्वतः मुख्यमंत्री देशमुख यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. जिल्हाधिकारी यांनीसुद्धा तसे पत्र तयार केले आणि उमा खापरे यांना निवडणुकीत भाग घेता येईल आणि त्याबाबत कोणाची तक्रार असेल, तर न्यायालयात जावे, असे आदेश काढले. या सगळ्या घडामोडी सुरू असताना राष्ट्रवादी किंवा अजित पवार यांना थांगपत्ता नव्हता. खापरे यांचा अर्ज ग्राह्य झाला. तसेच तत्कालीन नगरसचिव सुभाष काळे यांचीही मदत झाली.

## राजकीय डावपेच, साम-दाम-दंड-भेद

स्थायी समिती अध्यक्षपदाची निवडणूक महापालिका इतिहासात कोणी कधीच विसरणार नाही. तब्बल ४२ दिवस हा लढा सुरू होता आणि राजकीय डावपेच करून आम्ही ती निवडणूक जिंकली. या लढाईसाठी आवश्यक ते साम, दाम, दंड, भेद सगळे सगळे कामी आले. सदस्य पदासाठी मी माघार घ्यावी,

यासाठी सर्व ते प्रयत्न करण्यात आले. निवडणुकित यश मिळत नाही हे त्यांना समजून आल्यावर त्यांनी दुसरा मार्ग अवलंबिला. काही गुन्हेगारांची पाळत आमच्यावर होती. एक प्रकारे आठ सदस्यांपैकी एकाला तरी उलचून घेऊन जायचे असेच त्यांनी ठरवले होते ही बाब आमच्याही लक्षात आली. या करिता कोणालाही दोन दिवसापेक्षा जास्त दिवस एका जागेवर ठेवायचे नाही याची काळजी घेतली. काहींना देवदर्शनासाठी पाठवले आणि त्यांच्या सुरक्षेसाठी कार्यकर्त्यांची फौज बरोबर ठेवली आणि ही काळजी सातत्याने घेतली. राष्ट्रवादी काँग्रेसकडून त्यावेळचे नगरसेवक व पदाधिकारी आझमभाई पानसरे, लक्ष्मण जगताप, विलास लांडे, योगेश बहल, संजोग वाघेरे, अण्णा बनसोडे, अमर मुलचंदानी यांनी तर रात्रीचा दिवस करून निवडणुकित सहभाग घेतला होता. त्या तुलनेत आमच्याकडे जीवाभावाचे मित्र नगरसेवक होते, परंतु सर्व जिवाला जीव देणारे संबंध जपणारे होते. सर्वांनी शिवरायांच्या युध्दनितीनुसार शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ या तंत्राचा वापर केला. नारायण बहिरवाडे यांच्यावर खास नजर विरोधकांची होती. बरेच दिवस बाहेर राहिल्यावर एक दिवस रात्री राहण्यासाठी नारायण घरी येणार याची माहिती विरोधकांना समजली होती. याची मला पूर्ण कल्पना असल्याने सकाळी नारायणला फोन केला. त्याला कोणाचे फोन होते का याची माहिती घेतली. कोणत्याही परिस्थितीत तू घराच्या बाहेर पडू नकोस असे बजावून सांगितले आणि मी स्वतः नारायणला त्याच्या घरी आणायला गेलो. मोहननगरला आमदार गजानन बाबर यांच्या शेजारीच नारायण रहात होता. त्याच्या घरापासून जुन्या पंचशिल (सद्याचे डबल ट्री हिल्टन) हॉटेलच्या दिशेने राहत असलेल्या गल्लीतून माझ्या कारमधून आम्ही दोघे निघालो होतो. समोरून एक कार जोरात आमच्या दिशेने आली आणि आमच्या गाडीपुढे येऊन थांबली. परिस्थिती ओळखून मी नारायणला सांगितले होते की काही झाले तरी तू गाडीतून उतरू नकोस. तेवढ्यात त्या कारमधून तोंडाला रुमाल बांधलेली चार मुले उतरली व आमच्या दिशेने येऊ लागली. मोठा बाका प्रसंग होता. मी हा प्रसंग ओळखून गाडीतून उतरलो. माझ्याकडे परवानाधारक रिव्हॉल्वर असल्याने तो मी बाहेर काढून त्यांच्यावर रोखताच त्या चारही गुंडांनी गाडीत बसून अक्षरशः धूम ठोकली. आयुष्यातील तो क्षण मी कधीही विसरणार नाही. आखाड्यातील डावपेच राजकारणात कामी आले...

मुळातच सुरवातीपासून माझा स्वभाव हा लढवय्या राहिला. कोणालाही घाबरायचे नाही हा निर्धार कायम होता. पूर्वाश्रमीची तालिम केल्याने ते आखाड्यातील डावपेच डोक्यात होतेच. त्यातून हे अनुभव शिकत गेलो आणि राजकारणाच्या तालमीत प्रत्येक लढाईत तेच कामी आले. शत्रुपक्ष कोणताही असो धाडसाने स्वःसामर्थ्यावर सामोरे जायचे, विजय मिळतोच. अजितदादांची सत्ता असलेल्या महापालिकेत त्यांचा पहिला पराभव मी केला. तब्बल ४२ दिवस चाललेल्या निवडणूकित महापालिका सभागृहात गुप्त मतदानाने मतदान झाले. बहुमत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे होते पण, अनेकांशी असलेले माझे व्यक्तीगत संबंध यापुढे पंधरा नगरसेवक अधिकचे असतानाही मी अवघ्या एका मताने स्थायी समिती अध्यक्षपदाची निवडणूक जिंकून आलो.

स्थायी समितीच्या ऐतिहासिक निवडणुकीकडे संपूर्ण पिंपरी चिंचवड शहराचे लक्ष लागून राहिले होते. रोज रकानेच्या रकाने भरून बातम्या वृत्तपत्रांतून येत होत्या. एक प्रकारे या निवडणुकित मला खूप मोठी प्रसिध्दी मिळाली. माझ्यातील नेतृत्वाला संधीच या निवडणुकिने दिली. तब्बल ४२ दिवसांच्या अथक प्रयत्नानंतर स्थायी समिती अध्यक्ष झालो. समिती सदस्यपदासाठी सुरवातीला तीन वेळा टाय झाला. अखेर ती निवडणूक सर्वसाधारण सभेत गेली. तिथे सर्व मित्रांनी मदत केली. राष्ट्रवादी पक्षाची सत्ता असतानाही मी मैदान मारले. या निवडणुकित कै. अंकुशराव लांडगे, कै. नानासाहेब शितोळे, कै. अमृत पऱ्हाड, हनुमंता भोसले, नारायण बहिरवाडे, सुलभा उबाळे, उमाताई खापरे, राजू गोलांडे, शशिकिरण गवळी, तुकाराम भोंडवे, हनुमंत गावडे, शंकर काटे, जगदिश तिमय्या शेट्टी तसेच काँग्रेस, भाजप, शिवसेना व अंतर्गत मोठा संबंध असलेले राष्ट्रवादी पक्षाच्या नगरसेवकांचे मोठे सहकार्य मिळाले.

***





## सन २००२ महापालिकेची निवडणूक

# दुसऱ्यांदा विजय आणि विरोधी पक्षनेतेपद

**महापालिकेची माझी दुसरी निवडणूक २००२ची. राज्यात प्रथमच प्रभाग पद्धत लागू झाली होती. थेरगाव प्रभागातून खुली, मागासवर्गीय आणि इतर मागासवर्गीय अशा तीन जागा होत्या. ही निवडणुक माझ्या राजकीय कारकिर्दीसाठी महत्त्वाची ठरली.**

प्रभागात माझ्याशिवाय विमलताई जगताप आणि सतीश दरेकर हे दोघे होते. या निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने आमचे पॅनल जिंकले. खरे तर, १९९७ ते २००२ पर्यंत केलेली कामे डोळ्यांसमोर ठेवून लोकांनी मला मोठ्या मताधिक्य दिले.

प्रा. रामकृष्ण मोरे सरांच्या नेतृत्वाखाली आम्ही निवडणूक लढलो आणि विजयी झालो. काँग्रेसला चांगल्या जागा मिळाल्या. ३२ नगरसेवक मिळाले. राष्ट्रवादीला ३४ जागा मिळाल्या होत्या. या कालखण्डात मी अनेक कामे केली. थेरगावात जुने काही प्रश्न होते. पत्राशेड होती, ती काढून टाकण्याचे आश्वासन

## २००२ महापालिका थेरगाव प्रभाग क्रमांक १५ अ

या निवडणुकीत तीन सदस्य प्रभाग पद्धत होती. त्यामधील अ,ब,क अशा तीनही जागा श्रीरंग बारणे यांच्या नेतृत्वाखाली जिंकल्या होत्या. प्रभाग 'ब' मधून तिरंगी लढत झाली. श्रीरंग आप्पा बारणे यांच्यासह सहा उमेदवार रिंगणात होते. ९ हजार ३७० मतदान झाले. त्यात श्रीरंग बारणे यांना ४ हजार ८८७ मते मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या झामाबाई बारणे यांना २ हजार ७४१ मते मिळाली.

## प्रभाग क्र. १५ (ब) उमेदवाराचे नाव, पक्ष, मिळालेली वैध मते

| | |
|---|---|
| १) बारणे रोहिदास सोपानराव | अपक्ष - ९० |
| २) बारणे श्रीरंग आप्पा | काँग्रेस – ४,८८७ |
| ३) बारणे झामाबाई बाळासाहेब | राष्ट्रवादी – २,७४१ |
| ४) पवार मनोहर धोंडिबा | शिवसेना – १,५०६ |
| ५) शेख रेश्मा बाबर | महाराष्ट्र मजूर पक्ष – ४५ |
| ६) विजय राघोबा गायकवाड | बसप - १०१ |

मी दिले होते, ते पूर्ण केले. तसेच गायरान जागेत विकास प्रकल्प राबविण्याचा माझा शब्द होता. तिथे आज २०० बेडचे हॉस्पिटल उभे राहिले. गावठाण जागा स्वच्छ करून तेथे अत्यंत प्रशस्त अशी दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमी सुरू केली, शहरातील पहिला छत्रपती शिवरायाचा अश्वारूढ पुतळा उभा केला. केजुदेवी मंदिर परिसरात बोटक्लब निर्मिती केली, गावात दोन मंदिरे होती, त्यांची पडझड झाली होती त्यांचा जीर्णोद्धार केला. शाळेचे भव्य असे संकुल उभे केले.

सन २००२ च्या निवडणूकीत थेरगाव मधील कै. ज्ञानेश्वर दगडू बारणे, कै. विलास जगदाळे, कै. सुदाम हनुमंत बारणे, कै. नंदू दामोदर बारणे, कै. संजय विष्णु बारणे, कै.चंद्रकांत कोंडिबा बारणे, कै.विश्वनाथ बारणे, कै.जनार्धन मतकार मामा, कै. वामन मामा गुजर, कै. बाळासाहेब नथू गुजर, कै. डॉ. प्रमोद वर्मा, कै. बारकू पवार, कै. भागचंद्र पवार, कै. गणपत आण्णा म्हेत्रे, कै. गाडे आण्णा, चंद्रकांत दामोदर बारणे, बाळासाहेब उबाळे, अनंत येळवंडे, घनशाम पुजारी, संतोष गुलाब बारणे, तानाजी बारणे, सुभाष बारणे, महेश नंदू बारणे, मनोहर पवार, नवनाथ जाधव, भरत जाधव, सुनिल बारकू बारणे, पडवळ मामा, माणिक खैरे, रवी नलावडे, स्वप्निल गुजर, दिपक गुजर, नवनाथ गुजर, गणेश शांताराम गुजर, स्वप्निल मातेरे, बापूसाहेब ईथापे, गोपाळ बेलगे, यासारख्या असंख्य जीवाभावाच्या लोकांनी निवडणूकीत सहकार्य केले.

# विरोधी पक्षनेते पदालाही संघर्ष

२००२ ला महापालिकेत काँग्रेसला ३२ आणि राष्ट्रवादीला ३४ जागा मिळाल्या होत्या. दोन्ही पक्षांची मिळून सत्ता आली होती. त्या वेळी विरोधी पक्षनेता होण्यासाठीही मला संघर्ष करावा लागला. २००२ ला काँग्रेसला गटनेतेपद मिळणार होते त्या वेळी हनुमंत गावडे शहराध्यक्ष होते. मला उपमहापौर बनण्याची संधी होती, पण ती मी नाकारून विरोधी पक्षनेतेपद घेतले.

या कालखंडात मी विरोधी पक्षनेता होतो. साडेचार वर्षे ते काम पाहिले. खरे तर, विरोधी पक्षनेतेपदसुद्धा मला सुखासुखी मिळाले नाही. तिथेही तत्कालीन भाजपचे नेते अमृत पराड यांनी उच्च न्यायालयात निवडीचे प्रकरण नेले. मीही हटलो नाही, लढा दिला. काँग्रेस आणि राष्ट्रवादी सत्तेत असताना तुम्ही विरोधी पक्षनेते कसे होऊ शकता, असा त्या वेळी भाजपचा दावा होता. कोर्टातही आम्ही युक्तिवाद केला आणि दावा जिंकला. मी विरोधी पक्षनेत्याची जबाबदारी सांभाळली. माझा संघर्ष पाहूनच पुढे मला काँग्रेसचे शहराध्यक्षपद मिळाले. विरोधी पक्षनेता, काँग्रेस शहराध्यक्ष अशी संयुक्त जबाबदारी मी सांभाळली आणि कामकाजाची छाप पाडली. सभागृहात गटनेता म्हणून, तसेच प्रशासकीय अनुभव चांगला मिळाला.

पिंपरी-चिंचवड शहराचे खरे शिल्पकार अर्थात् प्रा. रामकृष्ण मोरे सर यांचे २००३ ला अकस्मात निधन झाले आणि काँग्रेसच्या अधोगतीला सुरूवात झाली. तरीही आमचा राष्ट्रवादीशी स्थानिक पातळीवर लढा सुरूच होता. २००७ चा कालखंड होता, आम्ही काँग्रेसची चांगल्या पद्धतीने बांधणी केल्यामुळे पिंपरी- चिंचवडच्या राजकारणात काँग्रेस सत्तेत येईल, असं वातावरण तयार व्हायला लागलं होतं. आणि त्याच वेळी काँग्रेसमधील स्थानिक आणि राज्य पातळीवरील नेत्यांमध्ये राजकारण सुरू झाले होते. त्या काळी हनुमंत गावडे यांनी तत्कालीन खासदार सुरेश कलमाडींना पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात आणलं. खरं तर, कलमाडींनी पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात लक्ष घालावं, अशी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची अजिबात इच्छा नव्हती. त्यामुळे विलासराव माझ्यावर नाराज झाले होते. एकदा ते मला म्हणाले, 'श्रीरंग, पिंपरीच्या राजकारणात कलमाडींना तुम्ही कशाला आणलं, काय गरज होती?' त्यावर त्यांना आम्ही स्थानिक पातळीवरील राजकीय परिस्थिती समजावून सांगितली. सर्वांच्या विचार-विनिमयानंतर आम्ही सर्वांनी निर्णय घेतला, असे सांगितल्यावर विलासरावांची नाराजी काही प्रमाणात दूर झाली होती.






# आम्हा घरी धन शब्दांची रत्ने!: ग्रंथसंपदा!

राजकारण समाजकारणात योगदान देत असताना मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी वाचन संस्कृती जोपासली आहे. ग्रंथांचे विविध पुस्तकांचे वाचन करणे हा त्यांचा आवडता छंद आहे. त्याबरोबरच स्वतंत्रपणे लेखन करणे हाही त्यांचा छंद आहे. त्यांनी आजवर समर्थ लढवय्या, शब्दवेध, आपला वैभवशाली मावळ लोकसभा मतदारसंघ, मी अनुभवलेली संसद असे अनेक ग्रंथ लिहिले आहेत.









### सन २००७ महापालिका तिसरी निवडणूक

# आमच्या बंडाला इथूनच सुरूवात झाली!

**खरे तर, प्रा. रामकृष्ण मोरे यांच्या निधनानंतर पिंपरी–चिंचवडची काँग्रेस पोरकी झाली होती. स्थानिक नेत्यांचा आत्मविश्वास डळमळीत होऊ लागला होता. आम्हाला साथ देणारा एखादा नेता इथे हवा होता. मोरे सरांनंतर शहराला नेता मिळाला नाही, हे दूर्दैव.**

त्या वेळी कलमाडी यांनीही लक्ष घातलं असले, तरी त्यांनीही राजकारण करायला सुरूवात केली होती. आमच्याच काहींची उमेदवारी कापण्याचे धोरण अवलंबलं होतं आणि तत्कालीन संसदीय कामकाज मंत्री हर्षवर्धन पाटील यांनीही लक्ष घातलं होतं. मात्र, या निवडणुकीमध्ये काँग्रेसला २२ जागाच मिळाल्या आणि राष्ट्रवादी काँग्रेसला बहुमत मिळाले. या काळात मी गटनेता होतो. शिक्षण मंडळाच्या निवडणुकीपासून संघर्षाला सुरूवात झाली. कलमाडींनी बाबू नायर यांचे नाव पाठवलं होतं, तर आम्ही राजू गोलांडे यांना उभे करायचे ठरवलं होतं. ही गोष्ट आम्ही हर्षवर्धन पाटलांच्याही कानावर घातली. अर्थातच

## २००७ महानगरपालिका निवडणूक – प्रभाग क्रमांक ८६ गणेशनगर

गणेशनगर प्रभाग क्रमांक ८६ हा सर्वसाधारण गटासाठी राखीव होता. एक सदस्य पद्धत निवडणूक होती. तीन सदस्य रिंगणात होते. त्यात काँग्रेसकडून श्रीरंग बारणे यांना २ हजार ३२९ मते मिळाली, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे तुकाराम गुजर यांना १ हजार ८७५ मते मिळाली. दुरंगी लढतीत बारणे विजयी झाले.

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीरंग आप्पा चंदू बारणे | काँग्रेस – २,३२९ |
| २) | तुकाराम लक्ष्मण गुजर | राष्ट्रवादी – १,८७५ |
| ३) | बाळासाहेब सखाराम शेंडे | भाजप – ७४ |

ते विलासरावांच्या जवळ असायचे. त्या वेळेस विलासरावांच्या परवानगीने आम्ही राजाभाऊ गोलांडे यांना उभे केले आणि अगदी एका मताने राजाभाऊंचा पराभव झाला. बाबू नायर विजयी झाले. त्या वेळी पक्षाने हनुमंतराव भोसले, नारायण बहिरवाडे, राजू गोलांडे, तुकाराम भोंडवे आणि माझ्यावर कारवाई केली. आम्हाला पक्षातुन काढून टाकले. अर्थातच त्या वेळी आमचीदेखील पक्षाबद्दल नाराजी होतीच. असं जरी असलं, तरी विलासराव यांच्यामुळे आमची काही कामे अडत नव्हती. ते आमच्या पाठीशी होते. पुढे सात-आठ महिन्यांनी विलासरावांनी प्रभा राव, अहमद पटेल यांना सांगितलं आणि आम्हाला पुन्हा पक्षात घेतलं. मात्र, कुरघोड्या सुरूच होत्या. त्याच कालखंडामध्ये विधानसभा आणि लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना होत होती. त्या वेळी माझ्या डोक्यात विचार आला, की आपण विधानसभा निवडणूक लढवायची.

***





### सन २००९ चिंचवड विधानसभा निवडणूक

# काँग्रेसची सोडली साथ; धरली शिवसेनेची वाट!

**आयुष्यात, राजकारणामध्ये मी नेहमी तत्त्वांना, निष्ठेला महत्त्व दिलं आहे. जिथे सन्मान नाही तिथे मी कधीच राहिलो नाही. मी नेहमी मनाचे आणि कार्यकर्त्यांचे ऐकले. २००७ चा कालखंड होता. सर्व काही सुरळीत सुरू होतं. प्रयत्न करूनही २००९ ला अपयश आले.**

सर्व काही चांगले सुरू असतानाच कधी-कधी आयुष्यात असं काही घडतं आणि सगळंच काही बदलून जातं. तसेच काही माझ्या बाबतीतही झालं आणि सगळं काही बदलून गेले. काय घडलं, हे जाणून घेऊयात!

मतदारसंघाची पुनर्रचना झाली आणि २००९ मध्ये चिंचवडला स्वतंत्र विधानसभा मतदारसंघ मिळाला. त्या वेळी एका मित्राच्या मदतीने मी राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांना मेसेज पाठवला. त्यांच्याकडून उत्तर आलं, 'आमच्याकडे खूप मोठी लाइन आहे.' आता राष्ट्रवादीचा विषय संपला होता. त्यानंतर एक दिवस आमचे पूर्वीचे मित्र संजय काकडे यांची भेट घेतली. माझ्यासोबत उमेश

चांदगुडे होते. त्या भेटीमध्ये काकडे मला म्हणाले, की 'उद्याच माझी उद्धव ठाकरे यांच्याबरोबर चर्चा आहे. तुम्ही मुंबईला या' आणि मी मुंबईला गेलो. त्या वेळी त्यांनीही माझी माहिती घेतली. उद्धवसाहेब मला म्हणाले, 'तुम्ही विधानसभा कुठे लढता, लोकसभा लढा! मी लोकसभेचे तिकीट देतो.'

त्या काळी मी नगरसेवक होतो आणि नव्यानेच मावळ लोकसभा मतदारसंघ तयार झाला होता. माझ्या डोक्यात केवळ विधानसभा लढायचा विचार होता. लोकसभेचा मी कोणताही विचार केला नव्हता. उद्धव साहेबांनी विनंती केल्यानंतर मी त्यांना म्हटलं, 'मी जरा घरी चर्चा करतो आणि दोन दिवसांनी आपल्याला भेटून माझं मत देतो.' त्यानंतर दोन दिवसांनी मी पहिल्यांदा शिवसेना भवनावर गेलो. त्या वेळी शिवसेनेचे संपर्कप्रमुख अरविंद सावंत तिथे होते. त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर तेही म्हटले ठीक आहे. त्या वेळी खासदारकीसाठी आमदार गजानन बाबर इच्छुक होते. दरम्यान, वर्तमानपत्रांमध्ये बातमी आली, 'काँग्रेसचे नगरसेवक श्रीरंग बारणे शिवसेनेच्या संपर्कात.' त्यानंतर दोनच दिवसांनी मी, नारायण बहिरवाडे व माझे जवळचे कार्यकर्ते विलास जगदाळे असे आम्ही मातोश्रीवर गेलो. त्या ठिकाणी आम्हाला मनोहरपंत जोशी आणि सुभाष देसाई भेटले. चर्चा सुरू असतानाच लक्षात आले देसाई साहेबांचा कल हा बाबर यांच्याकडेच अधिक होता. तत्पूर्वी आतमध्ये मी, उद्धवसाहेब, मिलिंद नार्वेकर यांची अशी चर्चा झाली होती. त्या वेळीही 'लोकसभा लढा, विधानसभा डोक्यात घेऊ नका' असे सांगितले गेले. त्यांनाही मलाच तिकीट द्यायचे होते. मात्र, सुभाष देसाई आणि जोशी सरांचा कल हा बाबर यांच्या बाजूनेच होता. बैठकीतील सर्व नेते बाहेर आले; त्या वेळी बाबर आणि देसाई, जोशी साहेब यांच्यामध्ये आत काय शिजलं, हे मला माहिती नव्हतं.

ते बाहेर आल्यानंतर मला म्हणाले, 'तुम्ही आता बाबरांसाठी काम करा आणि पुढे विधानसभा लढा.' त्यावर मी विचार केला. सर्वांचा विचार घेतला. एवढा मोठा मतदारसंघ आणि आपल्याला लोकसभा निवडणूक लढवण्याचा कोणताही अनुभव नाही. एकदम अशी मोठी झेप मारायला नको. आता माझीही मानसिकता विधानसभा लढण्याची बनली होती.

त्यानंतर दोन दिवसांनी उद्धव साहेबांनी मला आणि बाबरांना बोलावून घेतले. साहेब म्हणाले, 'तुमचा निर्णय आहे ना विधानसभा लढायचा.' त्यावर



मी 'हो' म्हटले. त्यांनी बाबर यांना सांगितले, 'शिवसेनेकडून बाबरच निवडणूक लढतील. पुढची लोकसभा निवडणूक बारणेच लढणार. आता ते तुमचे काम करणार आहेत. या लोकसभेनंतर ते आपल्याकडे येतील.' त्या निवडणुकीमध्ये मी त्यांचेच काम प्रामाणिकपणे केले. पुढे २००९ ची निवडणूक आली. मी काँग्रेसच्या नगरसेवकपदाचा राजीनामा दिला.

***

## आणि विधानसभेत घात झाला; मित्र झाले शत्रू!

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मी शिवसेनेत प्रवेश केला. उद्धवसाहेबांनी मला तिकीट दिले. मी निवडणूक लढवली, बाजी लावली, चुरस झाली आणि थोड्या मतांनी माझा पराभव झाला.

या वेळीही राजकीय परिस्थिती आणि आव्हान या विषयी आवर्जून सांगायला हवे. निवडणुकीच्या आखाड्यामध्ये माझेच मित्र अर्थात सोशल क्लबचे कार्याध्यक्ष लक्ष्मण जगताप हे अपक्ष म्हणून निवडणूक लढवत होते. खरे तर, आम्ही दोघेही चांगले मित्र. पिंपरी-चिंचवड सोशल क्लबच्या माध्यमातून गणेश फेस्टिव्हलच्या माध्यमातून शहरांमध्ये विविध सांस्कृतिक उपक्रम घ्यायचो.

खरे तर, लक्ष्मणरावांना लोकसभेला तिकीट मिळालं नाही, माजी महापौर आझम पानसरे यांना तिकीट मिळालं. मी बाबर यांच्याबरोबर राहिलो. मित्र असल्याने आझमभाई मला भेटले होते. त्यांनीही मला विनंती केली होती. त्यांना

## २००९ : चिंचवड विधानसभा

चिंचवड विधानसभा निवडणुकीमध्ये एकूण उमेदवार १४ होते. या निवडणुकीमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी आघाडी आणि शिवसेना-भाजप महायुती राष्ट्रवादी बंडखोर अशी तिरंगी लढत झाली होती. त्यामध्ये ३,९१,८५७ मतदार होते. त्या पैकी १ लाख ९७ हजार ९२८ मतदान झाले. ५०.५१% मतदान या निवडणुकीमध्ये झाले होते.

| | |
|---|---|
| १) लक्ष्मण पांडुरंग जगताप (अपक्ष) | : ७८,७४१ |
| २) श्रीरंग आप्पा बारणे (शिवसेना) | : ७२,१६६ |
| ३) भाऊसाहेब सोपानराव भोईर (काँग्रेस) | : २४,६८४ |
| ४) विलासराव एकनाथ नांदगुडे (अपक्ष) | : १५,५६१ |

मी प्रामाणिकपणे सांगितले, 'मी बाबर यांचेच काम करणार. कारण मी साहेबांना शब्द दिला आहे. तुमचे काम मी करणार नाही.' वास्तविक स्थायी समितीचा सभापती झाल्यानंतर त्या काळी महापौर म्हणून लक्ष्मण जगताप होते. आम्ही वेगवेगळ्या पक्षांत असलो, तरी त्यांचे आणि माझे संबंध अत्यंत स्नेहाचे, मैत्रीचे होते. आम्ही दोघांनी शहराच्या विकासासाठी चांगलं काम केलं होतं. मात्र, २००९ च्या विधानसभेपासून आमच्यात दुरावा निर्माण झाला होता. या वेळी जे राजकारण झाले ते माझ्यासाठी एक आव्हानच होते. ही जागा जाणीवपूर्वक काँग्रेसला सोडली गेली, खरे तर ही खेळी राष्ट्रवादीचे नेते अजितदादा पवार यांचीच होती. त्यांनी काँग्रेसला जाणीवपूर्वक जागा सोडली. लक्ष्मण जगताप यांना बंडखोर म्हणून उभं केलं. त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविली. या निवडणुकीत काँग्रेसमधून भाऊसाहेब भोईर यांना उमेदवारी देण्यात आली. त्यांना एकूण २४,६८४ मते मिळाली. त्यापैकी ११ हजार मते चिंचवड या भागात मिळाली, तर लक्ष्मण जगताप यांना ९ हजार मते मिळाली आणि मला १४ हजार मते मिळाली. चिंचवड परिसरातून मला सर्वाधिक मते मिळाली होती. खरे तर, भोईर हे निवडणूक लढले नसते, तर चित्र वेगळे राहिले असते. दुसरे आणि महत्त्वाचे कारण म्हणजे, भोईर यांना जरी उमेदवारी मिळाली असली, तरी सर्व यंत्रणा, राष्ट्रवादीचे नगरसेवक, महापौर हे आघाडीच्या विरोधात होते. ते सगळे अपक्ष उमेदवार लक्ष्मण जगताप यांचा प्रचार करत होते. मतांचे झालेलं विभाजन

यामुळे माझा पराभव झाला. मात्र दुसऱ्या क्रमांकाची अर्थात ७२१६६ मते मला मिळाली होती. वास्तविक किवळेपासून २३ व्या फेरीपर्यंत २४ हजारांची आघाडी मला होती. मात्र, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव सुरू झाल्यानंतर ही आघाडी तोडण्यात जगताप यांना यश मिळाले. माझा पराभव झाला. खरे तर हा माझा पराभव नव्हता. कूटनीतीने माझा पराभव केला होता. मतदार माझ्या पाठीशी होते. त्या वेळी सत्ताधाऱ्यांनी जास्त मतदारनोंदणी केली होती. महापालिकेतील सत्ता आणि अधिकारी त्यांच्याबरोबर होते, त्यामुळेच माझा पराभव झाला.

पराभवातून मला खूप शिकायला मिळाले. निवडणूक झाल्यानंतर मी आत्मपरीक्षण केले, पराभवाची कारणे शोधली आणि दुसऱ्याच दिवसापासून कामाला सुरूवात केली.

२००९ च्या विधानसभा निवडणूकीत कै. नितीन बालवडकर, कै. गजानन चिंचवडे, कै. बभ्रुवान गुळवे, नारायण बहिरवडे, बशिर सुतार, शरद उर्फ नंदू जाधव, बाळासाहेब वाघमोडे हे जीवाभावाचे साथीदार बरोबर होते. शिवसेना शहरप्रमुख भगवान वाल्हेकर यांनी प्रचाराची धुरा सांभाळली. महायुतीकडून उमाताई खापरे, सदाशिव खाडे, सुलभाताई उबाळे, नामदेव ढाके, राजू दुर्गे, मोरेश्वर शेडगे, भाई सोनवणे, कैलास बारणे, संपत पवार, तारामण कलाटे, अनिता तुतारे, वैशाली मराठे, दिलीप आंब्रे, अरूण आंब्रे, सुशिला पवार, मंगलाताई भोकरे, योगेश बाबर, गुरूदास भोंडवे, ज्ञानेश्वर पारखे, नितीन गजानन बारणे, प्रमोद ताम्हणकर, विजय साने, स्वरूपा खापेकर, मोहन संचेती यांनी या निवडणुकीत हिरीरीने प्रचार केला.

माझ्या प्रत्येक निवडणूकीत पत्नी सरिता हिचा सिंहाचा वाटा राहिला आहे. तिने लक्ष्मीबाई बारणे महिला प्रतिष्ठानची स्थापना करून त्या माध्यमातून महिलांना संघटीत करून त्यांचे मुलभूत प्रश्न सोडविण्याचे काम केले आहे. त्यामुळे माझ्या प्रत्येक निवडणूकीच्या प्रचारात महिलांचा सहभाग उल्लेखनिय आहे. यात प्रामुख्याने कै. पुष्पा तारू, रंजना साळवी, वैजयंती कोतुळकर, नूरजहाँ शेखभाभी, सुमन गायकवाड, पुष्पलता फुले, सुंदराबाई कांबळे, दिपाली गुजर, विमलताई जगताप, रंजना दिघे, सुनिता सगळगिळे, चारूशिला पवार इ. महिलांचा सहभाग राहिला आहे.

***



खासदार

## श्रीरंग आप्पा बारणे

# संसदरत्न, महासंसदरत्न

## १६ वी लोकसभा

| | |
|---|---|
| एकूण प्रश्न | १११३ |
| चर्चा | २८९ |
| खासगी मेंबर बिल लोकसभा | २० |

## १७ वी लोकसभा

| | |
|---|---|
| एकूण प्रश्न | ६३५ |
| चर्चा | १६७ |
| खासगी मेंबर बिल लोकसभा | १३ |

## १८ वी लोकसभा (१३ फेब्रुवारी २०२५ पर्यंत)

| | |
|---|---|
| एकूण प्रश्न | १०२ |
| चर्चा | ९४ |
| खासगी मेंबर बिल लोकसभा | ६ |






### सन २००९ महापालिका पोट निवडणूक

# विधानसभा हरली अन् पुन्हा महापालिका लढली

**चिंचवड विधानसभा २००९ च्या निवडणुकीमध्ये मला आलेले अपयश हे कार्यकर्त्यांच्या जिव्हारी लागलं होतं. आणि अपयश आल्यानंतर त्याच दिवसापासून मी लोकसभेच्या तयारीला सुरूवात केली होती. दरम्यान, वार्डामध्ये रिक्त झालेल्या जागेवर पोटनिवडणूक लागली.**

महापालिकेची निवडणूक लढवायची की नाही, असा प्रश्न माझ्यासमोर होता. मात्र महापालिकेत लोकांचे प्रश्न सोडवायचे असतील, विकास करायचा असेल? तर सत्तेत असायला हवं. त्यामुळे मी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला.

याविषयी मी उद्धव साहेबांशी चर्चा केली. त्या वेळेस साहेब म्हणाले की तुम्ही आता लोकसभा लढणार आहात. महापालिका लढून जर अपयश आले तर. परंतु, मी त्यांना माझे निवडून येण्याचे गणित सांगितले. त्यांना ते पटले आणि मी निवडणुकीच्या रिंगणात उभा राहिलो. वार्ड क्रमांक ४६ च्या

## २००९ ची पोटनिवडणूक – गणेशनगर, प्रभाग क्रमांक ८६

पोटनिवडणुकीत या प्रभागात चार उमेदवार रिंगणात होते. त्यात दुरंगी लढत झाली. एकूण मतदान ६ हजार २९६ झाले. त्यात शिवसेनेचे उमेदवार श्रीरंग बारणे यांना ३ हजार ७३३ मते आणि दुसऱ्या क्रमांकावर राष्ट्रवादीच्या तुकाराम गुजर यांना २ हजार ४९६ मते मिळाली.

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीरंग आप्पा चंदू बारणे | (शिवसेना) – ३,७३३ |
| २) | तुकाराम लक्ष्मण गुजर | (राष्ट्रवादी) – २,४९६ |
| ३) | गुजर भाऊ ऊर्फ प्रकाश | (अपक्ष) – ४२ |
| ४) | आबा ऊर्फ राजेश नागोसे | (रिपाइं) – ३२ |

पोटनिवडणुकीमध्ये चार उमेदवार रिंगणात होते. मी शिवसेनेकडून, राष्ट्रवादीकडून तुकाराम गुजर, अपक्ष प्रकाश गुजर आणि रिपाइंकडून आबा नागोसे रिंगणात होते. या निवडणुकीमध्येही मला पराभूत करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रभागात येऊन थांबले होते. त्यांनी खूप प्रयत्न केले. मात्र, विजय माझा झाला. मतदारराजाने मला भरघोस मते दिली आणि विजयी झालो.

सन २००९ च्या विधानसभेच्या पराभवाचे सर्वाधिक दु:ख हे थेरगाव मधील नागरीकांना झाले होते. त्यामुळे नगरसेवक पदाची निवडणूक कार्यकर्त्यांनी हातात घेतल्याने मी मोठ्या मताधिक्क्याने निवडून आलो. यात कै. विलास जगदाळे, कै. सुरेश बरडिया, कै. वामनराव कुलकर्णी मामा, कै. सुरेश सिंग, कै. नरसिंग पाटील, कै.मुरलीधर रत्नपारखी, कै. जनपंडित, कै. महादेव गुजर, कै. शांताराम मोरे, कै. गुलाबराव बोरकर, कै. भिवाजी गुजर, कै. आनंदा नाणेकर, कै. रामचंद्र (झामा तात्या) बारणे, सोपानराव चौधरी मामा, हनुमंत माळी, ॲड. दिलीप बोंबले पाटील, कानिफनाथ गुजर, सिताराम मातेरे, लहू नवले, नंदू सुतार, विजय पाटील, भाई प्रभू, दत्तात्रय खांदवे, सुभाष रोकडे, हिंम्मत भाटी, जयसिंग वेठेकर, बबलू साळवी, अरूण राक्षे, सुरेश राक्षे, सोमनाथ गुजर, शिवाजी भाऊसाहेब बारणे इ. कार्यकर्त्यांनी मनापासून काम केले. या विजयात माझ्यावर प्रेम करणारे असंख्य कार्यकर्ते ज्येष्ठ नागरीक, महिला व तरूण यांचा मोठा सहभाग होता.





### सन २०१२ महापालिका निवडणूक

# कार्यकर्ते पाठीशी असतील तर...!

**सन २००७ ते २०१४ या सात वर्षांमध्ये मी महापालिकेच्या तीन, विधानसभेची एक आणि लोकसभेची एक अशा पाच निवडणुका लढलो होतो. विधानसभेची निवडणूक वगळता सर्व निवडणुकींमध्ये मला यश मिळाले होते.**

सन २००७ ते २०१४ या सात वर्षांमध्ये मी महापालिकेच्या तीन, विधानसभेची एक आणि लोकसभेची एक अशा पाच निवडणुका लढलो होतो. विधानसभेची निवडणूक वगळता सर्व निवडणुकींमध्ये मला यश मिळाले होते. अर्थातच हे यश माझ्या सर्व कार्यकर्त्यांमुळे, मित्रांमुळे शक्य झाले. २०१२ ची निवडणूक दोन सदस्य प्रभाग पद्धतीची होती. प्रभाग क्रमांक ५१ मधून मी शिवसेनेकडून, राष्ट्रवादी काँग्रेसकडून काळुराम बारणे आणि मनसेकडून वैभव किरवे असे तीन उमेदवार रिंगणात होते.

या निवडणुकीमध्ये माझा विजय झाला. या निवडणुकीमध्येही अनेक



## २०१२ : महापालिका निवडणूक

गणेशनगर, बेलठिकानगर प्रभाग क्रमांक ५१ – महापालिकेच्या या निवडणुकीत दोन सदस्य प्रभाग क्रमांक ५१ (अ) नागरिकांचा मागास वर्गातून तीन उमेदवार रिंगणात होते. त्यात शिवसेनेकडून श्रीरंग आप्पा बारणे यांना ५ हजार ६८२ मते मिळाली. दुसऱ्या क्रमांकावर राष्ट्रवादीचे काळुराम बारणे यांना ५ हजार २०१ मते होती. तिसऱ्या क्रमांकावर मनसेचे वैभव किरवे यांना ५४१ मते मिळाली होती.

| | |
|---|---|
| १) श्रीरंग आप्पा बारणे (शिवसेना) | ५,६८२ |
| २) काळुराम बारणे (राष्ट्रवादी) | ५,२०१ |
| ३) वैभव किरवे (मनसे) | ५४१ |

नेत्यांनी मला पाडण्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावली होती. मात्र, परिसरासाठी केलेले काम हे मतदारांनी पाहिले आणि मला विजयी केले. मला वाटतं, नागरिकांशी–कार्यकर्त्यांशी आपली नाळ जुळली असेल तर, आपल्याला कोणीही हरवू शकत नाही. हे मला अनेकदा निवडणुकांमध्ये जाणवले आहे.

***





सन २०१४ मावळ लोकसभा निवडणूक

# देशातील सर्वोच्च संसदेत पहिले पाऊल!

**पिंपरी–चिंचवड महापालिकेतून थेट देशाच्या सभागृहात अर्थात लोकसभेत २०१४ मध्ये जाण्याची संधी मिळाली. तो अनुभव वेगळाच होता. अधिवेशन तयारी आणि विषय निवडणे, त्याची माहिती घेणे, मांडणे यामुळे माझी वेगळी ओळख निर्माण झाली.**

पिंपरी–चिंचवड महापालिकेतून थेट देशाच्या सभागृहात अर्थात लोकसभेत २०१४ मध्ये जाण्याची संधी मिळाली. तो अनुभव वेगळाच होता. अधिवेशन तयारी आणि विषय निवडणे, त्याची माहिती घेणे, मांडणे यामुळे माझी वेगळी ओळख निर्माण झाली. त्यामुळे सलगपणे संसदरत्न, महासंसदरत्न सन्मान मिळाला. ही वाटचाल कशी झाली, आव्हाने काय होती, कशी तयारी केली आणि यश मिळविले हे जाणून घेणार आहोत.

२०१४ ला संसदेत गेल्यावर पहिल्यांदाच मनाशी गाठ बांधली होती, आपण आपल्या मेहनतीवर येथपर्यंत आलेलो आहोत. कारण, राजकीय पार्श्वभूमी काही



## २०१४ : मावळ लोकसभा निवडणूक

मावळ लोकसभा मतदारसंघ तयार झाल्यानंतर २०१४ मध्ये दुसरी निवडणूक झाली. त्यामध्ये मावळ मतदारसंघातून एकूण १९ लाख ५३ हजार ७४१ मतदार होते. त्यांपैकी ११ लाख ७४ हजार ३३५ मते वैध होती. या निवडणुकीमध्ये एकूण वीस उमेदवार रिंगणात होते. शिवसेना-भाजप युती, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आघाडी आणि शेकाप अशी तिरंगी लढत झाली. या निवडणुकीमध्ये ६०.११ % मतदान झाले. त्यामध्ये शिवसेनेचे उमेदवार श्रीरंग बारणे विजयी झाले.

## लोकसभा निवडणुकीत उमेदवारांना मिळालेली मते

| | |
|---|---|
| १) श्रीरंग आप्पा बारणे ( शिवसेना) | : ५,१२,२२६ |
| २) लक्ष्मण पांडुरंग जगताप (शेकाप) | : ३,५४,८२९ |
| ३) राहुल सुरेश नार्वेकर (राष्ट्रवादी काँग्रेस) | : १,८२,२९३ |
| ४) मारुती साहेबराव भापकर (आम आदमी पक्ष) | : ३०,५६६ |
| ५) टेक्सास गायकवाड (बसपा) | : २५,९८२ |
| ६) नोटा | : ११,१८६ |



नव्हती. थेट लोकसभेपर्यंत पोहचेल, असे काही नव्हते. मी काँग्रेसमध्ये असतो तर मला तिकीट दिले नसते किंवा राष्ट्रवादीनेसुद्धा दिले नसते. शिवसेना पक्षाने तिकीट दिले म्हणून मी इथपर्यंत पोहचलो. लोकसभेत पहिले काम कोणते केले, तर मी सर्व कामकाज समजून घेतले. कशा पद्धतीने काम करायचे. तिथे एक माहितीपुस्तिका मिळते. ती हिंदी आणि इंग्लिशमध्ये असते. मी काही हिंदीची पुस्तके घेऊन त्याचे वाचन सुरू केले. हिंदी सुधारावे म्हणून प्रयत्न केले. लोकसभेत प्रश्न कसे टाकायचे याची माहिती घेतली. दिल्लीतच त्यासाठी काही माणसे शोधली आणि मला उमेश उपाध्याय हा पीए मिळाला. तो आजही माझ्याबरोबर आहे. अगदी पहिल्या अधिवेशनापासून मी लोकसभेत प्रश्न टाकायला सुरूवात केली.

नवीन सभासद असल्याने त्या वेळी २००-२५० प्रश्न यायचे. नवीन सदस्यांना समजायला उशीर लागतो, पण मी अगदी सुरूवातीपासून प्रश्न टाकायला सुरूवात केल्याने माझे प्रश्न जास्त लागायचे. नंतर काही सदस्य प्रश्न टाकतात, पण माझी त्याबाबतची आघाडी कायम राहिली. नंतरच्या काळात प्रश्नांवर संसदेत बोलायला सुरूवात केली. नवीन असल्याने बोलताना काही चुका व्हायच्या, काही मराठी शब्द यायचे.

एक मात्र नक्की, मी न डगमगता बोलत राहिलो. पक्षाकडून बोलणारे होते. मात्र, संधी मिळेल त्या वेळी मी विविध विषयांवर माझे विचार मांडत राहिलो. पुरवणी मागण्यांवर बोलत होतो. झीरो अवरमध्ये बोलायला मिळावे

म्हणून थांबून राहायचो. जास्त वेळ थांबलो की झीरो अवरमध्ये रोज बोलायचो. कामकाजातील असे सगळे बारकावे मी समजून घेत गेलो. सुदैवाने लोकसभा अध्यक्षा सुमित्रा महाजन या मुळच्या चिपळुणच्या त्या मराठी भाषिक होत्या. त्यांच्याशीही सतत संवाद ठेवला म्हणून जमत गेले. कामकाज समजत गेल्यानंतर पुढे मित्र जोडत गेलो. पहिल्यापासून माझा स्वभाव असा आहे, जिथे जाईल तिथे मित्रांचे सर्कल करायचे. त्यातूनच इतर राज्यांतील मित्र जमा झाले आणि माझा संसदेतील मित्र परिवार वाढत गेला. तिथे मला वाटायला लागले, की आपल्याला दिल्लीच बरी आहे. मला त्यातूनच एक मोठा आत्मविश्वास आला, की आपण निश्चितच संसदेत चांगले काम करू शकतो. मंत्र्यांना भेटणे, धाडसाने कामे करणे, सभागृहाच्या कामकाजात सहभाग घेणे असे वाढत गेले.

पासपोर्ट कार्यालयाच्या संदर्भातील प्रश्न असो किंवा पुणे-मुंबई रेल्वे मार्गाचे प्रश्न असो, रेड झोनचे प्रश्न असो असे विविध प्रश्न मी मांडत राहिलो. रेडझोनच्या प्रश्नाबाबत तत्कालीन संरक्षण मंत्री मनोहर पर्रीकर सर यांनी खूप मदत केली. प्रश्न मार्गी लागण्यासाठी त्याचा पाठपुरावा होणे गरजेचे असते. प्रश्न उपस्थित केले की मंत्री पण त्या संदर्भात भेटायचे आणि बोलावून सांगायचे, हे करा. लष्कराच्या प्रश्नांसंदर्भात अरुण जेटली साहेब यांच्याकडे संरक्षण आणि अर्थ खातं होतं, तेही नेहमी मला मार्गदर्शन करत असत.

पिंपरी-चिंचवड शहरात पासपोर्ट कार्यालय व्हावे, याकरिता तत्कालीन परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांची भेट घेऊन पासपोर्ट कार्यालयाची मागणी केली. पुणे शहरात पासपोर्ट कार्यालय असल्याने त्या कार्यालयापासून ३० किमी अंतरावर नविन पासपोर्ट कार्यालयाला मंजूरी देता येत नाही असे त्यांनी मला सांगितले. तरीदेखील मी परराष्ट्र मंत्रालयाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला. एक दिवस मा. सुषमा स्वराज यांच्याकडे गेलो असता, अधिकाऱ्यांसमोर त्या मला म्हणाल्या, 'ये लडका मेरा पीछा नही छोडेगा'. असे बोलून त्यांनी अधिकाऱ्यांना यावर कसा मार्ग काढता येईल ते सांगितले. त्यांनतर यावर असा निर्णय घेण्यात आला की, परराष्ट्र मंत्रालयाकडून पोस्ट कार्यालयाशी संलग्न पासपोर्ट सेवा केंद्राला मंजूरी देण्यात आली. त्यावेळी संपूर्ण देशात फक्त पाच पासपोर्ट सेवा केंद्राला मंजूरी मिळाली त्या पाच पासपोर्ट सेवा केंद्रात पिंपरी-चिंचवड शहराचा समावेश करण्यात आला.

एक अनुभव सांगावासा वाटतो, शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय मी उपस्थित केला होता. संरक्षण विभागाच्या जागांचा विषय होता. शेतकरी आत्महत्या का करतात, हा विषय मांडत असताना मावळमधील मिसाईल प्रकल्प शेतकऱ्यांचा विषय मी मांडला. मग, मला जेटली साहेबांनी बोलावून घेतले आणि सगळा विषय समजून घेतला. या संदर्भात आपण निर्णय घेऊ, प्रश्न सोडवू, असे आश्वासन दिले. त्यानंतर काही दिवसांनी मावळातील शेतकरी घेऊन मी दिल्लीत गेलो आणि शेतकऱ्यांची संरक्षण मंत्र्यांसमोर बैठक झाली. खरे तर, प्रश्न मार्गी लागतो किंवा नाही, यापेक्षाही एखाद्या गोष्टीचा आपण पाठपुरावा करतोय हे महत्त्वाचे असते आणि त्यात आनंद असतो. कामात सातत्य ठेवले, की प्रश्नही मार्गी लागतात.

## आमदार लक्ष्मण जगतापांचा पराभव, नार्वेकरांचे तिसऱ्या क्रमांकावर

महापालिकेची निवडणूक असो की खासदारकी, आमदारकीची. निवडणुकीत संघर्ष करावाच लागला. त्यात २०१४ ची लोकसभा निवडणूक राजकीय दृष्ट्याही महत्त्वाची होती.

खरे तर, ही निवडणूक थोडी आगळी- वेगळ्या अर्थाने होती. कारण २००९ मध्ये लक्ष्मण जगताप विरुद्ध श्रीरंग बारणे अशी लढत झाली होती. पुढे पाच वर्षांतला तो संघर्ष लोकांमध्ये कायम होता. २०१४ च्या निवडणुकीत जगताप हे घाटावर व घाटाखाली म्हणजे पुणे व रायगडला चांगली फाइट देतील, असे वातावरण असताना शेकापचे रायगड विभागात चांगली मते असल्याने लक्ष्मण जगताप यांनी शेतकरी कामगार पक्षाकडून उमेदवारी मिळवली व राहुल नार्वेकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिली. राष्ट्रवादीचे उमेदवार राहुल नार्वेकर असताना देखील राष्ट्रवादीतील अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करणारे त्यांचे सगळे समर्थक व कार्यकर्ते हे अगदी उघडपणे जगताप यांचे काम करत होते. त्यामुळे या निवडणुकीत राहुल नार्वेकर यांना नाममात्र मते मिळाली.

## आणि मित्र मिळाले !

संसदेत पहिल्यांदा गेलो होतो; मात्र, मैत्री करणे माझा स्वभाव असल्याने मला नवे मित्र मिळाले. त्या वेळी तरुण खासदार श्रीकांत शिंदे, राम नायडू, दुष्यंत

चौटाला, राहुल कासवा, राहुल शेवाळे, हेमंत गोडसे, प्रितम मुडें, रक्षा खडसे, हिना गावित, कृपाल तुमाने असे नविन मित्र मिळाले. आम्ही संसदेचे कामकाज एकत्रित पणे समजून घेऊ लागलो. कामात सातत्य ठेवले, या सर्व गोष्टींचा फायदा मला पुढे संसदेत काम करताना झाला.

देशाचे राष्ट्रपती आणि डॉ. अब्दुल कलाम यांनी प्राइम फाउंडेशनची स्थापना केली होती, त्याअंतर्गत संसदेत उत्कृष्ट काम करणाऱ्यांना संसदरत्न पुरस्काराने गौरविले जाते. सलगपणे हा पुरस्कार मला मिळाला. वास्तविक मतदारसंघामध्ये काम करत असताना मी संपर्क ठेवला. वादविवाद टाळले. मला वाटतं, एखाद्या पातळीवर आपले नेतृत्व प्रगल्भ झाल्यानंतर, एक उंची मिळाल्यानंतर स्थानिक पातळीवरील राजकारणात लक्ष घालणे कमी करायला हवे. ते धोरण मी अवलंबले. त्याचा फायदा मला झाला.

आजवरच्या जिवनामध्ये मी राजकारण कमी आणि समाजकारण जास्त केले आहे, त्याचा जिवनात निश्चित फायदा झाला. महापालिकेची निवडणूक असो, की लोकसभेची त्यात यश मिळाले. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत पिंपरी-चिंचवड शहरातील जनतेची मोठी साथ मिळाली.

या निवडणुकीत मला उमेदवारी मिळावी याकरिता भाजपाचे दिवंगत आमदार दिगंबर भेगडे, माजी आमदार बाळा भेगडे, मा.शंकरमामा शेलार व भाजपाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी मदत केली. उमेदवारी मिळाल्यावर शिवसेना व महायुतीच्या सर्व पदाधिकारी आर्णि कार्यकत्यांनी प्रामाणिकपणे काम केले. त्याचबरोबर माझा सर्वसामान्य नागरिकांशी असलेला स्नेह-संबंध यामुळेच मी लोकसभेच्या निवडणुकीमध्ये जवळपास १,५७,३९७ एवढ्या मताधिक्क्याने विजयी झालो. जनतेच्या आशीर्वादानेच मला हे यश मिळाले.

***





## सन २०१९ मावळ लोकसभा निवडणूक

# स्थानिक पातळीवर विरोधाला विरोध

**२०१९ च्या निवडणुकीत माला तिकीट मिळणारच होते. कारण, भाजप-सेनेची युती ठरलेली होती. त्या वेळी अगोदर पार्थ पवारांचे नाव चर्चेत येऊ लागले होते. स्थानिक पातळीवरून ते पुढे केले जात होते.**

२०१९ च्या निवडणुकीत मला तिकीट मिळणारच होते. कारण, भाजप-सेनेची युती ठरलेली होती. त्या वेळी अगोदर पार्थ पवारांचे नाव चर्चेत येऊ लागले होते. स्थानिक पातळीवरून ते पुढे केले जात होते. तसेच हा मतदारसंघ भाजपकडेच असावा, यासाठी तत्कालीन आमदार लक्ष्मणराव जगताप यांनी लॉबिंग करायला सुरूवात केली होती. त्यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे यांची भेट घेतली होती. मात्र, 'हा मतदारसंघ आमच्याकडेच राहणार आहे आणि आम्ही कोणता उमेदवार द्यायचा, हा आमचा प्रश्न आहे, आम्ही ठरवू.'



असे उद्धवसाहेब यांनी जगताप यांना ठणकावून सांगितले होते. मात्र, तेव्हा मला उमेदवारी मिळू नये, यासाठी एक सूर निघाला होता. पण, तो एवढ्या प्रमाणात नव्हता. अर्थातच विरोधाला विरोध म्हणून तो प्रयत्न होता. पुढे तिकीट मलाच मिळाले.

निवडणुकीमध्ये भाजपने आरपीआय आणि मित्र पक्ष, तसेच आरएसएसच्या किंवा हिंदुत्ववादी विचारांच्या विविध संघटनांनी चांगले काम केले. या वेळी मला दीड लाखाच्या पुढे मताधिक्य मिळेल असा माझा अंदाज होता. साधारणपणे सात लाख मते मिळतील, याची खात्री होती. मात्र, ७ लाख २० हजार ६६३ मते मिळाली आणि राष्ट्रवादीला नाकारले. खरे तर २०१४ ते २०१९ असा जर आढावा घेतला तर साधारणपणे या मतदारसंघामध्ये विरोधी मतदान हे साडेचार ते पाच लाख आहे. अर्थातच एवढेच मतदान विरोधी पक्षाच्या उमेदवारांना २ लाख २३ हजार ९१३ मतांनी माझा विजय झाला.

भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांची नाराजी दूर करण्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि चंद्रकांतदादा पाटील, गिरीश महाजन साहेब, कै.गिरीष बापट साहेब यांनी बैठका घेतल्या.

## आणि दहा वर्षांचा आमदार जगताप यांच्याबरोबरचा संघर्ष असा संपला!

लोकसभा निवडणुकीसाठी २०१९ ला महायुतीचा उमेदवार म्हणून




मला उमेदवारी जाहीर झाली. या जडणघडणीत विरोध मावळावा, यासाठी पहिल्यापासून मी प्रयत्न करू लागलो. लक्ष्मण जगताप हे भाजपचे आमदार होते. त्यांचा माझ्या उमेदवारीला प्रचंड विरोध होता. निवडणुकीत त्यांचा माझा दहा वर्षांचा संघर्ष होता, हे सत्य नाकारता येणार नाही. दोघांचेही एकमेकांवर अनेक आरोप- प्रत्यारोप सुरू होते. युतीमध्ये एकदा उमेदवारी जाहीर झाल्यावर तो विषय तिथेच संपायला पाहिजे होता. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी मी उद्धवजी ठाकरे यांना सातत्याने फोन करत होतो, हा संघर्ष संपवा. ठाकरे साहेब मला म्हणत, तुम्ही थेट जगताप यांना जाऊन भेटा. खरे तर, संघर्ष इतका होता की कोणी तरी मध्यस्थी पाहिजे होती.

त्या वेळी मी देवेंद्र फडणवीस साहेब यांना फोन केला. ते राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यांनी चंद्रकांतदादा पाटील यांना मध्यस्थीसाठी सांगितले. चर्चा करून फडणवीस यांनी मला फोन केला. नागपूरहून येताच मी खास माणूस पाठवतो, असे आश्वासन दिले आणि दुसऱ्याच दिवशी त्यांनी मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे ती जबाबदारी दिली आणि वाद मिटविण्यासाठी पाठवले. आमची दोघांची बैठक घडवून आणली.

बैठकीपूर्वी असाच एक किस्सा झाला. मुख्शमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रकांतदादा पाटील यांना मध्यस्थीची जबाबदारी दिली होती.

त्या वेळी दादांनी मला सांगितले, तुम्ही थेट जगताप यांच्या घरी जा आणि त्यांना भेटा. खरे तर, हे खूप कठीण होते. कारण सलग दहा वर्षे आमच्यातील

## २०१९ : मावळ लोकसभा निवडणूक

मावळ लोकसभा मतदारसंघांमध्ये २०१९ च्या निवडणुकीमध्ये एकूण मतदार २२ लाख ९८ हजार ०८० होते. निवडणुकीच्या रिंगणामध्ये २२ उमेदवार होते. महायुतीविरुद्ध महाविकास आघाडी अशी दुरंगी लढत झाली. वैध मतांची संख्या १३ लाख ६८ हजार ८७२ होती. या निवडणुकीमध्ये ५९. ५७ % मतदान झाले. तिरंगी लढतीमध्ये श्रीरंग बारणे विजयी झाले.

## मावळ लोकसभा मतदार संघातील मतदान

| | |
|---|---|
| १) श्रीरंग आप्पा बारणे (शिवसेना) | : ७,२०,६६३ |
| २) पार्थ अजित पवार (राष्ट्रवादी काँग्रेस) | : ५,०४,७५० |
| ३) राजाराम नारायण पाटील (वंचित बहुजन आघाडी) | : ७५,९०४ |
| ४) संजय कानडे (बहुजन समाज पार्टी) | : १०.१९७ |
| ५) प्रशांत देशमुख (अपक्ष) | : ६,३१८ |
| ६) नोटा | : १५,७७९ |

संघर्ष सुरूच होता. आम्ही एकमेकांचे नावसुद्धा घेत नव्हतो. तोडगा काढायचा म्हणून चंद्रकांतदादांनी सचिन पटवर्धन यांना माझ्याबरोबर पाठवले. आम्ही जगताप यांच्याकडे जात असताना देवेंद्रजींचाही फोन आला. तुम्ही, भेटून घ्या मीसुद्धा जगताप यांच्याशी बोलतो. माझ्यासाठी हा प्रसंग निराळा होता. मी निघण्यापूर्वी पत्नी सरिताशी या विषयावर बोललो. तिनेही मला सल्ला दिला, की आपल्याला उमेदवारी मिळाली आहे. चर्चा केली पाहिजे, भेटायला गेले पाहिजे.' अखेर मी राजी झालो आणि जगताप यांच्या घरी गेलो. बैठकित सविस्तर चर्चा झाली. आरोपांबद्दलही चर्चा झाली.

त्यानंतर गिरीश महाजन यांच्याशीही चर्चा झाली. मनातील क्लेष, जळमट काढून टाकायचे ठरले. संयुक्तपणे कार्यकर्त्यांबरोबर बैठक घेतली. आणि दुसऱ्या दिवशी प्रेस घ्यायचे ठरले. पत्रकार परिषद झाली. तिथेच तो दहा वर्षांचा संघर्ष काही प्रमाणात मिटला आणि नंतर त्यांनीसुद्धा निवडणुकीत माझ्याबरोबर राहून माझे काम केले.

## २०१९ : कोण पार्थ पवार?

मी २०१९ पर्यंत माझ्या कामकाजाचे हेच सातत्य कायम राखले. मतदारसंघात प्रचंड संपर्क ठेवला. वादविवाद टाळले. विशिष्ट पातळीवर गेल्यावर माणसाने थोडेसे प्रगल्भ होऊन राजकारण केले पाहिजे. म्हणून कुठेही वाद ठेवला नाही, स्थानिक पातळीवर राजकारणात लक्ष घालणे मी कमी केले. मला त्यात फायदा असा झाला, २०१९ च्या निवडणुकीत मी उभा राहिलो.

मला तिकीट मिळणारच होते, आम्ही सर्व रिपीट होणार होतो. भाजप आणि शिवसेनेची युती ठरलेली होती. परंतु पार्थ पवार यांचे नाव सहा महिने अगोदर चर्चेत आले. पार्थ पवार उभा राहणार. त्या आधी अनेक नावे चर्चेत आली होती. त्या वेळी भाजपने या मतदारसंघाची मागणीसुद्धा केली होती. त्यातच लक्ष्मण जगताप यांचे माझे जमत नव्हते. खरे तर, त्यांनीच लॉबिंग केली आणि थेट उद्धव ठाकरेंना जाऊन भेटले.

मावळ मतदारसंघ आम्हाला पाहिजे, अशी मागणी त्यांनी लावून धरली होती. पण, एक आवर्जून सांगितले पाहिजे, त्या वेळी उद्धव ठाकरे यांनी जगताप यांना स्पष्ट शब्दांत सांगितले हा मतदारसंघ आमच्याकडे आहे आणि उमेदवारी कोणाला द्यायची ते आम्ही ठरवू. मला तेव्हा उमेदवारी देऊ नये असा सूर निघाला होता, पण तो तितक्या प्रमाणात नव्हता. केवळ विरोधाला विरोध म्हणून केला होता. पुढे पार्थ पवार माझ्या समोर आले. राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांना उमेदवारी दिली. तसे पार्थ पवार यांचे इथे काहीच नव्हते. ना ओळख ना काम होते. अजित दादांचे पुत्र हि एवढीच त्यांची ओळख होती. त्यांचे या भागात कुठलेही सामाजिक व राजकीय कार्य नव्हते. पार्थ पवार उमेदवार झाल्यावर पत्रकारांनी मला प्रश्न विचारला, आता एक सक्षम उमेदवार पार्थ पवार तुमच्या समोर येतोय, तुम्हाला कसे वाटते? मी म्हटले,''कोण पार्थ पवार? मी नाही ओळखत'' आणि होतेही तसेच. कारण मी त्या वेळी पार्थ पवारला पाहिलेले नव्हते, की ओळखतही नव्हतो.

माझ्या बोलण्याचा हेतू तसा होता. प्रत्यक्षात तीच बातमी एवढी हिट झाली, की विचारू नका. कारण एकदा चेन्नईवरून मी आणि सुप्रिया सुळे एका विमानाने येत होतो. त्यांनी मला विचारले, ''तुम्ही पार्थला ओळखत नाही का?'' मी तिथेच त्यांना सांगितले, 'अहो ताई, मी खरेच ओळखत नाही; तर, मी कसे सांगू की ओळखतो!

## असा झालो 'जायंट किलर!'

पिंपरी–चिंचवड शहराने मला त्या वेळी खूप डोक्यावर घेतले. खरे तर, शहरात अजित पवार यांनी राजकारण केले. स्थानिकांना बरोबर घेऊन काम करत राहिले. परंतु इथला जो मूळ मतदार आहे त्याला राजकारणाशी काही देणे घेणे नाही. आपल्या जवळचा माणूस आहे, सहजतेने भेटतो, कामे करतो, कधीही फोन करा फोन उचलतो. मतदारांना हे सगळे ज्ञात होते. त्यांच्या जिवावर मला खात्री होती. भारतीय जनता पक्षाचा जो केडर बेस कार्यकर्ता होता त्यांनी प्रामाणिकपणे माझे काम केले. सगळीकडे अगदी पनवेलपासून पिंपरी–चिंचवडपर्यंत! संघ या निवडणुकीत होता. खरे तर, अजित पवार यांच्याबद्दल एक नकारात्मक भूमिका लोकांत होती. कारण इतक्या वर्षांत महापालिकेत सत्ता होती पण अनेक प्रश्न प्रलंबित होते.

विकास विकास काय असतो हो, शहरासाठी मोठमोठ्या योजना तुम्ही आणल्या तरच तो मतदार तुम्हाला म्हणू शकतो. रस्ते, लाइट, पाणी ही काय नियमितची कामे आहेत. ती होत राहतात. याच मतदारांनी मला डोक्यावर घेतले. मला तिथे खात्री होती, की मी दीड लाखाने जिंकेल. साधारण सात लाख मते मिळतील. त्यापेक्षा कमी पडणार नाहीत आणि ७ लाख २० हजार ६३३ मते मिळाली. मतदारांनी राष्ट्रवादीला पूर्णपणे नाकारले. २०१४ मध्ये पण नाकारले आणि २०१९ मध्ये सुद्धा नाकारले. या मतदारसंघात विरोधी पक्षाचे साधारणतः साडेचार ते पाच लाख मतदान आहे.

पार्थ पवारला पाच–साडेपाच लाख मते मिळतील, असा अंदाज बांधला होता. प्रत्यक्षात पाच लाख चार हजार मते मिळाली. म्हणजेच विरोधकांना जी मते आहेत त्याच्याच जवळपास ती होती. या निवडणुकीतच माझे महाराष्ट्रात नाव झाले, 'जायंट किलर' म्हणून लोक ओळखू लागले. या निवडणुकीमध्ये मावळमधून तत्कालीन आमदार बाळा भेगडे, आमदार सुनील शेळके, पनवेलचे ज्येष्ठ नेते रामशेठ ठाकुर, आमदार प्रशांत ठाकुर, चिंचवडचे आमदार लक्ष्मण जगताप, कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे, उरणचे आमदार मनोहर भोईर, आमदार महेश बालदी यांनी मदत केली.

***





आणि संसदीय कामकाजातही अव्वल

# संसदरत्न, महासंसदरत्न असा अथक प्रवास

**महापालिकेचेच राजकारण केल्याने थेट लोकसभेपर्यंत पोहचेल असे कधीच वाटले नव्हते, शिवसेनेने तिकीट दिल्याने खासदार झालो. अगदी पहिल्या दिवसापासून पुस्तके वाचली आणि संसद समजून घेतली.**

महापालिकेचेच राजकारण केल्याने थेट लोकसभेपर्यंत पोहचेनं असे कधीच वाटले नव्हते. शिवसेनेने तिकीट दिल्याने खासदार झालो. अगदी पहिल्या दिवसापासून पुस्तके वाचली आणि संसद समजून घेतली. धाडस केले आणि सातत्याने प्रश्न मांडत राहिलो, चर्चेत सहभाग घेत राहिलो. जास्तीत जास्त वेळ सभागृहात दिला. विविध प्रश्नांच्या निमित्ताने मंत्र्यांशी संपर्क करत राहिलो. बाहेरील राज्यांतील खासदार मित्रांचा ग्रुप केला, मैत्री वाढवली. मी मांडलेल्या मदरशाच्या प्रश्नावर जेव्हा संसदेत हंगामा झाला, सभागृह पाच मिनिटांसाठी तहकूब झाले आणि अरुण जेटलींसह, गिरीराज सिंग आदी काही मंत्र्यांनी माझ्या



त्या धाडसाचे कौतुक केले. तेव्हा हत्तीचे बळ आले. तेच सातत्य कायम ठेवले म्हणून संसदरत्न, महासंसदरत्न पुरस्काराने सन्मान झाला.

संसदरत्नसाठी तयारी काय केली याविषयी मी थोडेसे सांगणार आहे. तिथे एक माहितीपुस्तिका मिळते. ती हिंदी आणि इंग्लिमध्ये असते. मी त्यासाठी काही हिंदीची पुस्तके घेऊन त्याचे वाचन सुरू केले. हिंदी सुधारावे म्हणून प्रयत्न केले. लोकसभेत प्रश्न कसे मांडायचे याची माहिती घेतली. दिल्लीतच त्यासाठी काही माणसे शोधली आणि चांगले पीए घेतले. अगदी पहिल्या अधिवेशनापासून मी लोकसभेत प्रश्न टाकायला सुरूवात केली. नवीन सभासद असल्याने त्या वेळी २००-२५० प्रश्न येत असत. नवीन सदस्यांना समजायला उशीर लागतो, पण मी अगदी सुरूवातीपासून प्रश्न टाकायला सुरूवात केल्याने माझे प्रश्न सर्वाधिक लागत गेले. नंतर काही सदस्य प्रश्न टाकतात पण, माझी त्याबाबतची आघाडी कायम राहिली. नंतरच्या काळात प्रश्नांवर संसदेत बोलायला सुरूवात केली. नवीन असल्याने बोलताना काही चुका व्हायच्या, काही मराठी शब्द यायचे. एक मात्र नक्की, मी न डगमगता बोलत राहिलो. पक्षाकडून बोलणारे होते मात्र, संधी मिळेल त्या वेळी मी विविध विषयांवर माझे विचार मांडत राहिलो. पुरवणी मागण्यांवर बोलत होतो. झिरो आवर मध्ये बोलायला मिळावे म्हणून थांबून राहायचो. जास्त वेळ थांबलो की झिरो आवर मध्ये रोज बोलायचो. कामकाजातील असे सगळे बारकावे मी समजून घेत गेलो. सुदैवाने लोकसभा

अध्यक्षा सुमित्रा महाजन या मराठी भाषिक होत्या, त्यांच्याशीही सतत संवाद ठेवला म्हणून जमत गेले.

## माझ्या या प्रश्नावर लोकसभा तहकूब झाली

संसदेत एका मुद्यावर मी थोडे भावनाशील बोललो होतो. जे मदरसा असतात त्यात दिल्या जाणाऱ्या शिक्षणात काही लहान मुलांची डोकी फिरवली जातात. चुकीच्या पद्धतीने मुलांना शिक्षण दिले जाते या तारांकित प्रश्नावर त्या वेळी काही खासदार उठले आणि मोठा गोंधळ झाला होता. पाच मिनीटे सभागृह तहकूब झाले होते. नंतर बरेचशे मंत्री येऊन भेटायला लागले, 'हा मुद्दा उपस्थित करून यावेळी तुम्ही धाडस केले' अशी कौतुकाची थाप अनेकांनी दिली. पुढे वित्तमंत्री अरुण जेटलींनी मला खास बोलावून घेतले. सभागृहात बोलण्याचे हे सातत्य मी कायम ठेवले.

## कुपोषणाच्या विषयावर सभापतींचे निर्देश

देशाच्या संसदेत महत्त्वाच्या प्रश्नांवर मी कायम बोलण्याचा प्रयत्न केला. दहा वर्षांत अनेक प्रश्न विचारले. कुपोषित बालकांचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न मी विचारला होता. मतदारसंघातील कर्जत तालुक्यात कुपोषित बालकाचा मृत्यू झाला होता. मंत्रिमंडळात त्या खात्याची जबाबदारी स्मृती इराणी यांच्याकडे होती. त्या विषयावर मी सरकारला विचारले होते की कुपोषणमुक्त देश कधी होणार आणि त्यासाठी सरकार काय करणार? विषयाचे गांभीर्य लक्षात आल्याने संसदेत त्या वेळी सभापती सुमित्रा महाजन यांनीही माझ्या प्रश्नाला दुजोरा दिला आणि हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे, याबाबत सरकारने तत्काळ कार्यवाही करावी, असे निर्देश दिले होते. असे अनेक प्रश्न मी मांडले. जनतेचा आवाज बनण्याचा प्रयत्न केला.

## संसदरत्न, महासंसदरत्न सन्मान

काही लोक दिल्लीला येतात. त्यांना उत्सुकता असते, आपला माणूस दिल्लीत आहे. त्यांची विचारपूस करणे, राहण्याची आणि जेवणाची सोय करणे, तसेच संसद दाखवणे हे नेहमी करत गेलो. माणूस कुठलाही असो, मग तो मतदारसंघातलाच असतो असेही नाही. या लोकांना आपला माणूस दिल्लीत कसे काम करतो याची उत्कंठा असते, वेगळी आपुलकी असते. हा दिल्लीतील

लोकसंपर्क, संवाद, सातत्य मला कामाला आले. मी जसे कामकाज करतो तसे इतरांनीही सुरू केले. माझ्याबरोबरचा ग्रुप होता. श्रीकांत शिंदे कायम बरोबर राहायचा. आताचे नागरी उड्डाण मंत्री राम नायडू होता. दुष्यंत चौटाला, राहुल कासवा, राहुल शेवाळे असा ग्रुपच होता. कामकाजातला सहभाग, सातत्य, मंत्र्यांच्या गाठीभेटी यामुळे मला लोकसभेत चांगले काम करता आले. त्याचा परिणाम असा झाला की, २०१९ ला माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दूल कलाम यांनी स्थापन केलेल्या प्राइम टाइम या संस्थेने दखल घेतली. ही संस्था देशभरातील खासदारांचे पार्लमेंटमधील अधिकृत रेकॉर्ड संसद सचिवांकडून घेते आणि उत्कृष्ट कामकाज केलेल्या खासदाराला पुरस्कार देत असते. तोच संसदरत्न पुरस्कार मला सातत्याने मिळत गेला. कालांतराने संसदमहारत्न पुरस्कार मिळाला.

***





सन २०२० मध्ये काय घडलं!

# आणि पक्षांतर्गत आग धुमसत होती...

**एखादे बंड किंवा बदल, परिवर्तन होत असेल तर, त्याची जाणीव आणि पडसाद अगोदर उमटत असतात. त्या वेळी आम्हाला उद्धव साहेबांनी जबाबदाऱ्या दिल्या. निरीक्षक म्हणून पाठविले जात असे. मला मणिपूर निवडणुकीमध्ये प्रभारी म्हणून पाठवले.**

एखादे बंड किंवा बदल, परिवर्तन होत असेल तर, त्याची जाणीव आणि पडसाद अगोदर उमटत असतात. त्या वेळी आम्हाला उद्धव साहेबांनी जबाबदाऱ्या दिल्या. निरीक्षक म्हणून पाठविले जात असे. मला मणिपूर निवडणुकीमध्ये प्रभारी म्हणून पाठवले. तसेच राज्याच्या अनेक ठिकाणी गेलो. दुष्काळ, अतिवृष्टी आली की, तिथे आम्हाला पाठवले जायचे आणि तिथून आल्यानंतर आम्ही एक अहवाल द्यायचो. पण, काही दिवसांनी असे लक्षात आले, रिपोर्ट दिल्यानंतर काहीच होत नाही. वास्तविक आम्हाला पाठवल्यानंतर तेथील पदाधिकाऱ्यांकडून किंवा आम्ही दिलेल्या सूचनांवर कार्यवाही होणे

अपेक्षित होते. कारण आपण हेच एखाद्या ठिकाणी जातो. त्या पदाधिकाऱ्यांना काही अपेक्षा असतात. त्यावर उपाययोजना होणे गरजेचे असते. मात्र, अहवाल देऊनही काही कारवाई होत नव्हती. त्यानंतर राज्यात सहा महिन्यांतच स्थित्यंतरे झाली आणि आम्ही विरोधात बसलो.

## सत्तांतर झाले, युती तुटली आणि कामे होणे बंद झाले

२०१९ मध्ये राज्यात सत्तांतर झाले. उद्धव साहेब मुख्यमंत्री झाले. शिवसैनिकांना खूप आनंद झाला. मात्र, केंद्रात असणारी युती तुटली. आणि मग घुसमट होण्यास सुरूवात झाली. काय झाले, हे जाणून घेण्यास आपण उत्सुक असालच...

राज्यातील सत्तांतर आणि केंद्रातील तुटलेली युती आमच्यासाठी वेगळा अनुभव देणारी होती. आणि आमच्या संघर्षाचा काळ सुरू झाला. मग कोणतीच विकासकामे होईनात.जे मंत्री आमचे काम चुटकीसरशी करायचे ते मंत्री आम्हाला विचारायचे नाहीत. कोणतेही काम व्हायचं नाही, त्या वेळेस आम्हाला जाणवायचे, की सत्ता आणि विरोधातील काय वागणूक मिळते. तरीही आम्ही ठीक म्हणायचो. कारण, नेत्यांनी घेतलेला निर्णय हा शिरसावंद्य मानून आपण पुढे जायचं असतं, अशी आमची भूमिका होती. अडीच वर्षांचा कालखंड खूप कठीण गेला. राज्यात सत्ता होती, मात्र राज्याच्या माध्यमातून ताकद मिळाली नाही. विकासनिधी मिळाला नाही. आमदारांपेक्षा खासदारांना महत्त्व दिले नाही.

## कोरोना काळातील अहर्निश सेवा!

एकाच दिवशी जग बंद होते, ही संकल्पना किती भयानक असते, याचा अनुभव कोविडच्या कालखण्डात आला. रस्ते, बाजारपेठा बंद हा अनुभव एकदम भयानक, जीवघेणा होता. सर्वत्र वेगळेच वातावरण होते. कोणीही कोणास भेटत नव्हते. लॉकडाऊन करण्यात आला होता. हॉस्पिटल फुल्ल झाले होते. गोरगरिबांना, हातावरचे पोट असणाऱ्यांना दोन वेळेसचे जेवण मिळणे कठीण झाले होते. परंतु, आपण सामाजिक, राजकीय जीवनात असल्याने प्रत्यक्ष मैदानावर राहून काम केले. याचे फलित लोकसभेला माझा विजय झाला.

कोरोनाचा काळ अतिशय भयानक होता. शासकीय कर्मचारी, आरोग्य सेवक, डॉक्टर असतील, नर्स असतील, आशा वर्कर असतील यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून काम केले. अनेक पत्रकारसुद्धा मागे वळून न पाहता या




प्रसंगात प्रसिद्धी देण्यासाठी या सर्व प्रक्रियेत होते. या काळातील तो कडेकोट बंद म्हणजे सर्वत्र स्मशानशांतता होती. या काळात कोरोना संदर्भातील काही शासकीय बैठकांसाठी मी पुण्याहून रायगडला जायचो तेव्हा एक्सप्रेस वे पूर्णतः रिकामा असायचा, तो शुकशुकाट अनुभवला. भल्या मोठ्या रस्त्यावर फक्त शासकीय वाहने असायची. शहरातील आताची वाहतूक कोंडीची समस्या पाहिली आणि त्या वेळेचे ते वेगळेच चित्र जीवनात पाहायला मिळाले. या सगळ्या परिस्थितीत आम्ही प्रत्यक्षपणे काम केले. कोरोना काळात आम्ही मास्क पाहिला नाही, की वेळेचे भान ठेवले नाही. कोरोनामधून लोकांचा जीव वाचवणे, वैद्यकीय मदत पोहचवणे, औषधांचा साठा, ऑक्सिजन पुरवठा आहे की नाही याची खात्री करून घेणे अशा सर्व सेवा पुरविण्याकडे लक्ष दिले. कोरोनामुळे खूप काही शिकता आले. एक निश्चित आहे, आयुष्यात कोरोना काळातील ती दोन वर्षे मी खासदार म्हणून जे जे काम केले ते कधी विसरणार नाही.

आम्ही कोविडसाठी रस्त्यावर उतरलो. अत्यंत भीतीचे वातावरण होते. कोविड सेंटरला भेट देऊन मदत करायची. अधिकाऱ्यांच्या बैठका घ्यायच्या. कोविडच्या काळामध्ये सातत्य ठेवलं. अनेक लोक घरामध्ये बसले होते. मात्र, आम्ही रस्त्यावर उतरून लोकांना मदत करत होतो. अनेक ठिकाणी कोविड सेंटर सुरू केली. हॉस्पिटलला सीएसआरमधून मदत, त्याचबरोबर व्हेंटिलेटर, मास्क, ऑक्सिजन अशी शासकीय पातळीवर लोकांना जेवढी मदत मिळवून देता येईल,

तेवढी देण्याचा प्रयत्न केला. तसेच खालापूर रसायनीतील कारखान्यापासून ऑक्सिजन पुण्याला आणण्यासाठी मदत केली होती.

खरे तर, दोन ते अडीच वर्षांच्या कालखंडामध्ये विकासात्मक कोणती कामे झाले नाहीत. परंतु, लोकांमध्ये राहिल्याचा फायदा २०२४ मध्ये झाला. त्यामुळे सातत्य टिकवले.

कोविड संपतो ना संपतो तोच पक्षात अंतर्गत धुसफूस सुरू होती. आम्ही उद्धवसाहेबांना सांगत होतो, की पक्षप्रमुख म्हणून आता तुम्हाला भूमिका घ्यावी लागेल. पक्ष टिकला, तर आपण सगळं काही करू शकतो. परंतु स्वतः साहेब एक दिवस ते म्हणाले, 'ज्यांना जायचे त्यांनी जा' मीही साहेबाना म्हणालो, 'तुम्ही मुख्यमंत्री असताना आम्हाला निधी देता आला नाही. विकासकामे करता आली नाहीत, केंद्रात आमची कामे होत नाहीत. अधिकारी ऐकत नाहीत, पोलीस ऐकत नाहीत. मग आपली सत्ता असून काय उपयोग? खरे तर, या सगळ्या गोष्टी मीही त्यांना सातत्याने सांगत होतो. आणि त्यातूनच मोठा उद्रेक झाला.

## मी मनाचे ऐकले !

उद्धवसाहेब की शिंदे साहेब असा निर्णय कसा घेतला अशी उत्सुकता सर्वांना आहे. खरे तर, लोकसभेत मी आणि श्रीकांत आम्ही बरोबरच काम करत होतो. श्रीकांत मला माझ्या मुलासारखा. केंद्रात त्याला आम्ही सगळेजण सांभाळून घ्यायचो. मी, राहुल आणि श्रीकांत एक दिवस गप्पा मारत बसलो होतो. तो मला म्हणाला, 'आप्पा तुम्ही सगळे माझ्याबरोबर राहिले पाहिजे.' अशी थोडी भावनिक साद घातली. एकीकडे भावना आणि एकीकडे पक्ष असे दोन महत्त्वाचे प्रश्न माझ्यासमोर उभे राहिले. मात्र, तिथे मी भावनेला महत्त्व दिलं आणि श्रीकांत बोलतोय त्याला आपण साथ देऊयात, असा निर्णय मी व राहुळ शेवाळे यांनी सर्वप्रथम घेतला. त्यानंतर सर्वांनी एकत्र बसून चर्चेने तो निर्णय घेतला.

त्या वेळेच्या सगळ्या गोष्टी कठीण होत्या. साहेबांचा माझ्यावर विश्वास होता. एक दिवस उद्धव साहेबांचा फोन आला. त्यांनी मला विचारले, 'खासदारांमध्ये काही गडबड आहे का?' तर मी त्यांना म्हटले, 'हो साहेब निश्चितच गडबड आहे.' मग आमची मीटिंग झाली. तीन तास मीटिंग झाली, चर्चा झाली. मात्र, कोणताही मार्ग निघाला नाही. मला असे वाटते, 'या सगळ्या



गोष्टी होत असताना, साहेबांना कोणी खरी माहिती देत नव्हते. जे विरोध करतात ते जाऊद्यात, पुढे आपण पक्ष मजबूत करू, असे त्यांचे मत होते. पण त्या वेळी परिस्थिती वेगळीच होती. कारण, शेवटी सत्ता पाहिजे होती. कारण सत्तेच्या विरोधात राहिल्यानंतर काय होतं, सत्तेचे महत्त्व सगळ्या आमदार आणि खासदार यांना माहिती होते आणि त्यातूनच उद्रेक झाला होता.

## तो निर्णय केवळ श्रीकांतसाठी घेतला

कोविड संपतो नाही, तोच राज्यात काही राजकीय समीकरणे बदलत गेली. एकनाथजी शिंदे साहेब यांनी निवडणुकीतून झालेल्या मानापमानातून एक वेगळा निर्णय घेतला. पक्ष पातळीवर अनेक बैठका घेतल्या. त्यात काही आमदार-खासदार होते. नंतर काही आमदार सोडून गेले. खासदारांबरोबर बैठक झाली. त्या वेळी पक्ष टिकविण्यासाठी आम्ही सांगत होतो. खासदार श्रीकांत शिंदे मला अगदी मुलासारखा. तो लोकसभेत आल्यावर कायम माझ्याबरोबर होता. आमची जवळीक होती. त्या वेळी तो मला सारखे सांगत होता, आप्पा निर्णय घ्यावा लागेल. मात्र, मला कोणालाच अगदी उद्धव साहेबांनासुद्धा दुखवायचे नव्हते. दुसरीकडे माझे आणि श्रीकांतचे एक वेगळेच असे भावनिक नाते होते. भावनेचा मुद्दा होता. त्यात मला सगळे सोडावे लागले आणि मी निर्णय घ्यायचा ठरवले. अगदी मनावर दगड ठेवून निर्णय घेतला. नंतर मी श्रीकांतला बोललो सुद्धा, मला खूप कठोरपणे हा निर्णय घ्यावा लागतोय. एक तर मी राजीनामा देऊन तुझ्या

बरोबर येईल किंवा तू मला सांग काय करायचे ते.'

त्या वेळी श्रीकांतने मला अडवले आणि म्हटले, 'नाही, आप्पा तुम्ही असे राजीनामा वगैरे काही देऊ नका. तुम्ही निर्णय घेतला तरच बाकीचे सर्व त्याला साथ देतील.' नंतर आम्ही काही खासदार एकत्र बसलो. राहुल शेवाळे आणि आम्ही बसून सविस्तर चर्चा केली. शेवाळे हे पूर्वीपासूनचे माझे सहकारी होते. त्यांचेसुद्धा तेच मत होते की, आपण सगळे मिळून निर्णय घेऊ, जे काय व्हायचे ते होईल.' अशा प्रकारे आम्ही सगळ्यांनी मिळून निर्णय घेतला आणि एकनाथ शिंदे साहेबांच्याबरोबर जायचे ठरवले. असे करत एक एक जण जोडले गेलो आणि १२ जण बरोबर राहिलो.

## त्या काळात प्रचंड मोठी मदत केंद्र-राज्याने केली

शिंदे साहेबांच्या बरोबर जायचा निर्णय घेतल्यावर खूप कठीण परिस्थितीतून जावे लागले. अनेकांनी टीका केली. सोशल मीडियातून बरीच काही टीकाटिप्पणी झाली. कोणी अपप्रचार करत होते. कुठे कार्यक्रमाला गेलो, तर तिथेही अपमानित व्हावे लागले. दोन-अडीच वर्षे खूप सहन करायला लागले. एका वेगळ्या परिस्थितीतून आम्ही गेलो. नंतर मात्र एक झाले, शिंदे साहेबांनी मुख्यमंत्री म्हणून मतदारसंघातील प्रत्येक कामात प्रचंड मोठी अशी मदत आम्हा सर्वांना केली. राज्याबरोबर केंद्र सरकारनेसुद्धा विकासकामांसाठी भरभरून निधी दिला. शेवट एक खरे आहे की, सत्तेच्या माध्यमातूनच विकासकामे होतात. आम्हाला असंख्य कामे करता आली. आणि मतदारांना तेच हवे असते. मतदारांनी विकास करण्यासाठीच निवडून दिलेले असते आणि ते आम्ही करत गेलो.

***





## सन २०२४ आणि बदल घडत होता

# आरोप-प्रत्यारोपांची राळ उठली आणि...!

**२०२४ च्या निवडणुकीपूर्वी आरोप–प्रत्यारोप होत होते. मला तिकीट मिळणार नाही, अशा अफवा पसरविल्या जात होत्या. मात्र, हे सगळं खोटं होते. भाजपाबरोबर शिवसेना ज्यावेळी गेली, त्या वेळी आमच्या उमेदवाऱ्या निश्चित झाल्या होत्या. काय घडले, हे जाणून घेऊयात.**

शिवसेनेत वादळ होण्यापूर्वी उद्धव साहेब राज्याचे मुख्यमंत्री होते. मात्र, त्यांना पक्षात काय चाललंय, ते माहीत नव्हतं. आम्ही त्यांना वारंवार सांगितलं, सत्ता असूनही आपली कामं होत नाहीयेत. परंतु ते त्यांच्या विचारांवर ठाम होते. त्यांचा विचार होता, ज्यांना जायचे त्यांना जाऊ द्या. आपण पुन्हा पक्ष उभा करूयात. उद्धवसाहेबांचे असे मत असले, तरी आम्ही सत्ता पाहिली होती. सत्तेच्या विरोधातही राहिलो होतो. सत्ता असतानाही काही मदत झालेली नव्हती. सत्तेत असतानाही आम्हाला अडीच वर्षे वाटायचे, 'आम्हीच विरोधात आहोत काय. यापुढे काय मिळणार!' अशीच भावना सर्वांमध्ये होती.




त्या वेळी माझ्या मनात एक प्रश्न आला, की आता पक्ष सोडण्याची गरज नाही. कारण, लोकसभा निवडणुकीस दोन वर्षांचा कालावधी होता. आता निर्णय घेऊन काय उपयोग आहे. एक दिवस देवेंद्र फडणवीस यांचा फोन आला; 'तुम्ही सगळे एकत्र बसा. चर्चा करा.' एकनाथ शिंदे साहेब यांच्या मुंबईच्या नंदनवन या निवासस्थानी आम्ही सगळे बसलो. त्या वेळेस साहेबांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती. पण, ते नंदनवनमध्येच राहत होते. त्या वेळी देवेन्द्रजीही उपस्थित होते. वेळ रात्रीची होती. आम्ही बसलो, त्या वेळी सगळे खासदार म्हणाले, 'निर्णय घ्यायचा असेल. आम्हाला सिक्युरिटी काय? भविष्यात उमेदवारी मिळाली नाही तर काय?' त्यावर ते म्हणाले, 'ही जबाबदारी माझी.' त्या वेळेस आमच्या मनात विचार आला, आपल्याला याबाबत दिल्लीच्या नेतृत्वाकडून आश्वासन मिळायला हवे. मग, आम्ही देवेन्द्रजींकडे आमची भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर मग दिल्लीमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शहा यांच्याबरोबर अडीच तास बैठक झाली. त्या वेळेस आम्ही आठ खासदार उपस्थित होतो. सविस्तर चर्चा झाली. आम्ही आमची भूमिका मांडली. शहासाहेब यांनी आम्हाला आश्वासन दिले. अमितभाई यांचा बेधडक स्वभाव आवडतो. ते म्हणाले, 'आप सभी सांसद शिंदेजी को साथ देकर आयीऐ। आपके चुनाव क्षेत्र में मैं आपको उमेदवारी देने की और चुनाव में मदद करणे की जिम्मेदारी हमारी. अब हम सब मिलके काम करेंगे.' असा विश्वास त्यांनी दिला. आणि आम्ही सर्वांनी सामूहिकपणे निर्णय घेतला.



आम्ही पूर्वीपासूनच महायुती म्हणून भाजप-शिवसेना एकत्रितपणे निवडणूक लढलो होतो. पुढे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर जाणे मनाला पटत नव्हते आणि मतदार पण ते मान्य करणार नाही, अशी आमची धारणा झाली होती.

## असा तयार झाला शिवसेनेचा गट आणि निवडला गटनेता

मुख्यमंत्री शिंदे साहेबांबरोबर जाण्यासाठी एकेक करून आम्ही एकत्र येत गेलो आणि १२ जणांचा गट तयार झाला. या विषयी मुंबईमध्ये बैठक झाली. त्या वेळेस देवेंद्रजींनी एक ड्राफ्ट घेऊन दिला. अर्थातच गटनेता निवडी संदर्भातील पत्र होते. त्या पत्रावर प्रतापराव जाधव, राहुल शेवाळे यांनी सही केली आणि पत्र माझ्याकडे आले. त्यावर गटनेता म्हणून भावना गवळी यांचं नाव होतं अर्थातच भावना गवळी यांना गटनेता करायचं ठरलं होतं. गवळी या गटनेता असतील तर मी नाही सही करणार अशी भूमिका घेतली. त्यावर मुख्यमंत्री शिंदे साहेब म्हणाले, 'काय झाले?' त्यावर त्यांना मी माझी भूमिका समजून सांगितली. या परिस्थितीत कणखर हुशार गटनेता पाहिजे. त्यावर देवेंद्रजी म्हणाले, 'आता आपण निवड करू आणि नंतर बदलू.'

खरे तर, मी महापालिकेच्या राजकारणातही गटनेता निवडीचे आणि त्या संदर्भात असणाऱ्या प्रक्रियेस जवळून अनुभवलं होते. गटनेत्याची निवड आणि त्यात काही बदल करायचा असेल, तर त्यासाठीची प्रक्रिया सोपी नव्हती. म्हणून

मी त्यांना म्हटले, 'बदलायचे असेल तर आत्ताच बदलावे लागेल.' तेवढ्यात श्रीकांत शिंदे तिथे आले. त्यांना आम्ही सांगितले, 'आपण या पत्रावर नंतर सह्या करू.' त्यावर श्रीकांत शिंदे म्हणाले, 'आजच सह्या करून हे पत्र पुढे जायला हवे.' त्यानंतर काही वेळाने श्रीकांत यांनी पत्र बदलण्याचा निर्णय घेतला. त्या वेळेस कुणाला गटनेता करायचं त्यावर चर्चा झाली. आप्पा तुम्ही गटनेता व्हा,असे राहुल शेवाळे मला म्हणाले. त्यावर मी म्हटले,'आपण राहुल शेवाळे यांना गटनेता करू.' त्यास प्रतापरावांनीही हिरवा कंदील दिला आणि १२ जणांचा ग्रुप झाला. पुढे न्यायालयात दावा दाखल झाला. पुढे काय झाले हे सर्वांनाच माहीत आहे. तो काळ खूप कठीण होता. मात्र, आमच्या विरोधात बोलायला काही मुद्दा नव्हता. कारण आम्ही दगा देऊन गेलो नव्हतो. सगळ्या गोष्टी पक्ष नेतृत्वाला सांगत होतो. त्यावर प्रचंड विचारमंथनही झाले होते.

## उद्धव साहेबांशी बोललो आणि मन मोकळं झालं

आम्ही निर्णय घेतला त्या वेळी खूप विचारमंथन झाले होते. अंतिम निर्णय घेताना, उद्धव साहेबांना सोडताना घरातील सदस्य मला सांगत होते, 'आपण जरा विचार करायला हवा. उद्धव साहेबांनी आपल्याला संधी दिली. कुठलीही नाराजी नव्हती. सोडून जाताना त्यांना सांगायला हवे.' त्यावर मी उद्धव साहेबांना मला आपणाशी बोलायचे आहे, असा मेसेज टाकला. त्यानंतर त्यांचा फोन आला आणि ते म्हणाले, 'घेतला का निर्णय' त्यावर मी त्यांना म्हणालो, 'साहेब, मला तुमच्याशी बोलायचं आहे, माझ्या भावना व्यक्त करायच्या आहेत. माझ्या मतदारसंघामध्ये भाजप-शिवसेना एकत्र राहिले तरच पुढे जाऊ शकतो. आज जरी राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस तुमच्याबरोबर आहे. परंतु लोकसभेला ते माझं काम करणार नाहीत. त्यामुळे मला माझा पराभव दिसतोय आणि पराभव झालेल्या उमेदवाराला तुमच्याकडे काहीच किंमत नाही, हेही मी जवळून पाहिले आहे. खासदार शिवाजीराव आढळराव पाटील हे पराभूत झाल्यानंतर त्यांची परिस्थिती मी पहिली होती, त्यामुळे राजकारणात टिकण्याच्या दृष्टीने आणि भविष्यकालीन दृष्टीने मला काहीही पर्याय नाही. त्यामुळे मला निर्णय घेणे गरजेचे आहे.' त्यावर साहेब म्हणाले, 'एकमात्र मला खूप चांगले वाटले की एक तरी खासदार मला सांगून बाहेर पडतोय.' उद्धव साहेबांशी बोलल्यानंतर मन हलकं



झालं. समाधान होतं, आपण आपल्या भावना पक्षनेतृत्वाला सांगितल्या.

## सत्तेची ताकद आणि पुन्हा कामे होऊ लागली

आपण जरी राजकारणी असलो, तरी मैत्री जपावीच लागते. केंद्रात काम करताना खासदार श्रीकांत शिंदे यांच्याशी राजकारणाव्यतिरिक्त माझं नातं होतं. तो एकदा मला म्हणाला, 'आप्पा, तुम्हाला एक निर्णय घ्यायचा आहे.' त्यावर मी त्याला गमतीने म्हटलो, 'मी तुझ्यासाठी राजीनामा द्यायला तयार आहे. पण मला पक्ष सोडायला लावू नकोस.' कारण माझ्या मनाला ते पटत नव्हतं. त्यावर श्रीकांत शिंदे मला म्हणाले की, 'आप्पा, तुम्ही निर्णय घेतला नाही तर, अन्य सदस्यही निर्णय घेणार नाहीत. तुम्ही या सर्व गोष्टींमध्ये पुढाकार घ्या.' त्या वेळी मी मनाचे ऐकले आणि निर्णय घेतला. पुढे खूप स्थित्यंतरे घडली. मग, आमच्या विषयी माध्यमांमध्ये चर्चा रंगू लागल्या, आरोप-प्रत्यारोप होऊ लागले. खोके, गद्दार, अशी टीका होऊ लागली. परंतु आता निर्णय घेतला होता आणि मागे वळून पाहायचे नव्हते.

पुढे जात असताना मुख्यमंत्री शिंदे साहेबांनी ताकद दिली. राज्याचे मुख्यमंत्री असल्याने त्यांनी मदत केली. सत्ता काय असते याचा अनुभव आला. आपल्या विचारांचे अधिकारी आणण्यासाठी त्यांनी मदत केली. निधी दिला. कामे होऊ लागली. पर्यटन, नगरविकास या माध्यमातून मावळात निधी यायला

लागला. एकवीरा गडासाठी निधी, लोणावळा पर्यटनासाठी निधी मिळू लागला. मुख्यमंत्री असल्याने केंद्रातील रेल्वेची कामे मार्गी लागू लागली आणि असे वाटायला लागले, सत्ता असेल आणि सरकारची साथ असेल तर खूप काही करता येतं. सत्ता नसेल तर, काम करता येत नाही, कामेही होत नाहीत. पुणे-मुंबई लोहमार्गाच्या तिसऱ्या, चौथ्या ट्रॅकसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करून घेतली. त्याचबरोबर उरण येथील करंजा बंदरच्या मच्छीमारांचा प्रश्न सोडवला. पर्यटन, रस्तेविकास असा या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधी मतदारसंघात आणता आला.

***





### सन २०२४ लोकसभा निवडणूक

# अशी केली तयारी अन् मिळविला विजय!

**निवडणूक कोणतीही असो त्यामध्ये जनतेशी संवाद लोकांची कामे केली की, यश हमखास मिळते. याचा अनुभव आजवरच्या निवडणुकीमध्ये आला आहे. कोरोना कालखंडामध्ये आम्ही केलेल्या कामाचे यश २०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये मिळाले. जनताबरोबर असेल तर, तुम्हाला कोणीही हरवू शकत नाही.**

खरे सांगायचे झाले तर, लोकसभा सदस्याला निधीच्या मर्यादा असतात. मात्र, अडीच वर्षांच्या कालखंडात राज्याच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधी आणण्याचा प्रयत्न केला. मोठ्या प्रमाणावर विकास झाला. राज्य सरकारच्या मदतीनेही वेगवेगळी काम करू शकलो, याचे समाधान आहे. लोकांची कामे केली, संवाद ठेवला, तर यश निश्चितच मिळतं याचा अनुभव २०२४ च्या निवडणुकीमध्ये आला.

त्या वेळेसचे राजकीय वातावरण वेगळे होते. त्या वेळी भाजपही साहजिकच हा मतदारसंघ आपल्याला मिळावा, अशी मागणी करीत होता. मात्र, मला शंभर



टक्के खात्री होती. कारण केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शहा यांनी आम्हाला शब्द दिला होता. तसे पाहिले तर शेवटी आमचाही त्याग होता. आम्ही आमचं सगळं राजकीय भविष्य पणाला लावले होते. राजकीय घडामोडी घडत असताना मला तिकीट मिळते, नाही मिळते अशी खूप चर्चा बाहेरच सुरू होती. मात्र, मला खात्री होती. त्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप स्थानिक नेत्यांनी आरोप केले. मात्र, मी त्यांना कोणत्याही प्रकारचे उत्तर दिले नाही. कारण, उमेदवारी मलाच मिळणार होती, याची खात्री होती. आरोप झाला, की मला कार्यकर्ते येऊन सांगायचे. आप्पा आपण पत्रकार परिषद घेऊ. आपण आपली भूमिका स्पष्ट करायला हवी, विरोधकांच्या आरोपांना उत्तर द्यायला हवे. परंतु मी त्यांना सांगायचो, की तिकीट आपल्यालाच मिळणार आहे आणि उद्या त्यांची आपल्याला मदत हवी आहे. आपण सगळे थोडे दिवस थांबा. त्यांना आपल्याबरोबर काम करायचं आहे. त्या कालखंडामध्ये मी खूप संयमाने काम केले. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर बरेच रुसवे-फुगवे होते. ते दूर केले.

भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांची नाराजी दूर करण्याकरिता देवेंद्रजी फडणवीस आणि चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी बैठका घेतल्या

लोकसभेची चर्चा सुरू झाल्यानंतर तीन महिने अगोदर माजी महापौर संजोग वाघेरे यांची उमेदवारी शिवसेना(उबाठा)महाविकास आघाडीकडून निश्चित झाली. त्या वेळी अधिवेशन सुरू होते.काही कार्यकर्ते येऊन मला म्हणाले, ‘विरोधी उमेदवाराने



प्रचार सुरू केला आहे. आपण तयारी करायला हवी.' त्या वेळेस मी त्यांना सांगितले, आपण पाच वर्षे तयारी केली आहे. लोकांचं काम केले आहेत. दिवस-रात्रं काम करत आहे. त्यामुळे आपण काळजी करायची नाही. त्यासाठी मी सहा महिने अगोदरच तयारी केली. कार्यकर्त्यांची फळी उभी केली होती. त्या कालखंडामध्ये मतदारांचा कल याबाबत सर्वेक्षण केले. आमच्या कार्यालयात २०० हून अधिक लोक काम करत होते आणि सातत्याने पाहणी अहवालांचे अवलोकन केले जात होते. अर्थातच निवडणूक कोणतीही असो. मी खूप नियोजनबद्धपणे काम करीत असतो. अर्थातच त्या वेळी केंद्रीय पातळीवरचे राजकारण वेगळं होतं, विरोधी पक्षांमधील तीन पक्ष एकत्र होते. त्या कालखंडामध्ये मीडियातही आमच्या विरोधात होता. अर्थात काही प्रमाणात नाराजीचा सूर असला, तरी माझ्या विरोधातील उमेदवार हा तितकासा सक्षम नव्हता. कारण ही लोकसभेची निवडणूक असते. त्याचे नियोजन आणि तंत्र वेगळे असते. संजोग वाघेरे यांनी ५ जानेवारीपासून प्रचाराला, मतदारभेटिला सुरूवात केली होती. मात्र, खरे तर, लोकसभेची निवडणूक आणि महानगरपालिकेची निवडणूक यामध्ये फरक असतो. त्याचे तंत्र वेगळे असते. कारण, या निवडणुकीतून देशाचे नेतृत्व निवडून द्यायचे असते. दुसरी आणि महत्त्वाची बाब म्हणजे, त्या कालखंडामध्ये महाविकास आघाडी, उद्धवसाहेब, शरद पवार साहेब यांना सहानुभूती होती. मात्र, सामान्य मतदार माझ्या पाठीशी होता. त्या वेळी आमच्या

## २०२४ : मावळ लोकसभा निवडणूक

मावळ लोकसभा २०२४ च्या निवडणुकीमध्ये एकूण मतदार २५ लाख ८५ हजार ०१८ होते. त्यांपैकी ६० टक्के मतदान झाले. यामध्ये १४ लाख १९ हजार ४०० मते वैध ठरली. या निवडणुकीत ३३ उमेदवार रिंगणात होते. त्यांपैकी महायुतीविरुद्ध महाविकास आघाडी अशी दुरंगी लढत झाली. या निवडणुकीत शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे विजयी झाले.

### मावळ लोकसभा निवडणुकीतील मतदान

| | |
|---|---|
| १) श्रीरंग आप्पा बारणे (शिवसेना) | : ६,९२,८३२ |
| २) संजोग भिकू वाघेरे (शिवसेना उबाठा) | : ५,९६,२१७ |
| ३) माधवी नरेश जोशी (वंचित बहुजन आघाडी) | : २७,७६८ |
| ४) राजाराम नारायण पाटील (बहुजन समाज पार्टी) | : १४,००३ |
| ५) ज्योतेश्वर विष्णू भोसले ( बळीराजा पार्टी) | : १०,८७९ |
| ६) नोटा | : १६,८७९ |

सहकाऱ्यांना मी सांगितले, 'आरोप-प्रत्यारोपात सामान्य लोकांना काही देणे-घेणे नसते. त्यांना उपलब्ध होणारा, आपले प्रश्न जाणून घेणारा आणि आपले प्रश्न सोडवणारा आपला लोकप्रतिनिधी पाहिजे असतो. निवडणूक प्रचार यंत्रणा राबविली. तीन पत्रके मतदारांपर्यंत पोहोचली. योग्य नियोजन केल्याने आणि महायुतीच्या एकजुटीमुळे विजय झाला. महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एकत्रित ताकद उभी केली. लोकसभेच्या २०१९ च्या निवडणुकीमध्ये झालेल्या पराभवाची सल कार्यकर्त्यांमध्ये असावी, म्हणून कदाचित राष्ट्रवादीच्या काही कार्यकर्त्यांनी काम केले नाही, हे वास्तव नाकारता येणार नाही. अजितदादांनी माझ्यासाठी बैठका घेतल्या होत्या. त्याचाही परिणाम विजयासाठी झाला. निकाल लागल्यानंतर याबाबत मी ही बाब मुख्यमंत्री शिंदे साहेब, फडणवीस साहेब, अजितदादांच्या कानावर घातली होती. या निवडणुकीत चिंचवड मधून आ. आश्विनीताई जगताप, शंकर जगताप, आ. अण्णा बनसोडे, आ. सुनिल शेळके, आ. बाळा भेगडे, आ. अमित गोरखे, मा.खा. अमर साबळे, रायगड विभागातून आ. प्रशांत ठाकूर, आ. महेंद्र थोरवे, आ. महेश बालदी या सर्वांनी माझे काम केले. त्यामुळे विजय झाला.

***





## राजकीय कारकीर्द घडताना...

# मार्गदर्शक व आदर्श नेते, मित्रांमुळे घडलो

**कधीही चिडायचे नाही. राग आला, तरी चेहऱ्यावर दाखवायचा नाही. कोणालाही दुखवायचे नाही. कोणी किती कटू बोलले तरी सहनशीलता असली पाहिजे. माझ्या जडणघडणीमध्ये विविध पक्षाचे राजकीय नेते, थोर समाजसेवक यांचे विचार मोलाचे ठरले.**

कधीही चिडायचे नाही. कोणालाही दुखवायचे नाही. कोणी किती कटू बोलले तरी सहनशीलता असली पाहिजे. प्रत्येकाचे शांतपणे ऐकून घ्यायचे. कोणाचाही फोन टाळायचा नाही. मोजके आणि मुद्देसूद बोलायचे. विषयाची सखोल माहिती घेऊनच बोलायचे. वेळप्रसंगी थोडे रोखठोक, स्पष्ट बोलायचे. हे मी मोठ्या नेत्यांकडूनच शिकलो. अगदी प्रा. रामकृष्ण मोरे सर, विलासराव देशमुख, बाळासाहेब ठाकरे या दिवंगत नेत्यांपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा तसेच शरद पवार, उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे यांच्यापासून अनेक दिग्गजांकडून आदर्श घेतला. आजवरच्या सर्व निवडणुकांत तेच कामी आले.



## बाळासाहेबांचा आशीर्वाद मिळाला

**बाळासाहेब ठाकरे :** प्रखर हिंदुत्ववादी नेते, हिंदु-हृदय-सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विषयी मला खूप आकर्षण होते. त्यांची भाषणे खूप आवडायची. त्यांच्या जाहीर सभांना आवर्जून जायचो. त्यांना भेटण्याचा योग मला २००९ मध्ये आला. ज्या वेळी शिवसेनेबरोबर जायचा निर्णय घेतला होता. शिवसेनेत गेल्यानंतर बाळासाहेब ठाकरे यांचा सहवास लाभला. त्यांच्याबरोबर बोलताना कार्यकर्त्यांना समजून घेणे, तसेच स्पष्ट शब्दांत उपदेश देणे, असे विविध गुण मला आवडले. एक आठवण या निमित्ताने सांगावीशी वाटते. त्यांच्याबरोबर मी एकदा गप्पा मारत होतो. त्या वेळेस लातूरचा एक कार्यकर्ता नजर चुकून वरच्या मजल्यावर त्यांच्या खोलीत आला. सुरूवातीला बाळासाहेबांनी त्याला विचारले, 'तू इथे कसा काय आलास?' त्यावर तो म्हणाला, 'साहेब, मी खूप कालखंडापासून तुम्हाला भेटायचा प्रयत्न करत आहे. मला भेटायचं होतं, म्हणून मी नजरचुकून आलो.' त्यावर बाळासाहेबांनी त्याला जवळ घेतले. दुसरा कोणी नेता असता, तर तो रागावला असता आणि त्याने त्या कार्यकर्त्याला बाहेर काढले असते. मात्र, बाळासाहेबांनी त्या कार्यकर्त्याला जवळ बोलावून त्याच्याबरोबर फोटो काढला व थापाला सांगितले, 'याला फोटा पाठवून दे.' यातून कार्यकर्त्याविषयी त्यांच्या मनात असणारे प्रेम दिसून आले. बाळासाहेबांना अनेकवेळा भेटण्याचा योग आला त्यांचा सहवास लाभला व त्यांचे आशिर्वाद घेता आले.

***



## साहेबही आले उद्घाटनाला

**शरद पवार :** छत्रपती शिवरायांचा पहिला आश्वरूढ पुतळा थेरगाव डांगे चौकात मी उभारला. मला शरद पवार यांचाही सहवास लाभला. मी काँग्रेसमध्ये असताना नानासाहेब शितोळे अध्यक्ष असताना पवार साहेब ग्रामीण भागाच्या दौऱ्यावर होते. मी नानासाहेब शितोळेंच्या बरोबरच पवार साहेबांच्या गाडीत होतो. नानासाहेब शहर काँग्रेसची यादी ठरवत होते. चिंचवडमध्ये काँग्रेसचा ब्लॉक कमिटी अध्यक्ष कोणाला करायचा हा विषय आला. त्यासाठी नानासाहेबांना वेगळे नाव दिले होते. माझ्या समोरच ती चर्चा सुरू होती. त्या वेळी पवार साहेबच म्हटले, 'अरे, श्रीरंगलाच का करत नाही?' तिथे मला प्रथम काँग्रेस ब्लॉक काँग्रेस कमिटी अध्यक्ष केले. तसा पवार साहेबांचा माझा संबंध आमचे थोरले बंधू हिरामणशेठ बारणे यांच्यामुळे राहिलेला होता. पूर्वीपासून ते आमच्या घरीपण यायचे. मुख्यमंत्री असतानाही ते घरी आले होते. विलासरावसुद्धा मुख्यमंत्री असताना दोन वेळा माझ्या घरी आले होते.

पवार साहेबांकडे मी छत्रपती शिवाजीमहाराजांच्या पुतळा अनावरणासाठी तारीख मागायला दिल्लीला गेलो होतो. मला म्हणाले, 'मी येतो पण तुमचे मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांना विचारा.' शिंदे यांचे माझे संबंध चांगले होते. मी शहर काँग्रेसच्या अध्यक्ष व्हावे यासाठी रजनी पाटील आणि संजय दत्त यांनी पुढाकार घेतला होता. या पदासाठी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी माझी शिफारस केली होती. योगायोगाने दोन्ही नेते उद्घाटनासाठी आले आणि माझ्या घरी भोजनासाठीसुद्धा आले होते. पवार साहेबांचा असा माझा कायम संपर्क येत राहिला. आतासुद्धा मी त्यांच्या वाढदिवसाला त्यांना भेटत असतो.

संसदेतसुद्धा त्यांना भेटत असतो. बोलत असतो. मी वेगळ्या पक्षात असलो, तरी कधी कटुता ठेवली नाही. अगदी अजितदादा सुद्धा भेटतात, बोलतात. सुरूवातीच्या काळात नगरसेवक असताना मी त्यांच्या बरोबरसुद्धा काम केले. शेवटी राजकारण मनात कटुता न ठेवता करायचे असते हे शिकलो. या नेत्यांचा सहवास जीवनात मोलाचा ठरला आणि तसतसा मी घडत गेलो.



## कार्यकर्त्यांना कसं जपावं हे कळलं

**विलासराव देशमुख :** मी नगरसेवक झालो. स्थायी समितीची निवडणूक लढवली. त्यातून अनेकांशी संपर्क आला. विलासराव देशमुख यांचा खास करून उल्लेख करावा लागेल. मुख्यमंत्री होते विलासराव देशमुख. अगदी शेवटपर्यंत त्यांच्याशी संबंध होते. कार्यकर्त्यांना कसं जपावं हे विलासरावांकडून शिकलो. कार्यकर्त्यांना ताकद, सन्मान देणारा नेता होता. ते आजारी असताना त्यांची मी भेट घेतली. याही परिस्थितीत त्यांनी माझी विचारणा केली. त्या वेळी मी शिवसेनेत होतो. यावरून नेते आणि कार्यकर्ते यांच्यामधील प्रेम दिसून येते.

त्यांचा एक गुण म्हणजे, कार्यकर्त्यांना बळ देणे. कधीही दुर्लक्ष करणार नाहीत, फोन टाळणार नाहीत. भेटलो तर तत्काळ काम समोरच्या अधिकाऱ्यांना सांगणार आणि मार्गी लावणार. त्यातून कार्यकर्त्याला बळ मिळते, हे मी पाहिले. समोरच्या कार्यकर्त्याला कधीही टाळायचे नाही हे शिकलो. कार्यकर्त्याची अपेक्षा काही नसते. आम्ही विलासरावांना भेटायला गेलो तर ते विचारणार, दोन मिनिटे का होईना भेटणार. 'का आला होता, काय काम काढले', याची विचारपूस करणार.

एकदा मी त्यांना दिल्लीला भेटायला गेलो होतो. ते कुठे तरी निघाले होते.

हनुमंता भोसले, नारायण बहिरवाडे बरोबर होते. आम्हाला पाहिल्यावर ते लगेच मागे फिरून आले कार्यालयात. ''का आला होतात, काही काम आहे का मी निघालो होतो, माझी फ्लाइट आहे.'' मी म्हटले, ''काही नाही सहज भेटायला आलो होतो.'' त्यातच असे वाटले, की आमच्या नेत्याने आम्हाला सन्मान दिला. या पद्धतीने पुढे जाताना नेते अनुभवले.

## एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे...

कधीही चिडायचे नाही, राग आला तरी दाखवायचा नाही हे मी या मोठ्या नेत्यांकडून शिकलो. सुमित्रा महाजन लोकसभेच्या सभापती होत्या. संसदेत खूप गदारोळ व्हायचा, हंगामा व्हायचा. त्या म्हणायच्या, मलापण त्रास होतो. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. कुठल्याही चिडणाऱ्या नेत्याकडे पाहणारे दहा जण असतात. राग आला तर तो व्यक्त करायचा नाही, मनात ठेवायचा. अनेक नेत्यांचे हे पाहत आलो.

पराभव झालेल्या नेत्यांचे पाहिले. रामकृष्ण मोरेंचा पराभव झाला होता. त्यावर विचार करताना आपल्या काही चुका झाल्या, त्या कोणत्या त्याचा ते विचार करत होते. विलासराव देशमुख यांचे मुख्यमंत्रिपद गेले आणि तिसऱ्या दिवशी मी त्यांच्याकडे गेलो. माझ्या एका पुस्तकाचे प्रकाशन करायचे होते. मला म्हणाले 'अरे, माझे मुख्यमंत्रिपद गेले. आता नवीन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कर' मी म्हटले, मला तुमच्या हस्तेच प्रकाशन करायचे. लगेच घरातच पुस्तक प्रकाशन केले. असेही पण पाहिले.

विलासराव तिसऱ्यांदा मुख्यमंत्री पदासाठी नाव जाहिर होऊन ते शपथ घेणार होते. त्यावेळी माझ्या गावातील ज्येष्ठ मार्गदर्शक, वकील सुदाम बारणे यांना घेऊन आम्ही साहेबांचे अभिनंदन करण्यासाठी मुंबईत गेलो. अगदी सकाळी साडेसात वाजताच वरळीला त्यांच्या बंगल्याच्या खाली पोहोचलो. खूप गर्दी होती. पण सर्व बॉडीगार्ड ओळखीचे असल्याने त्यांनी वरती सोडले, त्यांच्या घरात बसलो. विलासराव पहाटे तीन वाजता आले होते. तरी ते उठून आले. आम्ही त्यांचे अभिनंदन केले. आम्हाला बसवले आणि चहा मागवला, विचारपूस केली. हे सगळे पाहून माझ्या बरोबर आलेले बारणे खूप भारावले. 'राज्याचे एक मुख्यमंत्री पहाटे तीन वाजता आले असताना तुम्हाला ते त्यांच्या घरात आग्रहाने बसा म्हणतात, विचारपूस करतात, चहापान करतात. खरेच आप्पा, एक मुख्यमंत्री तुम्हाला इतका मान देतात हे पाहून बरे वाटले', अशी प्रतिक्रिया सुदाम बारणेंनी

बोलून दाखवली. त्यांच्याही मनात माझ्याबद्दलची प्रतिमा उंचावली. असे संबंध मी कायम टिकवले; शेवटपर्यंत. विलासरावांच्या आजारपणाबद्दल स्वीय सहायक अजिंक्य पडवळ यांच्याकडून समजले. त्यांना जाऊन भेटलो, तेव्हा मी शिवसेनेत होतो. त्या वेळीही त्यांनी माझी आवर्जून विचारपूस केली.

मुळात राजकारणात संबंध टिकवणे हाच एक महत्त्वाचा भाग असतो. तुम्ही कोणत्या पदावर गेलात, किती निवडणुका लढवल्या किंवा किती मोठे आहात याहीपेक्षा तुम्ही संबंध टिकवले पाहिजेत. तुमचे संबंध चिरकाल टिकवता आले पाहिजेत. त्यातूनच जनमानसात नकळत तुमची एक प्रतिमा तयार होत असते. लोकांत एक भावना निर्माण होते, की 'बाकी काही असू देत, हा माणूस चांगला आहे.' आणि तेच पुढे मतात रूपांतरित होत असते. कुठल्याही कार्यकर्त्याबद्दल आकस ठेवून किंवा सूडबुद्धी मनात ठेवून राजकारण करू नये. लोकांच्या हितासाठी काम केले, तर तुम्हाला वारंवार संधी मिळते. आणि एक आहे १०० टक्के कोणीही समाधान करू शकत नाही. परंतु, आपण वेळ देऊन सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत तर लोक आपल्याबरोबर राहतात. मी तेच सातत्य टिकवले म्हणून निवडणुकीला सामोरे जात असताना मला कधीही असे वाटले नाही, की माझा पराभव होईल. कारण माझा विश्वास जनतेवर, कार्यकर्त्यावर राहिला. निवडणूक कॉर्पोरेशनची असो, की ग्रामपंचायतीची; आपण निवडणूक लढविताना चांगल्या कामासाठी निवडणूक लढवतोय ही भावना सतत मनात ठेवली पाहिजे.



## कार्यकर्त्यांना बळ देणारे मोरे सर

**रामकृष्ण मोरे –** मी सरांच्या सोबत फिरायचो. विलास कामठे मला

घेऊन जायचे. आम्ही सरांच्या सोबत मतदारसंघातील कार्यक्रमासाठी गाडीत फिरायचो. त्यांची काम करण्याची पद्धत, अभ्यासू वृत्ती, लोकांशी संवाद साधण्याचे कौशल्य, कार्यकर्त्यांना बळ देणे, प्रशासनातील अधिकाऱ्यांवर वचक कसा ठेवायचा, तसेच कार्यकर्त्यांचा सन्मान कसा ठेवायचा, कलाकार-साहित्यिक-पत्रकार यांच्याशी संवाद आणि संबंध कसे ठेवायचे हे समजले. वेळ प्रसंगी सरांचा आक्रमकपणा कसा असतो ते न्याहाळले. सरांमध्ये काम करण्याची धमक होती, ती मला खूप भावली.



## साहेबांमुळेच खासदार झालो!

**उद्धव ठाकरे –** शिवसेनेत असताना उद्धव ठाकरेंशी माझा संबंध आला. मला व्यक्तिगत त्यांनी कधीही टाळले नाही. निरोप दिला किंवा मेसेज पाठवला तर फोन न करणे, असेही त्यांच्याकडून मी कधी अनुभवले नाही. मला व्यक्तिगत जीवनात त्यांच्याकडून खूप सन्मान मिळाला, चांगलाच अनुभव आला. काही गोष्टी मी आक्रमकपणे बोलायचो. आमच्याकडे संपर्कप्रमुख होते. त्यांच्या विरोधात बोललो पण ते माझे ऐकून घ्यायचे, समजून सांगायचे.

***



## कार्यकर्त्याला बळ देणारा नेता

एकनाथ शिंदे : मला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या सहवासात काम करण्याची संधी मिळाली. त्यांचा एक गुण म्हणजे कामाने झपाटलेला माणूस. कधी कोणालाही दुखावत नाही. सातत्याने मदतीचा हात देणारा नेता अशी त्यांची ओळख आहे. काम कोणतेही असू दे तात्काळ फोन लावणार मदत करणार. कार्यकर्त्यांना बळ कसे द्यायचे त्यांच्याकडून शिकावे. राग नाही, लोभ नाही कायमच मदतीचा हात त्याचे नाव 'एकनाथ'.

प्रचंड मेहनत घेऊन त्यांनी अडीच वर्षे राज्य चालवले. शासन आपल्या दारी हा त्यांचा उपक्रम थेट जनतेचे प्रश्न मार्गी लावण्याकरीता प्रभावी ठरला. लाडकी बहीण योजनेने तर पुन्हा महाराष्ट्रात बहुमताचे सरकार आले. ही योजना चालेल की नाही याचा फायदा सरकारला होईल का? अशा शंका उपस्थित करीत होत्या. याच योजनेने पुन्हा महायुतीला सरकारमध्ये बसवले. हे श्रेय शिंदे साहेबांचे आहे, हे नाकारून चालणार नाही.

सतरा-अठरा तास काम करून या माणसाच्या चेहऱ्यावर कोणताही तणाव नाही शेवटी माणूस आहे. आपणही प्रमाणापेक्षा जास्त जागरण, अधिकचे काम केले तर चिड चिड करतो, पण शिंदे साहेबांकडून असे कधी घडत नाही आणि कदाचित घडले तर पुन्हा त्या कार्यकर्त्याला अथवा नेत्याला समजावून सांगतात 'अरे मी काल थोडा बोललो असेल पण तसे काही वाईट वाटून घेऊ नको.' असे प्रत्येक कार्यकर्त्याला सांभाळणे हे शिंदे साहेबांकडून शिकावे. त्यांनी त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीत अनेकांना मोठे केले. शासन कसे चालवायचे हे त्यांच्याकडून अनुभवता आले.

एकनाथ शिंदेंचा सहवास मला ते मुख्यमंत्री होण्याच्या अगोदर मिळाला. कारण त्यांचे चिरंजीव डॉ.श्रीकांत शिंदे हे माझ्या बरोबर संसदेत सन २०१४ साली पहिल्यांदा खासदार म्हणून निवडून आल्यानंतर संपर्कात आले.

शिंदे साहेब नगरविकासमंत्री असल्याने विविध विकासकामांच्या निमित्ताने मी त्यांना भेटत राहीलो. कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या बरोबर गाडीतून जातांना अनेक अनुभव आले. असेच दोन अनुभव सांगावे वाटतात.

आम्ही एकदा चिंचवड येथे नाट्य परिषदेच्या कार्यक्रमास गेलो होतो. एक म्हातारी आजी अगदी सत्तर-पंचाहत्तरीच्या वयातली. तिने शिंदे साहेबांची गाडी अडवली आणि ती सांगू सांगली 'माझे घर सावकाराने घेतले आहे, मी माझी झोपडी तीन लाखांत गहाण ठेवली, मला रहाण्यासाठी घर नाही, मला व माझ्या नवऱ्याला काम धंदा नाही'. तात्काळ शिंदे साहेबांनी गाडी थांबवून तिला विचारले किती पैसे घेतले आहे. तिने सांगितले तीन लाख. तात्काळ त्यांचे पीए प्रभाकरला सांगितले, हिला तीन लाख रूपये दे, ते पैसे तहसिलदाराकडे दे आणि तिचे घर सोडवायला सांग.

दुसरा प्रसंग आम्ही आळंदी येथून कार्यक्रमातून बाहेर पडत होतो. एक वारकरी पेशातील माणूस मोठ्याने शिंदे साहेब, शिंदे साहेब असे ओरडत गाडी पुढे आला. तो सांगू लागला माझा खिसा चोरट्याने कापला, मला पैशांची गरज आहे. त्यालाही तात्काळ मदत केली. गाडी पुढे गेल्यावर मी साहेबांना म्हंटले साहेब हा मला वारकरी दिसत नाही. यावर शिंदे साहेब मला म्हणाले तो खोटे बोलतो मला समजले पण त्याला गरज असावी असे मला वाटते म्हणून आपण मदत केली.

कायमच मदत करणे हा त्यांचा स्वभाव. कार्यकर्त्याला किंवा सर्वसामान्य माणसाला ते कधीच दुखावत नाहीत. कामाचा कितीही ताण असला तरी ते कधी रागावले मी पाहिले नाही. त्यांची एक खासियत म्हणजे त्यांना कितीही राग आला तरी ते चेहऱ्यावर दाखवत नाही. कामाच्या बाबतीत शिंदे साहेब म्हणजे अक्षरशः झपाटलेला माणुस. आजवरच्या माझ्या राजकीय जीवनात मी अनेक नेते पाहिले पण त्या सर्वात भावलेले नेते म्हणजे एकनाथ शिंदे. शिंदे साहेबांच्या कार्यशैलीमुळेच राज्यातील तमाम सर्वसामान्य जनतेचे मन त्यांनी काबीज केले. राजकारणात अनेक चांगले गुण त्यांच्याकडून घ्यावे असा आदर्श नेता हा आमच्यासाठी खूप मोलाचा ठेवा आहे.

## लोकसभेत नरेंद्रजी मोदी, अमितभाई शहा, नितीन गडकरी, राजनाथ सिंह, सुषमा स्वराज!

मी असे अनेक नेते, मंत्री पाहिले. त्यांचे पूर्ण ऐकून घेणे कसे असते ते अनुभवले. काही काही वेळा कार्यकर्ता येतो, त्याला 'मला माहिती आहे तू

   

जा', असे म्हटले तर त्याला वाटते, 'अरे माझे साधे ऐकूनसुद्धा घेतले नाही. मग त्याला खटकते. काम होणे न होणे हा भाग नंतरचा, पण कार्यकर्त्याचे ऐकणे खूप महत्त्वाचे वाटते. मला माहिती आहे एखादे काम होणार नाही, मात्र त्याचे फक्त ऐकणे हे महत्त्वाचे असते. त्यात त्या कार्यकर्त्याचे मोठे समाधान होते. माझा नेता माझे पूर्ण ऐकून घेतो याचेच त्याला समाधान मिळते.

या सगळ्या गोष्टी मी शिकत गेलो. लोकसभेत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी असतील, अमितभाई शहा, राजनाथ सिंह, मनोहर पर्रीकर, रामदास आठवले, सुषमा स्वराज असतील; विरोधी बाकावर सोनिया गांधी असतील, त्या आजारी असूनही संसदेत बसून कामकाज पाहतात, ऐकतात. या सर्वांकडूनच भाषणाची मांडणी कशी करावी, कसे बोलावे, प्रश्न कसे विचारावे हे शिकलो. नेत्यांच्या अनेक सभा ऐकल्या आणि त्यातूनही शिकलो. समाजाला संबोधता आले. असा अनेक मोठ्या नेत्यांचा सहवास मिळाला आणि शिकता आले.

नितीन गडकरी साहेबांच्या माध्यमातून मतदारसंघातील रस्त्यांचे मोठे प्रकल्प मार्गी लावण्यास मदत झाली. राष्ट्रीय महामार्गाची अनेक प्रलंबित कामे मार्गी लागली. स्पष्टवक्ता, कामकाजात सातत्यपूर्ण मदत करून मार्गदर्शन करणारा नेता म्हणून नितीन गडकरी साहेबांचा उल्लेख करावा लागेल.

नारायण राणेंच्या बाबतीत सांगता येईल. माजी मुख्यमंत्री होते. ते काँग्रेसमध्ये आले, नंतर ते केंद्रात मंत्री झाले. एकदा मी त्यांच्याकडे राम नायडूंच्या कामानिमित्त गेलो. आम्हाला त्यांनी बसवले, चहापाणी झाला. राम नायडू यांना त्यांची राजकारणातील हिस्ट्री विचारली. सगळे झाले, बाहेर पडलो तेव्हा नायडू खूश झाले होते. कारण एकच ते म्हणजे नारायण राणे यांनी ज्या पद्धतीने विचारपूस केली, पाहुणचार केला. नायडूंचेच बोल होते की, ''यार ये आदमी बहोत अच्छा है... काम हो ना हो... इनसे येही सिखना है.'' महाराष्ट्र राज्यातील अनेक मंत्री मी जवळून पाहिले. त्यांची काम करण्याची पद्धत यातून बरेच काही शिकायला मिळाले.





## फडणवीस, गडकरी, बावनकुळे, महाजन यांचाही कायम संपर्क

राजकारणात सर्वांत जास्त सहवास, संपर्क आला, त्यात प्रा. रामकृष्ण मोरे सर, विलासराव देशमुख, उद्धव ठाकरे आणि आताच्या काळात एकनाथ शिंदे साहेब. देवेंद्र फडणवीस साहेब यांनीसुद्धा मदत केली. २०१९ व २०२४ ला स्वतंत्र माझ्यासाठी बैठक घेतली होती. बावनकुळे साहेब, नितीन गडकरी साहेब सातत्याने मदत करतात. गिरीश महाजन साहेब यांनी या वेळी माझ्यासाठी दोनदा बैठक घेतली. रायगडचे पालकमंत्री म्हणून सुरूवातीला रवींद्र चव्हाण होते नंतर मंत्री उदय सामंत झाले. दोघांनीही कायम प्रामाणिकपणे मदत करण्याची भावना ठेवली. कुठलेही काम सांगू द्या मदत करतात. चांगले संबंध आपल्या स्वभावातून प्रस्थापित होतात व टिकतात.

## अजितदादांचा स्पष्ट स्वभाव भावणारा



**अजित पवार –** मी नगरसेवक झालो त्या वेळी दादांचा सहवास मिळाला.त्यांची काम करण्याची पद्धत पाहिली. स्पष्टवक्ता त्यांचा गुण मला बरेच काही सांगून गेला.

## नानांची सहनशीलता भावणारी

**नानासाहेब शितोळे –** महापालिकेत गेल्यावर पार्टी लीडर म्हणून मला



नाना शितोळेंचा मोठा सहवास लाभला. त्यांनी मला मुलासारखे सांभाळले. त्यांची कार्यशैली पाहिली. कोणी कितीही आरोप करू देत, कठीण बोलू देत सर्व

काही ते शांततेत ऐकून घेत. या  गोष्टी मी त्या वेळी शिकलो. नानासाहेबांची ती सहनशीलता मला पावलोपावली कामी आली. कुठे, कधी, किती बोलायचे याचे तारतम्य मला शिकता आले. तसेच मित्रत्वाला वय नसते, सर्वांशी मैत्री करणे हा त्यांचा गुण भावला.



## महापौर हनुमंत भोसले यांनी खरी दिशा दाखवली

पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात अनेक मित्र निर्माण झाले. ते कधी वयाने मोठे होते, कधी छोटे. मी मैत्री जपण्याचे काम केले. असेच एक व्यक्तिमत्त्व म्हणजेच काँग्रेसमधील ज्येष्ठ नेते आणि शहराचे महापौर हनुमंत भोसले यांचा मोठा सहवास मला मिळाला. महापौर असताना महापालिकेत त्यांचे मार्गदर्शन मिळाले. एकदंरच स्थायी समिती निवडणुकीनंतर राजाभाऊ गोलांडे यांच्या बंडखोरीनंतर त्यांच्यावर माझ्यामुळे कारवाई झाली होती. परंतु, अशा परिस्थितीत कुठलाही त्रागा न करता अत्यंत संयमाने कसे घ्यायचे आणि मार्ग काढायचा ते ज्येष्ठ नेते म्हणून हनुमंत भोसले यांनी दाखवून दिले.

आम्हाला योग्य दिशा दाखवण्याचे काम त्यांनी केले. राजकारणात कठीण परिस्थितीत निर्णय कसा घ्यायचा हे मी त्यांच्याकडून शिकलो. खरे तर, माझे थोरले बंधू हिरामणशेठ बारणे यांच्याबरोबर त्यांनी काम केले. कायम मित्रत्वाच्या नात्याने आमच्याबरोबर ते काम करत राहिले. राजकारणातील असे मित्र हे आमचे खरे संचित आहे. भोसले यांचा खूप चांगला अनुभव मला आला.

***





मी असा घडलो

# वाचनातून समाजकारण राजकारणाचे मिळाले धडे

**पुस्तके वाचत राहिलो. छत्रपती शिवाजीमहाराज, संभाजीमहाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहूमहाराज, महात्मा जोतिबा फुले यांचे चरित्र वाचले. मी प्रत्येक कार्यकर्त्याला सांगत असतो, प्रथम शिवाजीमहाराज यांचे साहित्य वाचावे.**

पुस्तके वाचत राहिलो. छत्रपती शिवाजीमहाराज, संभाजीमहाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहूमहाराज, महात्मा जोतिबा फुले वाचले. मी प्रत्येकाचे चरित्र, इतिहास, पराक्रम वाचा असे कार्यकर्त्याला सांगत असतो, प्रथम शिवाजीमहाराज वाच. कारण राजकारणात काय किंवा सामाजिक जीवनात काम करत असताना कधी तत्त्वांशी तडजोड करायची नाही, हे शिवाजीमहाराजांनी शिकवले. राजर्षी शाहूमहाराजांनी समानतेचा संदेश दिला. तेच सूत्र आम्ही राजकारणात, समाजकारणात कायम ठेवत आलो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आत्मचरित्रही मी वाचले. प्रचंड बुद्धीमान, विद्वान व्यक्तिमत्त्व होते ते.

त्यांचा आदर्श ठेवून सामाजिक जीवनात काम केले पाहिजे हा माझा आग्रह कायम असतो.

मी डॉ. अब्दुल कलाम, अटल बिहारी वाजपेयी यांची पुस्तके वाचलीत, लाल बहादूर शास्त्री, इंदिरा गांधी यांचे चरित्र वाचले. सतत वाचन करत असतो. संसदेच्या लायब्ररीतही वेळ मिळेल तसे वाचन सुरू असते. आता तुम्हाला गुगलवर सगळे उपलब्ध आहे. पण, पुस्तके वाचली पाहिजेत, असा माझा कायम आग्रह असतो. यातूनच मला हे पुस्तक लिहीण्याची संकल्पना सुचली. आपणही काहीतरी लिहिले पाहिजे, असे वाटले. मी बऱ्याच वेळा लोकांना सांगतो, 'मी पुस्तक लिहीतोय'. अनेकदा लोकांना ते पटतही नाही. मी नऊ-नऊ निवडणुका लढलोय. पत्रकार मला कायम विचारत असतात, तुम्ही कसे काम करता? या निवडणुकीत मी कसा विजय मिळवला, नियोजन केले, संपर्क साधला, यंत्रणा उभी केली हे सगळे शब्दबद्ध करण्यासाठी हा प्रपंच केला. कार्यकर्त्यांना हे समजावे म्हणून लेखन केले.

खरे तर निवडणूक लढवणे, निवडून येणे हा काही व्यवसाय नाही. तुम्हाला समाजासाठी काम करायचे, पुढे जायचे. समाजासाठी सातत्याने काम केले, तर लोक नेहमीच तुम्हाला स्वीकारतात, नव्हे डोक्यावर घेतात.

देशातील सर्वांत मोठी लायब्ररी ही आपल्या संसदेची आहे. तिथे अनेक पुस्तके वाचता येतात. डिजिटल लायब्ररीसुद्धा आहे. तिथे अनेक संदर्भ मिळतात. संसदेत बोलत असताना माझा तारांकित प्रश्न लागला तर यापूर्वी अशा विषयावर कोण काय बोलले, राज्यसभेत कोण बोलले. हे मी सतत पाहत असतो. कोण काय म्हणत असते, त्यातील सत्यता मी कायम पाहत असतो. तेच वाचनातून लक्षात येते. मी व्याख्यानमाला आयोजित करतो. उत्तम व्याख्याते भरवित असतो. प्रा. रामकृष्ण मोरे यांच्यामुळे मी मोठ मोठे कलाकार, साहित्यिक यांच्याही संपर्कात आलो. काही मान्यवर अनुभवी पत्रकार दिल्लीत आहेत. त्यांच्याही बरोबर चर्चा करत असतो. अनेकदा पत्रकारसुद्धा मोठी माहिती देतात, काही महत्त्वाच्या गोष्टी सांगत असतात. राजकारणात काही जाणून घ्यायचे असेल, उद्या काय घडणार याचा अंदाज घ्यायचा असेल, तर पत्रकारांशी संपर्क, सहवास असला पाहिजे. पत्रकारांना सगळीकडची माहिती असते.

अध्यात्मातूनही मोठे ज्ञान मिळते. मी पंढरपूरची वारीसुद्धा करतो. आळंदी, देहूला जातो. कीर्तन, प्रवचनालाही बसत असतो. कीर्तनकारांशी बोलतो, त्यांचे अनुभव आपल्या जीवनात येत असतात. कारण त्यांचाही त्याग असतो. प्रचंड अभ्यास असतो. कीर्तनात इतके दाखले कसे देता म्हणून युवा कीर्तनकारांनाही विचारत असतो. त्यात त्यांचा अभ्यास असतो. पहाटे उठून वाचन, अध्ययन असते. खरे तर, मला कार्यबाहुल्यामुळे मला ते सगळेच शक्य नसते. पण, या मंडळींच्या नुसत्या सहवासातून ते मला मिळते.

रामकृष्ण मोरे सर हे प्राध्यापक होते, त्यांचे वाचन प्रचंड होते. शिक्षणमंत्री असताना सरांनी एक मोठा निर्णय घेतला होता, पहिलीपासून इंग्रजीचा. काही नागरीक त्या वेळी विरोध करत होते. मला म्हटले की, 'घेतलेल्या निर्यणाबाबत शाळेच्या बाहेर बोर्ड लावा आणि पालकांना काय म्हणायचे याचा अंदाज घ्या'. आम्ही बोर्ड लावले. पालकांचा अंदाज घेतला. अनेकांनी त्यावर चांगला निर्णय असे म्हटले. त्या वेळी सर म्हणाले, ' अरे, ज्यांची मुले इंग्रजी शाळेत शिकतात तेच विरोध करतात.' नंतर सरांनी तोच मुद्दा पकडला. सांगायचा उद्देश या विषयावर लोक काय म्हणतात, त्याचा कानोसा घ्यायला आम्हाला लावला होता. सरांची कार्यशैली आम्हाला खूप काही सांगून गेली.

## महापालिकेतूनच संसद सभागृहाचे धडे गिरवले

पिंपरी-चिंचवड महापालिकेतून थेट देशाच्या सर्वोच्च सभागृहात म्हणजे संसदेत मी पोहचलो. देशाच्या स्वातंत्रलढ्याचे साक्षीदार असणारी ती संसद. आपले संविधान मंजूर करणारी संसद. जगातील सर्वांत मोठ्या लोकशाहीची साक्ष देणारी संसद. आमचे कायदे बनविणारी संसद. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, लाल बहादूर शास्त्री, इंदिरा गांधी, राजीव गांधी, अटलबिहारी वाजपेयी, डॉ. मनमोहन सिंग अशा दिग्गजांनी ज्या सभागृहाचे नेतृत्व केले, त्या सर्वोच्च सभागृहात नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी मला मिळाली.

शिवसेना पक्षाच्या माध्यमातून ही संधी मला प्रथम उद्धवजी ठाकरे यांनी प्राप्त करून दिली. तद्नंतर एकनाथजी शिंदे यांच्यामुळे ते सातत्य मला मिळाले. माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला ही संधी मिळाली, याचा मला

त्या वेळी विशेष आनंद झाला. सभागृहात पोहचल्यावर एक वेगळी ओळख निर्माण करण्याचा माझा अगदी सुरूवातीपासून प्रयत्न होता. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सभागृहात सर्व कामकाजात लक्ष घालून मन लावून जे काम केले, तो अनुभव माझ्या गाठीशी होताच. खरे तर, मी संघर्षातून सगळी वाटचाल केली. आंदोलने असतील अन्य कारणाने असेन. मी लोकांशी कायम जोडलेला राहिलो, म्हणून राजकारणात यशस्वी झालो. संसदेत पोहचल्यानंतर कामकाज मुळापासून समजून घेतले. विषय कसा मांडायचा, त्यासाठीचे नियम कोणते, पद्धत कोणती, प्रश्न कसे देतात. आदीसाठी संसदीय आयुधे कोणती याचा बारीक अभ्यास केला. पुढे सातत्य टिकवले. अभ्यास करणे, प्रश्न समजून घेणे, प्रश्न मांडणे, झीरो अवरच्या माध्यमातून प्रश्न मांडणे, तारांकित प्रश्न टाकणे तसेच प्रश्न लागले नाहीत, तर सभापतींच्या माध्यमातून पुरवणी प्रश्नांच्या माध्यमातून वाचा फोडण्याचे काम केले. अशा पद्धतीने संसदेतील कामकाजात कायम सहभाग घेत राहिलो. लोकसभेत अशाच पद्धतीने कामात सातत्य ठेवत गेलो आणि मी माझ्या कामकाजाचा ठसा उमटविला. अनेक राज्यांचे चांगले चांगले मित्र मी जोडत गेलो, संबंध वाढवले. फक्त राज्यकर्तेच नाही, तर अधिकाऱ्यांशीही संपर्क ठेवत गेलो. त्या माध्यमातूनच प्रश्न सोडवत गेलो. रेल्वे असेल, पासपोर्ट कार्यालय असेल किंवा पर्यटनाबाबत असेल. संरक्षण विभागाच्या अनेक प्रश्नांवर आवाज देत राहिलो. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा विषय, शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न मांडत राहिलो. मराठा आरक्षणाचा मुद्दा मांडला. अनेकदा विविध महत्त्वाच्या विषयांवर सभागृहाचे लक्ष वेधण्याचे काम मी केले. त्याचा परिणाम कामकाजातून मला स्वतःची अशी वेगळी छाप पाडत आली. सातत्याने बोलत राहिलो म्हणून ही ओळख झाली. काही प्रश्न सुटले नाही, पण मी या कार्यपद्धतीत कधीच खंड पडू दिला नाही.

## जिवाला जीव देणारे कार्यकर्ते

आजवरच्या राजकीय जीवनात महापालिका, विधानसभा आणि लोकसभा अशा नऊ निवडणुका मी लढवल्या. २००९ चा एक अपवाद सोडला, तर प्रत्येक निवडणूक मोठ्या फरकाने जिंकलो. पहिल्यापासून निवडणुकीचे तंत्र, मंत्र नेत्यांकडून शिकलो. माझ्या राजकारणाचे खरे यश कुठे सामावले असेल तर ते. जिवाला जीव देणाऱ्या माझ्या निष्ठावंत कार्यकर्त्यांत आहे. कुठलीही अपेक्षा

न ठेवता प्रत्येक निवडणुकीत माझ्यासाठी झोकून देणारे शेकडो कार्यकर्ता हीच माझी ताकद आहे. १९९७ पासून अगदी २०२४ पर्यंतच्या सर्व निवडणुकांचे तेच गमक आहे. तीस वर्षांच्या माझ्या राजकीय कालखंडामध्ये मी बंधुराज हिरामणशेठ हे नगरसेवक असल्यापासून अर्थात १९८६ पासून राजकारण आणि समाजकारणात काम करत होतो. मला चांगले कार्यकर्ते मित्र मिळाले, हे माझे मी भाग्य समजतो. शिक्षण मंडळाचे सदस्य दिवंगत गजानन चिंचवडे, रवी नामदे, धनाजी बारणे या आणि अशा अनेकांमुळे निवडणुकीचे मला नियोजन करता आले.

महापालिकेला १९९७ ची निवडणूक लढवली तेव्हापासूनच कार्यकर्ते हीच माझी सर्वांत मोठी ताकद राहिली. त्या वेळी कार्यकर्ते प्रचार केला, तर जेवायला घरी जायचे. कार्यकर्त्यांची अपेक्षा नव्हती. मला कामाला लावलेय, या बेसवर तो अक्षरशः झोकून देत काम करायचा. तेव्हापासून तेच कार्यकर्ते कायम माझ्या बरोबर, काल होते आणि आजही आहेत. अलीकडच्या काळात जो माणूस जवळ येतो तो अपेक्षा ठेवूनच येतो. म्हणजे मी जर का निवडणुकीत मदत केली, तर मला मदत झाली पाहिजे. खरे म्हणजे निवडणुकीची त्या वेळची परिस्थिती आज राहिलेली नाही. तसा दोष कार्यकर्त्यांचाही म्हणता येणार नाही कारण पूर्वीचे राजकारण आता राहिलेले नाही. वेळ, काळ, वातावरण, तंत्र सगळे सगळेच बदललेले आहे. अगदी ग्रामपंचायत ते लोकसभेपर्यंत कार्यकर्ता काम करत असतो. केवळ निवडणूक ते निवडणूक, नाही तर वेळप्रसंगी कायम साथसंगत करतो. झोकून देऊन काम करणारे असे शेकडो कार्यकर्ते ही माझी मोठी ताकद आहे. अगदी निवडणुकीच्या पहिल्या दिवसापासून महिनाभर महिना सुटी टाकून दिवस-रात्र माझ्यासाठी देणारे ज्ञात-अज्ञात असंख्य कार्यकर्ते माझ्या सर्कलमध्ये आहेत. माझी स्वतःची तीच एक स्वतंत्र अशी समांतर यंत्रणा आहे जी भूमिगत असते. नेता म्हणून माझेही काम असते, की अशा तमाम कार्यकर्त्यांना मी कधीच वाऱ्यावर सोडत नाही. काम करत असताना कार्यकर्त्याबरोबर आपली नाळ तुटली नाही पाहिजे, संपर्क तुटला नाही पाहिजे हे आताच्या काळात खूप बारकाईने पाहावे लागते. पूर्वी कार्यकर्ता हा त्याचे काम असो-नसो या निवडणुकीनंतर पुढच्या निवडणुकीला निश्चित भेटायचा. आता ती परिस्थिती राहिलेली नाही. आता कार्यकर्त्याला सातत्याने संपर्कात ठेवले पाहिजे. एखादा

कार्यकर्ता महिना-दोन महिने आला नाही, भेटला नाही तर मी विचारत असतो. काम असो-नसो, कोणी भेटला नाही तर मी फोन करत असतो. काय झाले, नाराज आहे का, येऊन जा म्हणून पीएमार्फत निरोप पाठवत असतो. सातत्य महत्त्वाचे असते. आज कोणीही माणूस निष्कारण कुणासाठी कोणत्या केसेस स्वतःच्या अंगावर घेत नाही. स्वतःला लढायचे, तर एक गोष्ट नेत्याने कायम ध्यानात ठेवली पाहिजे, निवडणुकीच्या या तंत्रात कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडता कामा नये.

कार्यकर्त्याला सन्मान मिळाला पाहिजे. त्या भावनेतून तो येत असतो. भावना जाणून घेतली पाहिजे. बोलावणे, विचारपूस कऱणे, मदत करणे, जवळ बसवून पाठीवर हात फिरवणे अशी आपुलकी ठेवली, तर कार्यकर्ता कायम टिकून राहतो. मी १९९७ ते आजवर ३० वर्षांच्या काळात एक पाहिले. काळ, वेळ बदलत गेला. माणसे तीच आहेत, ती बदलत नाहीत. परिस्थितीनुसार काही वेगळे चित्र कार्यकर्त्यांच्या डोळ्यांसमोर निर्माण होते. त्याला तुम्ही आत्मविश्वास दिला तर तो कायम बरोबर राहतो, हे मला माहिती आहे. अगदी २०२४ पर्यंत सुखात-दुःखात मी त्यांच्या बरोबर राहिलो म्हणून ते माझ्याबरोबर आहेत. मतदारसंघ मोठा असल्याने काही भागांत जाऊ शकत नाही. अशा वेळी मी उपलब्ध नसेल तर घरचा किंवा जवळचा प्रतिनिधी पाठवतो, फोन करतो किंवा पत्र पाठवतो. कार्यकर्तेसुद्धा ते समजून घेतात. कार्यकर्त्याला मी कधीच दुखावत नाही. भावनेच्या भरात तो बोलतो, चिडतोसुद्धा. मी सर्व ऐकून घेतो पण त्याच्यावर रागावत नाही. कारण त्यांनी माझ्यासाठी जिवाचे रान केलेले असते. त्याची भावना प्रामाणिक असते. तीस वर्षांच्या माझ्या राजकीय प्रवासात प्रत्येक निवडणुकीत कार्यकर्ता हाच माझा कणा आहे. मी ते कायम टिकवू शकलो. आज कार्यकर्ते बरोबर नसतील, तर अवघड असते.

भारतीय जनता पक्ष शिवसेनेची युती होती. रिपाइसुद्धा महायुतीत होती. प्रत्येक निवडणुकीत मी त्या सगळ्या कार्यकर्त्यांना नेहमीच सन्मान दिला. भाजपचे मूळ कार्यकर्ते आजही माझे नाव घेतात, कारण मी कायम त्यांच्या संपर्कात असायचो. निष्ठावंत कार्यकर्त्यांची तशी खास अपेक्षा काहीच नसते. अपेक्षा फक्त एकच ती म्हणजे, या माणसाने विचारले पाहिजे, बस्स! हिंदुत्ववादी संघटना आहेत ज्यांच्या जिवावर मी काम करतो. कधी त्यांचे काही विशेष उपक्रम

असतील, तर त्यांना सहकार्य करतो. सातत्याने कुठल्याही संस्था, संघटना, गणेश मंडळे असू देत; माझा त्यांच्याशी काही का निमित्ताने संपर्क असतो. एक सांगतो, कोणत्याही पक्षाचा कुठलाही कार्यकर्ता असू देत, अगदी निवडणुकीत माझ्या विरोधात काम केलेला कार्यकर्ता असला, तरी त्याला मी दुखावत नाही. एखाद्या कार्यकर्त्याने माझ्या विरोधात गळा काढून घोषणा दिल्या असतील, पण निवडणूक झाली, की सगळे संपले, हे माझे तत्त्व आहे.

## माझा कोणी शत्रू नाही, हेच तत्त्व पाहिजे...

राजकारणात काही गोष्टी मी खूप कटाक्षाने पाळत आलोय. आपला कोणीही शत्रू नाही, अशी खूणगाठ मनात बांधूनच राजकारण करत आलोय. राजकारणात हेच सातत्य टिकवले. निवडणुकीत जे विरोधात काम करतात तो तात्त्विक विरोध असतो. ते पारंपरीक विरोध असतो तो वेगळा. तो कायम विरोधच करणार असतो. अशा लोकांकडे मी दुर्लक्ष केले. तिथे कधी वेळ घालवला नाही. निवडणुकीच्या राजकारणात एक शिकले पाहिजे, आजचा कडवा विरोधक हा उद्याचा आपला मित्रसुद्धा असू शकतो. निवडणुकीपुरती ती लढाई असते त्या वेळे पूरते पाहून चालत नाही. निवडणूक संपली, निकाल झाला की झाले गेले ते विसरायचे आणि कामाला लागायचे. आजच्या गढूळलेल्या राजकारणात तुम्हाला टिकायचे असेल, तर काही पथ्ये पाळली पाहिजेत. जनसंपर्कात सातत्य पाहिजे. जे आपल्या उपयोगात आलेत त्यांच्या कामात आले पाहिजे आणि विकासकामे, ध्येय-धोरणे यात लक्ष घालणे. आज राजकारण हे व्यावसायिक झाले. पण, तुम्ही कमर्शिअल अँगल डोक्यातून काढून सामाजिक कामातून सतत कार्यरत राहिलात तर राजकारणात कोणीही तुमचा पराभव करू शकत नाही. हा गुरुमंत्र आहे. जनसंपर्क ठेवला नाही, तर अवघड आहे.

आज मावळ लोकसभा मतदारसंघ जवळपास २७ लाखांवर मतदारांचा आहे. वाड्या-वस्त्या, गावे, लहान-मोठी शहरे असा खूप मोठा व्याप आहे. सगळ्या ठिकाणी संपर्क टिकवणे तसे खूप अवघड आहे. मात्र, मी त्याचे वेळापत्रक करत असतो. त्यानुसार नागरिकांना भेटणे, कार्यकर्त्यांना भेटणे ही मोहीम सुरूच असते. माझ्याकडे फोन कायम जवळ असतो. कुठे काय मदत लागते, कोणाशी संपर्क करायला लागतो ते पाहून कामे मार्गी लावतो. कुठे दुर्घटना घडली, तर संपर्क करत असतो. मतदारसंघ मोठा असला, तरी सोशल मीडियाच्या माध्यमातून

लोकांपर्यंत पोहचत असतो. अगदी ई-मेल, व्हाट्सॲप, ट्विटर, इन्स्टाग्राम, फेसबुकच्या माध्यमातून हे काम अखंड सुरू असते. आपण काही चांगले निर्णय घेतले, कोणते काम केले ते या माध्यमांतून मतदार, कार्यकर्ते यांच्यापर्यंत पोहचत असते. हे सातत्य कायम ठेवले. आजही मी संसदेत सर्वाधिक उपस्थित असतो. प्रश्न विचारणे, चर्चेत सहभाग घेणे आदी लोकसभेतील कामकाजात पहिल्या क्रमांकावर आहे. संसदेच्या ज्या समितीत असतो त्याचा बारीक अभ्यास करतो, वेळ देतो. सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे हे सगळे काम माझा मतदार आणि कार्यकर्ते पाहत असतात.

## अखंड कार्यरत असल्याने लोक बरोबर

मी दिवसाकाठी जवळपास १२-१३ तास काम करतो. हे सातत्य कायम ठेवले. सकाळी सातनंतर कधी झोपलो असेल किंवा नऊनंतर घराच्या बाहेर पडलो नाही, असे कधी झाले नाही. आजवरच्या सर्व निवडणुकांनंतर माझी दिनचर्या अशीच राहिली म्हणून लोकप्रियता वाढली. आजसुद्धा सकाळी उठल्यावर योग प्राणायाम झाला, की मंदिरात जातो. माझ्याकडे गाईंचा गोठा आहे; तिथे जात असतो. संध्याकाळी माझा येण्याचा ठिकाणा नसतो, कार्यक्रम उरकले की पुन्हा घरी असतो. अशा प्रकारे अखंड कार्यरत असल्याने कार्यकर्त्यांना आणि मतदारांना माझ्याबद्दल आस्था आहे.

***



महापालिका निवडणुकीतील प्रचार
फेरीत कार्यकर्त्यां समवेत

## निवडणुकीचे विविध रंग

नगरसेवक ते खासदार अशी श्रीरंग आप्पा बारणे यांची वाटचाल जिद्द, सचोटी आणि परिश्रमाची आणि रोमहर्षक आहे. १९९७ ते २०२४ या कालखंडातील राजकीय वाटचालीच्या सचित्र आढावा घेण्यात आला आहे.



निवडणुकीत यश मिळवल्यावर
वडील व बंधू हिरामणशेठ यांच्यासह
श्रीरंग आप्पा बारणे



महापालिकेच्या २००७ च्या
प्रचारसभेत भाषण करताना
ज्येष्ठ कार्यकर्ते कै.विलास जगदाळे



स्थायी समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीत
यश मिळाल्यानंतर जल्लोष करताना श्रीरंग आप्पा बारणे व
तत्कालिन महापौर मधुकर पवळे, हनुमंत गावडे व नगरसेवक

# २०१४ लोकसभा

मावळ लोकसभा मतदारसंघात २०१४ मध्ये श्रीरंग आप्पा बारणे प्रथमच खासदार झाले. प्रचार फेऱ्या, कार्यकर्त्यांशी संवाद, सभा आणि यशाचा जल्लोष याचे सचित्र दर्शन घडविणारे क्षण.



प्रचारफेरीत श्रीरंग आप्पा बारणे यांचे कुटुंब उतरले होते.



थेरगाव येथील निवासस्थानी विजयाचा जल्लोष करणारे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांचे कुटुंबिय



खासदारकीच्या निवडणुकीमध्ये २०१४ मध्ये विजयाचा पहिला गुलाल उधळला. मिरवणुकीतील गर्दी



खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांचे औक्षण करताना पत्नी सरिता बारणे व कुटुंबिय

# २०१९ लोकसभा

खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या २०१९ च्या दुसऱ्या निवडणुकीत विविध राजकीय घडामोडी घडल्या. या निवडणुकीत जनतेच्या साथीने श्रीरंग बारणे दुसऱ्यांदा खासदार झाले निवडून आले. निवडणुकीतील क्षणचित्रे.



२०१९ च्या निवडणुकीमध्ये उमेदवारी अर्ज भरताना खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या समवेत शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे, तत्कालीन मंत्री गिरीश बापट, मा.खा. रामशेठ ठाकूर व आमदार लक्ष्मण जगताप.

लोकसभेच्या निवडणुकीतील प्रचार फेरीत खासदार श्रीरंग आप्पा बारणे, व महायुतीतील नेते





लोकसभा निवडणुकीत बैलगाडीतून काढलेली प्रचार फेरी.

खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होताच कार्यकर्त्यांनी खांद्यावर उचलून घेतले.



# २०२४ लोकसभा

लोकसभेच्या २०२४ च्या निवडणुकीत श्रीरंग आप्पा बारणे तिसऱ्यांदा खासदार झाले. या निवडणुकीमधील उत्साह अद्वितीय होता. सभा, प्रचार फेऱ्यांनी वातावरण ढवळून निघाले. कार्यकर्त्यांचा जल्लोष लक्षवेधी होता, याचे सचित्र दर्शन!



श्रीरंग आप्पा बारणे यांचा उमेदवारी अर्ज भरताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री दीपक केसरकर, आमदार प्रविण दरेकर



खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रचार फेरीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आ.आश्विनीताई जगताप, आ.महेंद्र थोरवे, मा.बाळा भेगडे सहभागी झाले होते.



लोकसभेच्या प्रचार सभेत बोलताना खासदार श्रीरंग आप्पा बारणे व उपस्थित मा.आ.बाळा भेगडे, आमदार सुनिल शेळके



खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रचार सभेत भाजपचे नेते आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले होते.

लोकसभेच्या प्रचार सभेत बोलताना खासदार श्रीरंग आप्पा बारणे.






आरपीआयचे नेते केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रचारार्थ सभा घेतली.

मतदानाचा हक्क बजावताना खासदार श्रीरंग बारणे कुटुंबासह.





खासदारकीच्या २०२४ च्या निवडणुकीमध्ये विजयी झाल्यानंतर थेरगावात अशा प्रकारे जल्लोष केला.





खासदारकीच्या २०२४ च्या निवडणुकीमध्ये विजयी झाल्यानंतर
थेरगाव येथील निवासस्थानी कुटूंबियांसमवेत विजयी जल्लोष साजरा करताना



पत्नी सरिता बारणे, चिरंजीव प्रताप, विश्वजीत, सुन स्नेहा, नातू राजवीर समवेत श्रीरंग आप्पा बारणे



सर्व भगिनी, भाचे, पुतणे निलेश बारणे या सर्व परिजंनासमवेत श्रीरंग आप्पा बारणे

# आशिर्वाद

माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी
यांच्या समवेत
खासदार श्रीरंग आप्पा बारणे





माजी राष्ट्रपती
श्रीमती प्रतिभाताई पाटील
यांच्या समवेत
खासदार श्रीरंग आप्पा बारणे

माजी राष्ट्रपती रामनाथ
कोविंद यांना मावळचे
खासदार श्रीरंग आप्पा बारणे
यांनी जगद्गुरू श्री संत तुकाराम
महाराज यांची गाथा भेट दिली.





महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु
यांनी मावळचे खासदार श्रीरंग
आप्पा बारणे यांचा गौरव केला.

# आशिर्वाद



महामहिम उपराष्ट्रपती जगदीप धनगड व मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांची सदिच्छा भेट

लोकसभेचे सभापती ओम प्रकाश बिर्ला यांना गुढी भेट देताना खासदार श्रीरंग आप्पा बारणे





लोकसभेच्या सभापती सुमित्रा महाजन यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मान करताना खासदार श्रीरंग आप्पा बारणे

महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची सदिच्छा भेट



# प्रेरणा आणि सहवास



हिंदुहृदय सम्राट, शिवसेनाप्रमुख
बाळासाहेब ठाकरे यांचा
आशीर्वाद घेताना
श्रीरंग आप्पा बारणे



पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी यांना
पुष्पगुच्छ देऊन सन्मान करताना
खासदार श्रीरंग आप्पा बारणे



दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची कुटुंबासमवेत सदिच्छा भेट

# प्रेरणा आणि सहवास



केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शाह यांची सदिच्छा भेट

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांच्या समवेत खासदार श्रीरंग आप्पा बारणे





सरसंघचालक मोहनजी भागवत यांच्या समवेत श्रीरंग आप्पा बारणे

उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री मा. आदित्यनाथ योगी यांच्या समवेत खासदार श्रीरंग आप्पा बारणे



# प्रेरणा आणि सहवास



मावळ लोकसभा
मतदारसंघातील विविध प्रश्नांवर
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी
यांच्याशी संवाद साधताना
खासदार श्रीरंग आप्पा बारणे



माजी कृषीमंत्री शरद पवार साहेब
व सुशिलकुमार शिंदे
यांच्याबरोबर कुटुंबासमवेत
श्रीरंग आप्पा बारणे



महाराष्ट्राचे राज्यपाल मा. रमेश बैस, तत्कालिन मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे,
उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस, खासदार श्रीनिवास पाटील
यांजसमवेत खासदार श्रीरंग आप्पा बारणे

# प्रेरणा आणि सहवास



माजी पंतप्रधान
मनमोहन सिंग यांना
पुष्पगुच्छ देताना
श्रीरंग आप्पा बारणे



शिवसेनेचे नेते आणि
माजी मुख्यमंत्री मनोहर
जोशी यांच्या समवेत
श्रीरंग आप्पा बारणे



काँग्रेसचे नेते आणि माजी
मुख्यमंत्री विलासराव
देशमुख यांच्या समवेत
श्रीरंग आप्पा बारणे



माजी परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज
यांच्याशी विकासकामांसदर्भात
चर्चा करताना
खासदार श्रीरंग आप्पा बारणे

# प्रेरणा आणि सहवास



लोकसभा निवडणुकीमध्ये विजयाची निशाणी धनुष्यबाण घेऊन जनतेला अभिवादन करताना तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करताना खासदार श्रीरंग आप्पा बारणे



२०१४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये जाहिर सभेत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करताना श्रीरंग आप्पा बारणे



एका कार्यक्रमाच्या दरम्यान तत्कालीन पालकमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करताना खासदार श्रीरंग आप्पा बारणे

# प्रेरणा आणि सहवास



भारतीय जनता पक्षाचे
प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर
बावनकुळे यांचा सन्मान
करताना खासदार
श्रीरंग आप्पा बारणे सोबत
ह.भ.प. पंकज महाराज गावडे



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते
राज ठाकरे
यांच्या समवेत
श्रीरंग आप्पा बारणे



मा.खासदार,
मा.मंत्री प्रा.रामकृष्ण मोरे
यांच्या समवेत
श्रीरंग आप्पा बारणे



आरपीआय नेते
रामदास आठवले
यांच्या समवेत
श्रीरंग आप्पा बारणे

# प्रेरणा आणि सहवास



श्री श्री रविशंकर यांच्या समवेत
श्रीरंग आप्पा बारणे



माता अमृतांनदमयी
यांचा आशीर्वाद घेताना
श्रीरंग आप्पा बारणे



महायोगी गगनगिरी महाराज
यांचे आशिर्वाद घेताना
बंधु हिरामणशेठ व
श्रीरंग आप्पा बारणे



योगगुरू श्री रामदेवबाबा
यांच्याशी संवाद साधताना
श्रीरंग आप्पा बारणे

# प्रेरणा आणि सहवास



स्वामी गोविंदगिरी महाराज
कोषाध्यक्ष, श्रीराम जन्मभूमी
तीर्थक्षेत्र ट्रस्ट यांच्या समवेत
श्रीरंग आप्पा बारणे

सद्गुरू वामनराव पै.
यांच्याशी संवाद साधताना
श्रीरंग आप्पा बारणे





ज्येष्ठ निरूपणकार पद्मश्री
डॉ.आप्पासाहेब धर्माधिकारी
यांना वाढदिवसाच्या
शुभेच्छा देताना
श्रीरंग आप्पा बारणे

डॉ.बालाजी तांबे
यांच्या समवेत
श्रीरंग आप्पा बारणे



# प्रेरणा आणि सहवास



शिवशाहीर
बाबासाहेब पुरंदरे
यांच्याशी चर्चा करताना
श्रीरंग आप्पा बारणे



जेष्ठ समाजसेवक
अण्णा हजारे
यांच्याशी चर्चा करताना
श्रीरंग आप्पा बारणे



कामगार नेते
बाबा आढाव
यांच्याशी चर्चा करताना
श्रीरंग आप्पा बारणे



जेष्ठ समाजसेवक
प्रकाश आमटे
यांच्याशी चर्चा करताना
श्रीरंग आप्पा बारणे

# मैत्र जिवांचे



प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर यांच्याबरोबर खासदार श्रीरंग आप्पा बारणे



प्रसिद्ध क्रिकेट खेळाडू दिलीप वेंगसरकर यांच्याबरोबर गप्पा मारताना खासदार श्रीरंग आप्पा बारणे



खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या समवेत खासदार श्रीरंग आप्पा बारणे



छत्रपती संभाजीराजे भोसले व सिनेअभिनेते सयाजी शिंदे यांच्याबरोबर खासदार श्रीरंग आप्पा बारणे

# मैत्र जिवांचे



संसदेतील मित्र
खासदार राम नायडू
व खासदार श्रीकांत शिंदे
यांच्या समवेत
खासदार श्रीरंग आप्पा बारणे



खासदार व मंत्री
ज्योतिरादित्य शिंदे
यांच्या समवेत
खासदार श्रीरंग आप्पा बारणे



खासदार हेमा मालिनी व
मा.खासदार पुनम महाजन
यांच्या समवेत संसदेच्या
आवारात खासदार श्रीरंग
आप्पा बारणे



दिल्लीच्या सभागृहामध्ये
मावळचे खासदार श्रीरंग आप्पा
बारणे व पुण्याचे खासदार
केंद्रीय मंत्री मुरलीधर अण्णा
मोहोळ

# मैत्र जिवांचे



प्रसिध्द क्रिकेट खेळाडू
सचिन तेंडुलकर व
महेंद्रसिंग धोनी
यांचा सत्कार करताना
खासदार श्रीरंग आप्पा बारणे



पैलवान सत्पाल सिंग
यांच्या समवेत
श्रीरंग आप्पा बारणे




डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठ
पिंपरी, पुणे चे कुलपती
डॉ.पी.डी.पाटील व केंद्रीय मंत्री
प्रतापराव जाधव यांच्या हस्ते
सत्कार स्विकारताना
खासदार श्रीरंग आप्पा बारणे



सिम्बायोसिसचे संस्थापक
डॉ. एस.बी. मुजुमदार
यांच्या हस्ते सत्कार स्विकारताना
खासदार श्रीरंग आप्पा बारणे
व सोबत पत्नी सरिता बारणे

# मैत्र जिवांचे



शिवसेना नेते आणि उद्योग
मंत्री उदय सामंत यांच्याशी
चर्चा करताना
खासदार श्रीरंग आप्पा बारणे



संसदेतील मित्र खासदार
राहुल शेवाळे, खासदार
श्रीकांत शिंदे यांच्या समवेत
खासदार श्रीरंग आप्पा बारणे



जीवाभावाचे मित्र
नारायण बहिरवडे,
वाघमोडे मामा व
बंधू धनाजी बारणे
सोबत श्रीरंग आप्पा बारणे



जीवाभावाचे मित्र
स्व. गजानन चिंचवडे
यांच्या हस्ते शुभेच्छा
स्विकारताना
खासदार श्रीरंग आप्पा बारणे
व सोबत रवी नामदे

# विविध आंदोलने



प्राधिकारणाच्या अतिक्रमण विरोधी कारवाई विरोधात काढण्यात आलेला मोर्चा




पाणीप्रश्न व मिळकत कराविरोधातील आंदोलनप्रसंगी



जेएनपीटी, उरण येथील स्थानिक शेतकऱ्यांच्या व नागरिकांच्या न्याय हक्कासाठी काढण्यात आलेला मोर्चा



मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी शिवसेना खासदारांसह दिल्ली येथे लोकसभेत आंदोलन करताना




हिंदुस्थान अँटिबायोटिक्स कामगारांच्या आंदोलनात खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांचा सहभाग



दिल्ली येथे संसदेच्या आवारात सहकारी खासदारांसमवेत



दिल्ली येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिवसेना खासदारांसमवेत



मावळ तालुक्यातील भंडारा डोंगर येथे उभारण्यात येणाऱ्या जगदगुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराजांच्या मंदिरास ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब काशीद यांच्याकडे देणगी देताना खासदार श्रीरंग आप्पा बारणे



उपराष्ट्रपती वैंकय्या नायडू यांच्या समवेत दिल्लीतील खासदार




आणि श्रीरंग आप्पा बनले पीठासीन अधिकारी
वैभवशाली परंपरा असलेल्या लोकसभेचे पीठासीन अधिकारी म्हणून कामकाज करण्याची संधी खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांना मिळाली होती.

# संसदरत्न, महासंसदरत्न

महापालिका ते खासदार अशी श्रीरंग आप्पा बारणे यांची वाटचाल उल्लेखनीय आहे. लोकसभेमध्ये २०१४ मध्ये प्रवेश केल्यानंतर २०२४ पर्यंत त्यांनी उत्कृष्ट संसदपटू म्हणून काम केले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना संसदरत्न आणि महासंसदरत्न असे पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे.

संसदरत्न
पुरस्कार २०१६





संसदरत्न
पुरस्कार २०१७





खा.श्रीरंग आप्पा बारणे यांना केरळचे राज्यपाल, सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश मा.पी सतशिवम यांच्या हस्ते सलग तिसऱ्या वर्षी संसदरत्न २०१७ पुरस्कार देण्यात आला. या प्रसंगी अर्थ राज्यमंत्री मा. अर्जुन मेगवाल, प्राईम पॉइंट फाउंडेशनचे अध्यक्ष मा.के. श्रीनिवासन.

केंद्रीय मुख्य निवडणुक आयुक्त श्री. सुशीलकुमार चंद्रा यांच्या हस्ते 'संसद विशेष रत्न' पुरस्कार देऊन दिल्ली येथे सन्मानित करण्यात आले.







संसद महारत्न पुरस्कार २०२१

संसद उत्कृष्टरत्न पुरस्कार २०२४






# तिसऱ्यांदा यशाचा जल्लोष; बाजी आपलीच रं!

मावळ लोकसभा मतदारसंघाचे २०२४ ची निवडणूक ही खूपच रोमहर्षक होती. त्यामध्ये महायुतीचे उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे हे तिसऱ्यांदा खासदार झाले. मोठ्या प्रमाणावर विजयी जल्लोष करण्यात आला. या निवडणुकीतील विजयाची क्षणचित्रे.







लोकसभेतही अव्वल

# दहा वर्षांमध्ये कोणते प्रश्न मांडले अन् सोडविले

**सन २०१४ ते २०२४ दरम्यान लोकसभेच्या संसदीय अधिवेशनात १८३५ प्रश्न उपस्थित केले. ४७४ एवढ्या प्रश्नांवर चर्चेत सहभाग घेतला. तसेच ३६ प्रायव्हेट मेंबर बिल यावर चर्चा केली. सर्वाधिक प्रश्न मांडणारा खासदार म्हणूनही श्रीरंग बारणे यांची ओळख झाली.**

लोकसभा निवडणूक झाल्यानंतर झालेल्या संसदीय अधिवेशनात विविध प्रश्न उपस्थित केले. तसेच वेगवेगळ्या प्रश्नांवर चर्चेत सहभाग घेतला म्हणून राज्यातील सर्वाधिक प्रश्न मांडणारा खासदार म्हणूनही श्रीरंग बारणे यांची ओळख झाली. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन संसदरत्न पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्याचबरोबर पिंपरी-चिंचवडभूषण पुरस्कार, राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद यांच्या वतीने जाणीव पुरस्कार, अण्णासाहेब मगर सोशल स्पोर्ट्स फाऊंडेशनच्या वतीने पुरस्कार, स्व. राजीव गांधी विचार मंच यांच्या वतीने राजीव गांधी पुरस्कार, राजीव युवा फाऊंडेशन यांच्या वतीने युवा रत्न पुरस्कार,

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या वतीने पिंपरी-चिंचवड समाजभूषण पुरस्काराने गौरविले आहे.

एका वर्षात संसदीय अधिवेशनातील चर्चेत सहभागी होऊन प्रश्न विचारले तसेच संसदेत ९६ टक्के सहभाग होता. राज्यातील खासदारांपैकी सर्वाधिक चर्चेत सहभाग घेणार आणि प्रश्न मांडणारा खासदार म्हणूनही लौकिक आहे. शैक्षणिक समस्या, अवैध बांधकामाचा प्रश्न, बीआरटी योजनेतील त्रुटी, घरकुलातील भ्रष्टाचार, बैलगाडा शर्यत, मच्छिमारांचा प्रश्न, कुपोषण, दुष्काळ व गारपीट, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, मुंबई-पुणे महामार्गावरील अपघात, एअर ॲम्ब्युलन्स सेवा, क्रांतिवीर चापेकर बंधूंच्या नावाने टपाल तिकीट, पिंपरी-चिंचवड शहरातील मेट्रो, माथेरान पर्यटन, कौशल्य विकासासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करणे आदी महत्त्वाचे प्रश्न मांडले.

***

# मतदार राजाच्या साथीने मावळमध्ये दहा वर्षांत हे करता आलं

- पिंपरी चिंचवड शहरासाठी स्वतंत्र पासपोर्ट कार्यालय सुरू
- पिंपरी ते निगडी मेट्रोस मंजुरी मिळाली असून, त्याची निविदा प्रसिद्ध होऊन काम सुरू.
- अमृत भारत योजना अंतर्गत पनवेल, लोणावळा, तळेगाव, आकुर्डी, चिंचवड, देहू रोड, रेल्वे स्टेशन सुशोभीकरण करण्यास व अत्याधुनिक स्टेशन करण्यास केंद्र सरकारकडुन मंजुरी.
- पवना धरणातून गाळ ८ वर्षा पासून लोकसहभागातून काढला पिंपरी चिंचवड शहराला १ टी.एम.सी पाणीसाठा वाढवला.
- पिंपरी चिंचवड शहरातील शास्तीकराचा प्रलंबित असणारा प्रश्न माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करून शास्तीकर माफ केला.
- केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत मावळ तालुक्यासाठी ११४ गावांसाठी पाणी योजना तयार करून त्या कामाचा प्रस्ताव दाखल करून कामांना मंजुरी मिळून सद्य स्थितीत कामे सुरू केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मावळ तालुक्यातील टप्पा क्र २ मध्ये २२ कि.मी रस्त्यांना मंजुरी घेऊन कामे पूर्ण रक्कम रू. १८ कोटी २५ लक्ष.
- केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पिंपरी चिंचवड, मावळ या भागात ४,२९४ लाभार्थ्यांना लाभ मिळाला, रक्कम २,१४७.०० कोटी दीनदयाल योजनेअंतर्गत १६३ लाभांर्थी पात्र होऊन त्यांना लाभ मिळवून दिला तसेच द्रारिद्र्य रेषेखालील १,१०६ लाभार्थ्यांना लाभ दिला.
- दीनदयाल योजने अंतर्गत कर्जत तालुक्यातील तुंगी या आदिवासी वाडीत व खालापूर तालुक्यातील काठवण या आदिवासी भागात स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा वीज पोहचवली.
- समुद्राच्या पाण्याखालून १२ कि.मी आतील एलिफंटा (घारापुरी) ऐतिहासिक आदिवासी बेटावर प्रथम वीज पोहचविण्यात आली.

* पंतप्रधान निधी योजने अंतर्गत नागरिकांना उपचारासाठी २,६९,९४,९५० रुपये निधी मंजूर करून दिला.
* केंद्र शासनाच्या मुद्रा योजनेअंतर्गत मावळ तालुक्यात व पिंपरी चिंचवड शहरात ३,२०० खातेदारांना व्यवसायसाठी अर्थसाह्य उपलब्ध करून दिले १,२०० कोटी.
* उरण यथील मच्छीमार, व्यावसायिक याच्या सोईसाठी करंजा येथे बंदर उभारण्यात आले.
* उरण यथील मच्छीमार यांचा राज्य सरकार यांच्या वतीने कमी करण्यात आलेला डिझेल कोटा परत सुरू करण्यात आला.
* माथेरान गिरिस्थान नगर परिषद क्षेत्रात विविध ठिकाणी सांडपाणी व्यस्थापन करण्यासाठी एस.टी.पी उभारण्यासाठी ४७.३२ कोटी निधी नगरविकास खात्यामार्फत मंजूर करण्यात आला.
* एकवीरा देवी येथील विकास आराखड्यासाठी ४० कोटी निधी राज्यसरकारच्या मार्फत उपलब्ध करून दिला.
* पुणे-लोणावळा तिसऱ्या व चौथ्या ट्रॅकला मंजुरी व राज्य शासनाचा ५०% सहभाग या बजेटमध्ये मंजुरी. सातत्याने पाठपुरावा केला.
* केंद्र सरकारच्या अमृत भारत रेल्वे स्टेशन सुधारणांतर्गत तळेगाव दाभाडे, चिंचवड, आकुर्डी, देहू रोड, लोणावळा, नेरळ, पनवेल रेल्वे स्टेशन सुशोभिकरण करण्यात येणार आहे.
* पनवेल ते कर्जत नवीन रेल्वे मार्गाला मंजुरी मिळाली असून सद्यःस्थितीत काम चालू; लवकरच मार्ग पूर्ण होईल.
* पनवेल ते उरण रेल्वे मार्गावरील पाठपुरावा करून त्या ठिकाणी नवीन रेल्वे मार्ग व लोकल सेवा सुरू केली.
* सिंहगड एक्सप्रेसला चिंचवडमधील कामगारांसाठी विशेष डबा जोडण्यात आला.
* माथेरान येथील टॉय ट्रेन बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्या संदर्भात पाठपुरावा करून १०० कोटी निधी उपलब्ध करून त्या मार्गावरील ट्रॅक दुरुस्त करून नवीन डबे व इंजिन उपलब्ध करून दिले.
* मावळ तालुक्यातील ५० गावांना जोडणाऱ्या जांभूळ येथील गेट क्र. ४७

भुयारी सुरु तसेच तळेगाव, देहुरोड, शेलारवाडी, कामशेत येथे देखील भुयारी मार्ग पूर्ण.

* मावळ तालुक्यातील कान्हे फाटा, लोणावळा येथे रेल्वे ओव्हर ब्रिजचे (ROB) काम पूर्णत्वाकडे
* पनवेल ते जे.एन.पी.टी आठ पदरी रस्ता करण्यात आला. ट्रॅफिकची समस्या सोडवली.
* तळेगाव ते चाकण, शिक्रापुर या महामार्गाच्या कामाची निविदा प्रसिद्ध होऊन कामास सुरूवात.
* पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत वडगाव ते कातवी ३ कोटींचा रस्ता करण्यात आला.
* केंद्र सरकारच्या भारतमाला योजनेअंतर्गत देहूरोड सेंट्रल पॉइंट किवळे, रावेत, वाकड, ताथवडे ८.५ किमी लांबीचा एलिव्हेटेड मार्गाचा डीपीआर तयार करून केंद्र शासनाच्या मंजुरीला लवकरच मंजुरी मिळणार आहे. रक्कम ३,६६०.०० कोटी.
* स्वांतत्र्यवीर दामोदर हरी चापेकर यांच्या स्मरणार्थ टपाल तिकिट प्रकाशित करण्यात आले.
* केंद्र सरकारकडे वेळोवेळी पाठपुरावा करून नवी मुंबई येथील विमानतळ हे लवकरात लवकर सुरू करण्यासाठी प्रयत्न.
* नवी मुंबई येथे नव्याने होत असलेल्या एअरपोर्ट बाबत विस्थापित दहा गावातील नागरीकांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा केला.
* रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून कळंबोली सर्कल, पनवेल येथे आधुनिक पद्धतीने रस्त्याचा विकास करण्यात येत आहे त्यासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला.

***

# राजकीय आलेख, भूषविलेली पदे

* १९९२ : उपाध्यक्ष, युवक काँग्रेस
* १९९६ : ब्लॉक कमिटी अध्यक्ष
* १९९७ : नगरसेवक, पिं.चिं. मनपा
* १९९८ : प्रांतिक सदस्य, काँग्रेस
* १९९९ : अध्यक्ष, स्थायी समिती पिं.चिं. मनपा
* २००२ : नगरसेवक, पिं.चिं. मनपा
* २००२ : गटनेता पिंपरी-चिंचवड मनपा
* २००४ : काँग्रेस कमिटी अध्यक्ष, पिंपरी चिंचवड शहर
* २००७ : नगरसेवक, पिं.चिं. मनपा
* २००९ : चिंचवड विधानसभा निवडणूक
* २००९ : शिवसेना सहसंपर्कप्रमुख, मावळ लोकसभा
* २००९ : नगरसेवक, पिं.चिं. मनपा पोटनिवडणूक
* २०१२ : नगरसेवक व शिवसेना गटनेता पिं.चिं. मनपा
* २०१४ : खासदार, मावळ लोकसभा
* २०१९ : खासदार, मावळ लोकसभा
* २०१९-२०२९ : अध्यक्ष, दिशा कमिटी रायगड
* २०२३ : लोकसभेचे पीठासीन अधिकारी
* २०२४ : खासदार, मावळ लोकसभा
* २०१४-२४ : केंद्र सरकारमधील स्थायी समितीची भूषविलेली पदे
* अध्यक्ष : उर्जा स्थायी समिती
* सहसंयोजक : राजभाषा समिती
* सदस्य : संरक्षण विषयक स्थायी समिती
* सदस्य : अर्थ स्थायी समिती
* सदस्य : पर्यटन, रस्ते विकास, शहर विकास, गृहनिर्माण स्थायी समिती

## सामाजिक शैक्षणिक, सहकार, संस्थात्मक आलेख

* श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था (अध्यक्ष),
* व्यंकटेश्वरा सहकारी पतसंस्था (संस्थापक),
* नोबल एज्युकेशन सोसायटी, लक्ष्मीबाई बारणे विद्यालय (कार्याध्यक्ष)
* दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमी (सदस्य,)
* पिंपरी-चिंचवड सोशल क्लब (अध्यक्ष)

***

# कृतज्ञता...

मला हिंदुत्ववादी संघटनेबरोबरच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवाराची प्रचंड मदत निवडणुकीच्या काळात मिळाली, माझ्यासाठी घरोघरी जाऊन भेटणे, नाराज भा.ज.पा नेत्यांना माझ्यासाठी काम करण्यास भाग पाडणे.

पुस्तक लिहितांना माझ्या बरोबर रोज राहणाऱ्या व्यक्तींचा उल्लेख करणे आवश्यक आहे. गेल्या २५ वर्षापासून माझ्या गाडीचा ड्रायव्हर मारूती चव्हाण हा सातत्यपणे माझ्या बरोबर राहीला. त्यांने कधी सुट्टी घेतली नाही, माझ्या बरोबर असणारे सर्व थकतात पण त्यांचे सातत्य कायम राहिले.

माझे स्वीयसहाय्यक (पी.ए) उदय आवटे गेली वीस वर्ष माझ्याबरोबर आहे. राजु शिंदे, उमेश उपाध्याय, अजय परांडे, विशाल पाटील हे अनेक वर्ष माझ्याबरोबर काम करतात. तसेच माझ्या ऑफीसचा संपुर्ण स्टाफ विधानसभा नुसार माझे काम पहाणारे माझे सहकारी यांचं मानावे तेवढे आभार कमीच आहे. माझ्या सर्व निवडणूकीत माझे चुलत बंधु धनाजी बारणे यांचा फार मोठा सिंहाचा वाटा आहे. निवडणुकीचे नियोजन व फार्म भरल्यापासुन ते शेवटच्या निकालापर्यंत पूर्ण मेहनतीने तो काम करतो. त्याच्या कामाची परिसिमा नाही. त्याची मेहनत माझ्या विजयात प्रचंड मोठी आहे. माझी पत्नी सरीता, मुले प्रताप, विश्वजीत, सून स्नेहा, पुतणे महेश व निलेश, माऊली, महादेव, माझ्यासाठी माझे सर्व नातेवाईक, माझे भाचे कंपनी, माझ्या भगीनी यांचे सहकार्य सर्वातोपरी निवडणुकीत मिळते.. कै.गजानन चिंचवडे हा माझा लहानपणीचा मित्र माझ्या बरोबर एकत्र काम करण्याचा निर्णय त्याने घेतला. माझ्या प्रत्येक निवडणुकीचे नियोजन, बैठका घेणे, सहयोगी पक्षाच्या बैठका घेणे, प्रमुख नेत्यांना भेटणे, याचे सर्व नियोजन गजानन करायचा त्याची उणीव मला नक्कीच २०२४ निवडणुकीत जाणवली.

तसेच आजवरच्या वाटचालीमध्ये सर्व हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांचे आशीर्वाद मिळाले. तसेच मावळ लोकसभा मतदारसंघातील सर्व देवस्थानांच्या प्रमुखांचे आशीर्वाद मिळाले. माझे सर्व जवळचे नातेवाईक सर्वाच्या नावाचा उल्लेख करणे शक्य नाही. त्या सर्वांशी कृतज्ञता व्यक्त करतो.



आमचे मित्र, स्नेही आणि मावळचे लोकप्रिय खासदार श्रीरंग बारणे यांचे ‘संघर्षयोद्धा : श्रीरंग आप्पा बारणे’ हे पुस्तक लवकरच प्रकाशित होत आहे. त्यानिमित्ताने त्यांना शुभेच्छा. त्यांचा आणि माझा गेल्या वीस वर्षांपासूनचा स्नेह, जिव्हाळा आहे.

लोकाभिमुख नेतृत्व कसे असावे, हे आप्पांकडे पाहिल्यानंतर दिसून येते. कोणताही बडेजाव नाही मोठेपणा नाही अत्यंत साधेपणाने राहून, कार्यकर्त्यांशी मिळून मिसळून त्यांनी राजकारण आणि समाजकारणात आपली ओळख निर्माण केली आहे. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना त्यांनी नगरसेवक ते खासदार अशी प्रचंड भरारी घेऊन देशाच्या, राज्याच्या आणि परिसराच्या विकासात योगदान दिलं आहे.

सलग तिसऱ्यांदा खासदार म्हणून निवडून येणे, ही सोपी गोष्ट नाही. या पुस्तकामध्ये १९९७ मध्ये लढवलेली पहिली पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निवडणूक, स्थायी समिती अध्यक्षपद निवडणुकीत झालेले राजकारण, त्यावर मुत्सद्दीपणे केलेली मात, कार्यकर्त्यांच्या बळावर तत्कालीन बाहुबलींशी दिलेला लढा, महापालिकेतील विरोधी पक्षनेतेपद आणि पक्षाचे शहराध्यक्ष पद अशा विविध भूमिका त्यांनी प्रभावीपणे बजावल्या.

२००९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये झालेल्या राजकारणाचा फटका बसूनही त्यांनी समाजकारणाचा वसा सोडला नाही. पिंपरी चिंचवड शहरातील विविध प्रश्नांवर आक्रमक होऊन भूमिका मांडली आणि त्याचीच परिणीती म्हणजे २०१४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये पहिल्यांदा खासदार म्हणून निवडून आले. इथपासून सुरू झालेली यशाची वाटचाल कायम आहे.

२०२४ मध्ये सलग तिसऱ्यांदा खासदार म्हणून निवडून येऊन त्यांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. त्यांच्या संघर्षाची गाथा सांगणारे पुस्तक वाढदिवशी प्रकाशित होत आहे. हे पुस्तक एका नेत्याची केवळ राजकीय वाटचाल नसून त्यातून राजकारणात येणाऱ्या कार्यकर्त्यांना दिशा देणारं मार्गदर्शक असे आहे. आप्पांना वाढदिवसाच्या निमित्ताने भावी वाटचालीस खूप खूप शुभेच्छा.

**एकनाथ संभाजीराव शिंदे**

उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

माजी मुख्यमंत्री, शिवसेना मुख्य नेते

ISBN 978-93-342-2371-2

9 789334 223712